*मसअप प्रकाशन*

# स्पंदन दिवाळी

# अंक -२०१९

# *अर्पणपत्रिका*

*पदलालित्याची उधळण करत साहित्य संवेदनशील मनाला स्पर्शून त्याला साहित्यकार बनवते. असेच काही साहित्यकार एकत्र आले की निर्माण होतो एक साहित्यिक संघ ! या संघाला खूणावत राहतात नवे नवे ऋतू, सोहळे आणि निसर्गा सोबत बदलणाऱ्या मानवी मनाचे आयाम ! सणांसोबत मनात बहरणारा आनंद द्विगुणित व्हावा, म्हणून आमचा संघ तुमच्या करता घेऊन आला आहे हा दिवाळी अंक !*

*स्पंदन आमचा पहिलाच दिवाळी अंक ! रसिकांना वाचनाचा निखळ आनंद देण्याकरता आम्ही आनंदाने कंबर कसली आणि श्रीगणेशा केला या स्पंदन दिवाळी अंकाचा !*

*दशमुखावर विजयश्री मिळवून सीतादेवीं सोबत प्रभू रामचंद्रांची अयोध्येला परतण्याची ती शुभ वेळ.... आणि त्याची आठवण म्हणजे दिवाळी !*

*एका कट्टर शिव भक्ताला, एका त्रिलोकविजेत्या महाबलशाली योद्ध्याला, एका श्रीमंत, सुसज्ज नगरीच्या राजाला सशस्त्र सेनेऐवजी केवळ वानरांना सोबत घेऊन हरवणे तो नारायणच करू जाणे !*

*ती हिंमत, तो पराक्रम, ती वीरता..... केवळ अतुलनिय! युद्ध जिंकूनही ते राज्य बिभीषणाला देऊन पुन्हा मायभुमी वर परतणारे रामचंद्र आणि हातात साधे एक शस्त्रही न घेता केवळ रामाच्या नावाचा जाप करत रावणाला खचवणारी, त्याला नकार देत लंकेचे सारे सुवर्ण साम्राज्य लाथाडणारी, रावणाच्या आमिषांना बळी न पडता अशोक वाटिकेतच त्याला हरवणारी, सारे कष्ट सहन करत पतीशी निष्ठा राखणारी सीता देवी !*

*ते जिंकून परतण्याच्या दिवशी अयोध्या दिव्यांच्या रांगांनी सजली, प्रकाशाने उजळून गेली. असे दीप जेव्हा आजही रात्रीच्या वेळी तमाला बाजूला सारत तेवतात तेव्हा कधी ते सीतादेवीचे रूप भासू लागतात, तर कधी रामचंद्रांची आणि सीतामातेची वाट बघणारे नेत्रदीप भासू लागतात.*

*आम्ही तुमच्यासाठी आणलेला हा साहित्यदीपक - स्पंदन दिवाळी अंक देवी सिता आणि प्रभू श्रीरामचंद्रांचरणी अर्पण !*

## *- स्पंदन दिवाळी अंक २०१९*

*मधुरा, सिद्धि, पल्लवी, अर्चना*

# अनुक्रमणिका


शब्द - डॉ. संजीवनी तोफखाने.......................................2
बेलाग कड्यातील जीवधन - अमित कुलकर्णी....................4
शेवटचा पुरावा - मधुरा कुलकर्णी...................................6
कशी साजरी करु दिवाळी - सौ. संध्या भावे..................19
सखे तूच आहेस गझल - ज्योत्स्ना चांदगुडे.......................20
मोठ्यांचे आशीर्वाद का घ्यावे - कु. प्रियांका हेमंत पई.........21
तळघरे - अज्ञातवासी...............................................22
गुलाबी चिरोटे - सिद्धि चव्हाण.....................................27
सहज - संदिप अवचट ...............................................30
गंमत रव्याच्या लाडूची - अश्विनी दंडवते खांडवे ...............31
जगून बघ - यतीन कुलकर्णी........................................32
गोडसर लिंबू - यतीन कुलकर्णी ...................................33
उभी आहे तुझ्या वाटेवर - शबाना मुल्ला..........................34
राहून गेलेली तेल मालिश - डॉ कल्पना देशमुख................35
घरगुती साजूक तूपाची खास रेसिपी – सिद्धि चव्हाण..........37
अहो - मनिषा शंकर सूर्यवंशी .......................................39
पारध - मयुरेश पालकर ...............................................40
अलक - अभिषेक चौधरी ...........................................42
अल्याड पल्याडच्या वेणा - बिपीन सांगळे........................43
दशावतार - चंचल काळे.............................................48
द वर्ड्स विथ सायलेंस - अजय चव्हाण............................49
बाप - विवेक कुलकर्णी ..............................................52
स्वप्न आणि मी कविता - अरुणा विचारे............................53
सुकुमार - भाग्यश्री कुलकर्णी........................................54
"गोष्टी फ़राळाच्या" - सिद्धि चव्हाण ...............................55
वळण - अर्चना गवस.................................................57
दोडक्याच भरीत रेसिपी - मिनल बारटक्के.......................59
वाट पाहते मरणाची - यतीन कुलकर्णी............................60
हृदय आणि ती - अरुणा धनंजय विचारे...........................61
हो! तुझी जाहली - प्रशांत पोरे ......................................64
बिघडलेला की घडलेला फराळ: चंपाकली - अर्चना गवस.....65
निरोपाच्या वेळी - अजित चौधरी ...................................67
कविता WhatsApp ची - डॉ प्राची जावडेकर..................70
टी टी एम एम - वैशाली मोहिते.....................................71
उजाड झाली राने- शाम लाटकर ..................................75
कलादालन - मधुरा कुलकर्णी.........................................76
हसुया जरा - योगेश गवस............................................77
नशा आणि कुजबुज - पल्लवी कुलकर्णी सुकळीक...........78

# शब्द

**- डॉ. संजीवनी तोफखाने**

साधारण १९६७/ ६८ साल असावे. मी क्लासला जाण्यासाठी घराच्या पायऱ्या उतरत होते. तेवढ्यात

"शब्द आहेत का ग ?"

प्रश्न ऐकून मी निःशब्द . आजीची एक मैत्रीण पायऱ्या चढत होती. मी काही बोलण्याच्या आत आजीच बाहेर आली. मी क्लासला निघून गेले. मनात एकच विचार त्या आजींनी 'शब्द ' आहेत का असे का विचारले? घरी येताच आजीला तिला आम्ही 'अहो माई ' म्हणत होतो, विचारले

"माई त्या काशीकरीणबाई 'शब्द' आहेत  का असे का म्हणाल्या?

"अगं, मी वाचायला शिकते आहे ना! मग रोज कुणाला तरी, पोथीतला  पुढचा शब्द काय आहे असे विचारते. आणि तो दिवसभर घोकून लक्षात ठेवते. मग पुढचा विचारून घेते . म्हणून सगळ्याजणी मला  'शब्द' म्हणतात."

मला माईंचे कौतुक वाटले आणि अभिमानही. या सत्तरीच्या वयात केवढा हा ध्यास शिकण्याचा. एकेक शब्द करत पूर्ण दासबोध वाचायला शिकल्या माई.  लिहायलाही शिकल्या. बारीक सुंदर अक्षरात सतत "श्रीराम जय राम  जय जय राम" जप लिहीत असत. अशा अनेक वह्या त्यांनी लिहून काढल्या. वह्या लिहून पूर्ण झाल्या कि सज्जन गडावर नेऊन समर्थांच्या चरणी वाहायच्या. माई एक अजबच व्यक्तिमत्व होत्या. दिसायला खूप छान होत्या. गोऱ्यापान. शेलाटा बांधा. एकदम टोकदार तरतरीत नाक. मी जेमतेम सहा सात वर्षांची असताना आमचे आजोबा, नाना वारले. त्यानंतर पंधरा दिवसातच माई सोवळ्या झाल्या. म्हणजे जसे कळायला लागले तसे आम्ही त्यांना असेच पाहिले  आहे. लाल लुगडं असो की पांढरी काठापदराची साडी असो. कपाळपट्टी निम्मी झाकलेला डोक्यावरून घट्ट घेतलेला पदर. चापून चोपून नेसलेली नऊ वारी साडी. तोंडात सतत कुठले तरी स्तोत्र तरी किंवा कुणावर चिडल्या असल्या तर शिवी. कधी शाळेचे तोंड नाही पहिले पण पाठांतर एवढे प्रचंड होते. गीतेचे बारावा, पंधरावा अध्याय, शिवलिलामृताचा अकरावा अध्याय, रामरक्षा, भीमरूपी, मनाचे श्लोक, समर्थांची अनेक स्फुट रचना त्यांना मुखोद्गत होत्या.

सकाळी लवकर उठून कामाला लागणार. सगळं कसं  सोवळ्यात. कोणीही बाहेरून आले की पहिले अंगावर पाणी शिंपडणार. आम्हाला त्यांच्या या सोवळ्याची गंमतही वाटायची आणि रागही यायचा. पण त्यांच्यापुढे कोणाचेच काही चालत नव्हते. रोज दुपारी वामकुक्षी झाली की मोठे भिंग घेऊन दासबोध वाचत बसायच्या. बरोबर चार वाजता कॉफी लागायची त्यांना.  पण कधी कपबशी नाही चालली. त्यांची एक पितळी होती आणि चांदीचे फुलपात्र. पितळी म्हणजे पितळेची छोटी परात. तेच लागायचे. कॉफीची सुद्धा एक छोटी चांदीची पातेली होती. ती म्हणे त्यांनी त्यांच्या लग्नातल्या शेल्यातील जर काढून त्यातून बनवून घेतली हॊती. स्टील म्हणजे लोखंड, तर पूर्ण वर्ज होते. एकदा गंमतच झाली.

माईंचे रात्रीचे जेवण म्हणजे धान्य फराळ, काहीतरी भाजके खायचे. आम्ही सगळे जेवायला बसलो होतो. माई आमच्यापासून थोड्या दूर बसल्या होत्या. खाता खाता त्यांना ठसका लागला. नेमके पाणी न घेता बसल्या होत्या. वडिलांनी पटकन त्यांच्या जवळच्या फुलपात्रात पाणी दिले. पण  माई काही पाणी घेईनात. मुकाट्याने घेतील त्या माई कसल्या! फुलपात्र स्टीलचे होते ना. एकीकडे ठसका जोरात लागलेला आणि त्यांचे खाणाखुणा करणे चाललेले चांदीच्या भांड्यासाठी. जेव्हा चांदीच्या भांड्यात पाणी दिले तेव्हाच त्यांनी घेतले. आणि वर ठसका थांबल्यावर स्वतःच हसत होत्या. इथे आमचाच जीव घाबरलेला त्यांना काही होईल म्हणून, माई गोष्टी मात्र खूप छान सांगायच्या. आम्ही भावंडं त्यांच्या भोवती बसायचो. किती गोष्टी येत होत्या त्यांना. पुराणातल्या, रामायण, महाभारतातील गोष्टी. समर्थ रामदासांच्या गोष्टी आणि तेवढ्याच विनोदी गोष्टीही सांगायच्या. त्यांची हीच गोष्टी सांगण्याची आवड माझ्यामध्ये आली असावी.

दुपारचा वेळ चांगला घालवण्यासाठी त्यांचे त्यांनी छान छंद लावून घेतले होते. कुठून कुठून कापडाचे लहान मोठे तुकडे जमा करायच्या, त्यापासून दुपटी शिवायच्या. स्वतःच्या चोळ्या स्वतः हातावर शिवायच्या. गौरीचे साचे हातावर शिवायच्या. एक उभी काठी घेऊन त्याच्यावर पूर्ण छाती, हात असा तो साचा असायचा. त्याला खणाचे पोलके शिवायच्या. अगदी बाहीला जरीचा काठ

वगैरे लावून. हाताची बोटे इतक्या नाजूक हातानी शिवायच्या, नखांच्या जागी नेलपेंट लावल्यासारखे लाला छोटे छोटे कापडाचे तुकडे लावायच्या. त्यांची ती कलाकुसर मी मन लावून बघत बसायची. खरंच कला होती माईंकडे. अनेकांना त्यांनी हे गौरीचे साचे करून दिले.

चारची कॉफी झाली की भजनाला जायची तयारी सुरू. त्यांचे साडी नेसणे सुद्धा फार पद्धतशीर असायचे. कपाळावरचा काठ तर काठ, पण पाठीमागील कासोटा दहा वेळा हात फिरवून इस्त्री केल्यासारखा लागायचा. त्या भजनाला जाऊन आल्या की तिथे मिळालेला एवढासा प्रसाद रुमालात बांधून आणायच्या. तो चिमूटभर प्रसाद मिळाला तरी आम्हाला कोण आनंद व्हायचा. माई रागीटही तेवढ्याच आणि प्रेमळही तेवढ्याच. बोलण्यात फटकळ ही तेवढ्याच आणि मिश्किलही तेवढ्याच. म्हणूनच म्हणते अजबच रसायन होत आमच्या माई.

सात मुले आणि पाच मुली झाल्या माईंना. पण कंबर बघाल तर वीतभर. पाठपोट एक. अगदी चवळीची शेंग. म्हणायच्या

"अगं प्रत्येक बाळंतपणात डेरा डेरा भरून तूप खाल्लंय. पण कष्टही तसेच केलेत. नाहीतर या आजकालच्या पोरी एक दोन खेपेतच बरण्या होतात."

परिस्थिती म्हणाल तर फार काही चांगली नव्हती. आजोबा एका बालविधवा बहिणीची शेती संभाळण्यापलीकडे काही करत नव्हते म्हणे. मुलांनी अशीच कोणाकोणाकडे घरकामे करून आपली शिक्षण केली. त्याकाळी शक्य होत म्हणून नोकरी लागले. पुढे मोठ्या मुलांनी धाकट्यांचे केले. माईंचा संसार झाला. कंटाळा कसा तो ठाऊकच नव्हता माईंना. शेवट पर्यंत स्वतःचे लुगडे स्वतः धुवायच्या. स्वच्छता टापटीप अगदी बघण्यासारखी. वयाच्या नव्वदी पर्यंत घरात त्यांचा दबदबा होता. माझे धाकटे काका मिलिटरी मध्ये होते. त्यांची अधून मधून मनिऑर्डर यायची माईंना. एक दिवस अशीच मनिऑर्डर आली. पोस्टमनने स्टॅम्पपॅड काढले, तसे ठसक्यात माई म्हणाल्या

"अरे हे नको, पेन दे. मला आता सही करता येते. "

आणि माईंनी रुबाबात सही केली

"गं भा. कृष्णाबाई जगजीवन देशपांडे"

****************

# बेलाग कड्यातील जीवधन

- अमित कुलकर्णी




PC: [www.dongarwac.com](http://www.dongarwac.com)

जीवधन ऐन घाटमाथ्यावरचा उभ्या कडय़ावरील किल्ला. सहय़ाद्रीचा भेदक भूगोल, सातवाहनांच्या पाऊलखुणा आणि प्राचीन नाणेघाटाची सोबत या साऱ्यांनीच हा गड भारलेला आहे.

'हा किल्ला म्हणजे चहूबाजूने उभा तुटलेला एक कडा आहे. जिथे शत्रूचा तोफखानाही चालत नाही. गडावर जाणारी वाट उभ्या कातळातून शिडीसारखी वर चढते. खोबण्याचा मार्ग व त्यावरील दीड फूट उंचीच्या २४० पायऱ्या चढण्यास कठीण आहेत. वायव्येस किल्ल्यापासून अलग झालेला निमुळता सुळका असून, इथे समोर भयंकर खोल दरी दिसते. किल्ल्याच्या नैर्ऋत्येच्या कडय़ावरून जर एखादा दगड खाली टाकला तर तो थेट दोन हजार फूट खाली तळकोकणात जाऊन पडतो.''
गेल्या शतकातील बॉम्बे कुरिअर या वृत्तपत्राच्या १६ मे १८१८च्या अंकात इंग्रज पलटणीतील मेजर एल्ड्रीज या अधिकाऱ्याने जीवधन किल्ल्याचे केलेले हे वर्णन! मराठे-इंग्रजांमधील शेवटच्या युद्धानंतर जीवधन ताब्यात घेतल्यावर एल्ड्रीजने तो पहिल्यांदा पाहिला. या वेळी भारावून गेलेल्या या गोऱ्या अधिकाऱ्याने जीवधनवर स्वतंत्र लेख लिहीत त्याचे असे कौतुक केले. या गोष्टीला एवढी वर्षे होऊन गेली, पण आजही इथे आलो, की या वर्णनामध्ये तसूभरही अतिशयोक्ती नसल्याचे जाणवते.

जीवधन! मागच्या वेळी पाहिलेल्या चावंड किल्ल्याचा हा सख्खा शेजारी! पुणे जिल्हय़ातील जुन्नरपासून २७ किलोमीटरवर, प्राचीन नाणेघाटाच्या तोंडाशी आणि घाटघर गावाच्या हद्दीत. उंची समुद्रसपाटीपासून ११४५ मीटर! इथे येण्यासाठी जुन्नरहून सुटणारी घाटघर एसटी बस सोयीची. मुंबई-ठाण्याकडून येणाऱ्यांनी कल्याणहून माळशेज घाटाच्या दिशेने धावणाऱ्या एसटी बसने वैशाखरे थांब्यावर उतरावे आणि नाणेघाट चढून जीवधनला पोहोचते व्हावे. गडावर जाण्यासाठी या पायथ्याच्या घाटघर गावातूनच निघावे लागते. पश्चिम व पूर्वेकडून असे दोन मार्ग! यातील पश्चिमेकडील राजमार्ग पूर्वी सोयीचा होता, पण इंग्रजांनी सुरुंग लावून ही वाट तोडून टाकली. या मार्गावरील उभ्या कातळात खोदलेला दरवाजाही मोठमोठे दगड पडून बुजला होता. नुकताच तो मोकळा करण्यात आला आहे. त्या मानाने पूर्वेकडची घाटघर गावातून गडावर चढणारी वाट अवघड असली तरी सध्या तीच वाहती आहे. एल्ड्रीजने वर्णन केलेली हीच ती वाट. खडकात खोदलेल्या पायऱ्यांचा हा मार्ग! पण ब्रिटिशांनी आमच्या अनेक किल्ल्यांच्या वाटांची जी वाट लावली त्यामध्ये जीवधनच्या या दोन्ही मार्गानाही त्यांनी सुरुंग लावले. याच्या खुणा आजही दिसतात. यामुळे हा पायऱ्यांचा मार्ग एक-दोन ठिकाणी तुटला आहे. या तुटलेल्या भागात उभ्या कातळातील टप्पे आडवे येतात. या वेळी त्यामध्ये असलेल्या खोबण्यांचा आधार घेतच वर सरकावे लागते. प्रस्तरारोहणाचे हे दोन टप्पे पार पडले, की आपण गडाच्या पहिल्या दरवाजात पोहोचतो. पूर्वेकडील या दरवाजाच्या उद्ध्वस्त कमानीतून आपण आत प्रवेश करतो. या दारालगतच एकात एक गुंफलेल्या पाच पाण्याच्या टाक्या दिसतात. यातील काही पहारेक ऱ्यांच्या खोल्या वाटतात. गडात प्रवेश करताच फोफावलेल्या गवतातून अनेक उद्ध्वस्त अवशेष माना वर काढतात. मध्यभागी बालेकिल्ल्याची टेकडी आणि तिच्या भोवताली हा वास्तू परिसर! सुरुवातीलाच लक्ष जाते ते या टेकडीलगत दडलेल्या एका बांधकामाकडे! एखादे लेणे वाटावे अशी ही वास्तू! दर्शनी भागात बांधकाम तर पाठीमागे खोदकाम! मुखमंडपवजा प्रवेशद्वार, त्यावर ते संपन्नतेचे प्रतीक असलेले गजान्तलक्ष्मीचे शिल्प! दोन्ही बाजूने जलधारा सोडणारे हत्ती, तर मध्यभागी ती लक्ष्मीदेवता! या शिल्पाच्या खाली पुन्हा चंद्र-सूर्याची शुभप्रतीके! एकूणच प्रवेशावेळीच महत्त्व सांगणारी ही वास्तू महत्त्वाची, ऐश्वर्य साठवणारी असावी!

आतमध्ये सर्वत्र अंधाराचे साम्राज्य, तेव्हा टॉर्च घेऊनच प्रवेश करावा लागतो. एकामागे एक अशी तीन टप्प्यांतील वास्तू! यातील मधल्या भागास डाव्या-उजव्या हातास आणखी एकेक दालन! या साऱ्यांच्या मिळून पाच खोल्या तयार झालेल्या आहेत. या सर्वांच्या छतावर कमळाची झुंबरे कोरलेली आहेत. कोपऱ्यावरील खांबांच्या दंडांवर फणा काढलेले नाग आहेत. भिंतीत कमानीच्या खिडक्या आहेत, तळाशी बसण्यासाठी ओटे आहेत. त्या धूसर प्रकाशात हे सारे पाहात असताना गूढ वाटू लागते.

यातील अर्धा भाग बांधीव तर अर्धा खोदलेला. तिसऱ्या दालनाच्या डोक्यावर बालेकिल्ल्याचा सारा डोंगर आहे. या कल्पनेनेच घाम फुटायला होते. जीवधनच्या पोटातील हे लेणे कधी, कोणी आणि कशासाठी कोरले याची माहिती उपलब्ध होत नाही. पण हे खोदकाम गडाच्या निर्मितीवेळेचे म्हणजेच सातवाहन काळातीलच असावे असे वाटते. गजान्तलक्ष्मीचे शिल्प भाळी मिरवणाऱ्या या वास्तूची ओळख धान्याची कोठी म्हणून येते. अगदी १८१८ मध्ये झालेल्या शेवटच्या युद्धावेळी या कोठीत मोठय़ा प्रमाणात धान्यसाठा करून ठेवलेला होता. हा साठा आगीच्या भक्ष्यस्थानी पडला किंवा त्याला हेतूत: आग लावली गेली. पण त्या राखेच्या ढिगात आजही आपले पाऊल बुडते. पायाखालची ही राख आणि काजळी चढलेल्या छत-भिंती हे सारेच दर्शन त्या प्राचीन इतिहासात बुडवून टाकते. या कोठीच्या पाठीमागे दक्षिण अंगाला एकात एक गुंफलेली पाण्याची पाच टाकी दिसतात. शिबंदीची घरेही दिसतात. गडाच्या उत्तर माचीतही चवदार पाण्याचे एक विस्तीर्ण तळे आहे. याच्या अलीकडेच काही स्मारके आणि अन्य अवशेष दिसतात. या भागातील तटबंदीही अद्याप शाबूत आहे. हे सारे पाहात पश्चिम अंगाला येत असतानाच वाट अचानक तुटते आणि त्या तुटलेल्या धारेवर काही क्षण काळजात धस्स होते. एल्ड्रीजने व्यक्त केलेली ती मृत्यूची खोल दरी पुढय़ात उभी असते. तर तिला तितक्याच ताकदीने वर उसळलेला वानरलिंगीचा सुळका आव्हान देत उभा राहतो. दोनएक हजार फुटांचा हा कडा आणि त्याच्या एका अंगावर विसावलेला हा तीन-चारशे फुटांचा सुळका! त्याच्या पहिल्या दर्शनानेच काळजात धडकी भरायला होते. सहय़ाद्रीचे हे अक्राळविक्राळ रूप जमिनीवर आडवे होतच पाहायचे, डोळय़ांत साठवायचे. एल्ड्रीजने सांगितल्याप्रमाणे या कडय़ावरून छोटासा दगड सोडावा आणि तो थेट दोन हजार फूट खोल त्या पाताळात जाऊन पडल्याचे जीव मुठीत धरून पाहावे..जीवन-मृत्यूच्या सीमारेषेवरचाच हा खेळ! सहय़ाद्रीत फिरताना ही अशी त्याची अजस्र रूपे अनेकदा काळजात धस्स करतच अचानकपणे समोर येतात.या अंगालाच एका नाळेत गडाची पश्चिम वाट दडलेली आहे. जवळ जाईपर्यंत ती दिसत नाही. ऐन खडकात खोदून काढलेला हा दरवाजा! हडसर किल्ल्याची आठवण करून देणारा. खडकातच खोदलेल्या पायऱ्या, त्यावर त्याच कातळात कोरलेला दरवाजा, त्याच्या कमानीवर कोरलेल्या चंद्र-सूर्याच्या प्रतिमा, बाजूचे बुरूज असे सारे ऐन कडय़ावरचे दुर्गम शिल्प! गडाचा हा खरा तर राजमार्ग, पण हा मार्ग ब्रिटिशांनी सुरुंग लावून उद्ध्वस्त केला. हा दरवाजा मोठमोठय़ा शिळांनी चिणून गेला होता. नुकताच तो मोकळा केल्याने त्याचे आता दर्शन होते आणि पश्चिमेकडील राजमार्गावरही उतरता येते. पण या मार्गावरही एक-दोन ठिकाणी कडय़ाला बिलगावे लागते. ही वाट थेट नाणेघाटावर नजर ठेवतच उतरते. यातूनच तिचे इतिहासातील महत्त्व कळते.

आपण ती पाहात पुन्हा परत बालेकिल्ल्यावर निघावे. जीवधनचा बालेकिल्ला म्हणजे एक छोटीशी टेकडी आहे. या टेकडीवर एका उंच जोत्यावर गडदेवता जीवाबाईचे वृंदावन आहे. या देवीच्या नावावरूनच गडाला ‘जीवधन’ असे नाव पडले. या गडातील लेण्या व खोदीव टाक्या यावरून या गडाची निर्मिती सातवाहन काळातील वाटते. सातवाहनांनी खोदलेल्या नाणेघाटाच्या संरक्षणाची जबाबदारी या गडावर असावी. त्याच्याकडे तोंड करून असलेला राजमार्ग तेच सुचवतो आहे. सातवाहनानंतर थेट इसवी सन १४९० मध्ये निजामशाहीचा संस्थापक मलिक अहमद याने जीवधन ताब्यात घेतल्याचा उल्लेख मिळतो. दरम्यान, पुढे १७ जून १६३३ मध्ये निजामशाही बुडाली आहे, याच वेळी जीवधनच्या साक्षीने हिंदवी स्वराज्याचा एक ‘मिनी ट्रेलर’ इथे पार पडला.

या गडावर त्या वेळी निजामशाहीचा शेवटचा वंशज मूर्तझा निजामशाह कैदेत होता. निजामशाहीचे सरदार शहाजीराजे भोसले यांनी मूर्तझाची सुटका करून संगमनेरजवळच्या पेमगिरी किल्ल्यावर एका छोटय़ा समारंभाद्वारे त्याला निजामशाह म्हणून घोषित केले. निजामशाही टिकविण्याच्या निमित्ताने शहाजीराजांची ही स्वतंत्र स्वराज्यनिर्मितीचीच धडपड सुरू होती. या कामी त्यांना विजापूरचे सरदार मुरार जगदेव यांचीही मदत होती. कुकडी खोऱ्यातील शिवनेरी, हडसर, चावंड आणि जीवधन या किल्ल्यांच्या मदतीने त्यांनी योजलेली ही चाल मोगलांच्या लक्षात आली आणि मग हे आव्हान मोडण्यासाठी स्वत: शाहजहान दक्षिणेत उतरला. महमद आदिलशाहकरवी मुरार जगदेवची हत्या करण्यात आली. शेवटी उत्तरेच्या या प्रचंड फौजांपुढे निभाव लागणे कठीण दिसताच शहाजीराजांनी हे पाचही किल्ले मोगलांना दिले. त्यांचे भंगलेले हे स्वप्न पुढे त्यांच्याच मुलाने, शिवरायांनी सत्यात उतरवले.

जीवाबाईच्या टेकडीवर उभे राहिले की या प्रसंगातील शिवनेरी, चावंड, हडसर ही सारी पात्रे दिसतात. शहाजीराजांच्या पराक्रमाने ढवळलेले कुकडीचे खोरे दिसते आणि मग इतिहासातील हे स्वराज्याचे एकअंकी नाटय़ अधिक जिवंत वाटू लागते.

***************

# शेवटचा पुरावा

- मधुरा कुलकर्णी

"मैंने बोला ना एक बार..... मेरेको नै पता."
"तेच तर विचारतोय मी. क्या नही पता?"
"यही की खून कैसे हुआ?"
"मग? कैसे हुआ?"
"अब्बे घोंचू, जो नही पता वो कैसे बताएगा मैं?" एकदम टपोरी स्टाईल मध्ये उत्तर आले आणि केदारनी कमरेचा बेल्टच काढला.

सटाकंsss! सटाकंsss!
"अबे तेरी.....कितना जोरसे मारता है बे !"
"बोल.... का केलास खून? कसा केलास?"
"मैं बोला ना..... मैंने नै कियेलाए मर्डर! नै कियेलाए!" शेकाटलेलं बूड चोळत तो भिंतीला चिकटून उभा राहिला.
"अच्छा? मग काय करत होतास तू तिकडे?"
"मैं अपने पेट का वास्ते गएला था साब !"
"काय खानावळ होती तिकडे?"
"नै!"
"मग?"
त्याने नुसतीच मान खाली घातली.
"चोरी?"
त्याने खिशातून पंन्नास रुपयांची नोट बाहेर काढून केदारच्या हातावर दाबली.
"ये ले| लौटा दिया मैंने! पर ये मैं ने कुछ गलत इरादेसे नै कियेला| छोड अभी मेरेको!"
केदारने त्या नोटेकडे पाहिले. रक्ताने माखलेली ती नोट अर्धवट दुमडलेल्या आणि मधे एकच नेटकी घडी घातलेल्या स्थितीत होती.
"काय-काय पाहिलेस तिथे?"
"क्या देखेगा? कैसे देखेगा? अंधेरा था वहॉ पे| मै को तो चांदकी लाईट मे बॅग दिखी बस|"
"बाकी कोणी नव्हतं रस्त्यावर?"
"रात के ९ बजेले थे! और उस रस्तेपे ७ के बाद कोई नई जाता|"
"मग तू कसा गेलास?"

"देखने की कोई भूत-वूत है क्या|" उपरोधिक वाक्य कानाला खटकले. पण राग आवरत केदारने प्रश्न केला, "मग दिसलं कोणी भूत?"

"हॉ! और सिर्फ एकही नही, पाँच दिखे! जिप से आयेले थे! एक राज की बात बताऊ? उसमेसे एक मेरे सामने बेठेलाए| साssssला! बाकी के भूत डराकर मारते हैं| तू सवाल पुछ-पुछ के मार्रेलाए|"

केदारने बेल्ट उचलला. आणि पुन्हा राग आवरत खाली ठेवला.

"खरं नाव काय आहे तुझं?"
"तडका."
"काय?"
"त ड का"
"मी तुला तुझं नाव विचारलं."
"वईच तो बतारेलाए मैं..... तडका. यैच नाम से पैचानते है लोग मेरेको."
"बरं. मग तडका, तुला बॅग दिसली.... पुढे?"

"फिर मैंने वैच किया जो करनेके वास्ते तूने मेरेपे डिरेक्टली मर्डर का चार्ज लगाने का कोशीश किया|"

"जे विचारेन त्याचं नीट उत्तर दे. काय केलेस पुढे?"

"मैंने पर्स खोला, देखा तो बहुत माल पडा था अंदर| उसमेसे पचास का नोट निकाल रेला था और आप सब उधर टपक पडे.... और मेरे को उठालिया खाली फोकट|"

"म्हणजे तुला असं म्हणायचंय की तुझं लक्षही गेलं नव्हतं प्रेताकडे तोवर?"

"अबे यार| कितना थकेला आदमी है रे तू? एक ही सवाल कब से पूछे जा रेलाए घूमाफिराके|"

'सोचा था, रात को तो खाना खाने को मिलेगा| और देख क्या खारेलाए अभी|' तडका स्वतःशीच पुटपुटला.

"माझ्या प्रश्नाचं उत्तर देतो आहेस की....?" केदारने बेल्ट हालवून दाखवला.

"नै देखा रे मेरे बाप| तू आनेसे पेहेले नै देखा उस लाश को मैंने| आपून तो उधर सोने गएला था! पर्स दिखा तो सोचा खाना भी खालेगा पैसा मिला तो| " त्याने रागाने काटकुळे हात एकमेकांवर आपटून जोडून दाखवले.

"मग पळण्याचा प्रयत्न का केलास खून केला नव्हतास तर?"

'ये पागल है, या तो तडका को पागल बनाने मे लगा पडा है।'

"बोल.... का प्रयत्न केलास पळण्याचा?"

"तू क्या नया आया है क्या रे ? थोडा तो खूद का ब्रेन लगा.... मैं को लगा तू चोरी पकडने आया होएंगा| और तेरी जानकारी के लिये बताता है, चोरी करनाभी क्राईम ईच है| और चोरी करने के बादभी क्रायमर भागताईच है| अब 'क्यु' मत पुछना..... "

केदारने त्याच्याकडे डोळे बारीक करून तीव्र नजरेने पाहिले.

"अबे, तेरे जैसे आफसर अंदर डालके बंदर जैसे सवाल पुछेंगे तो भागना इच पडेंगा ना?"

"तुझी जीभ जरा जास्तच चालते नै का?"

"और दिमाग भी! तेरेसे तो अच्छाही चलता है।"

"काही जेवलायंस?"

"मुझे लगाही, तेरे सवाल खतम नही होनेवाले!" तो मघाच्याच प्रश्नोत्तरांच्या धुंदीत म्हणाला. "एक मिनट ...... माने आपून? Bक्या पुछा तुने?"

"काही खाल्लं नसशीलच ना?"

त्याने मानेनेच नकार दिला.

तडकाला ताळेबंद करून केदार टेबलाजवळच्या खुर्चीत येऊन बसला. हातातल्या नोटेला टेबलावर ठेवले. क्षणभर निरीक्षण करून त्याने पाटीलला हाक दिली.

"पाटील, या नोटेवर जे रक्त आहे ते मृत देहाचेच आहे ना याची खात्री करून घ्या. लगेच लॅब मध्ये पाठवा. मला परवा दुपारपर्यंत रिपोर्ट हवेत म्हणावं."

पाटील नोटेला प्लास्टिक कव्हर मध्ये टाकून घेऊन गेला तसा फोनचा रिसीव्हर उचलून केदारनी २ डोश्यांची ऑर्डर टाकली.

दरवाजा उघडण्याचा आवाज झाला तसा तडका भिंतीला पाठ ठेकवून उभा राहिला.

"अभी हो गया ना भिडू.... मेरेको इतना मार खाने की आदत नै है, मैं बतारैलाए| गलतीसे मैं मार खाते खाते मर-वर गया तो तेरेको भी डिसमैस करवा देंगे| मैं क्या बोलता है, क्यू खामखॉ तकलीफ लेनेका और देनेका?"

केदारने त्याच्या तुरुंगाचा दरवाजा उघडून आत प्रवेश केला तसा तडका बिथरला...."सून ना.... कल आ ना.... अभी आज का कोटा हो गया ना पुरा!" केदार पुढे आला. तडका काकुळतीला येऊन म्हणाला, "अबे, सच मे बहुत दुखरेलाए अभी|"

केदारने त्याच्या हातात पुडकं दिलं आणि तडका ते उघडून बघणार तोवर केदार पुन्हा बाहेर आला सुद्धा.

तडकाने आश्चर्याने हातातलं पुडकं उघडून पाहिलं आणि चटणी पसरवलेले दोन ताजे घमघमीत डोसे पाहून त्याच्या डोळ्यात टचकन पाणी उभं राहिलं.

केदार केसचे डिटेल्स लिहिण्यात व्यस्त झाला. मिळालेली माहिती अपूर्ण होती आणि त्यामुळे रकाने भरणे तितकेच अवघड होऊन बसले होते. पण साहेबांना रिपोर्ट हवा असतो दर महिन्याला! आणि ही केस सुद्धा महिन्याच्या शेवटीच यायची होती? काय लिहिणार? निनावी कॉल, खूनाची मिळालेली अर्धवट माहिती, अद्याप ओळख न पटलेले प्रेत...... त्यात भूरट्या चोराच्या कुठल्याच छबीत न बसणारा थकेलेला कम भूकेलेला चोर - तडका. ज्याला पंन्नासच्या दोन आणि शंभर च्या चार नोटा म्हणजे 'बहुत सारा माल' वाटतो. यापैकी रिपोर्ट मध्ये लिहिण्यायोग्य काहीही नव्हतं. लहानपणी 'गाळलेल्या जागा भरा' हा आवडता स्वस्तात मार्क देणारा प्रश्न मोठेपणी डोक्याचे दही करून सोडतो. शेवटी तो प्रश्न सोडून पर्यायी मार्ग निवडायचा. ही केस पुढच्या महिन्यात रिपोर्टला जोडायची म्हणून त्याने पेपर बाजूला काढून फाइल बंद केली. आणि घड्याळ बघितले. उशिरच झालेलाच होता नेहमी प्रमाणे. त्याने मोबाईल खिशात टाकला आणि कारची चावी घेऊन निघाला.

---

"काय रे.... किती उशिरा आलास!" मिनाक्षी डोळे चोळत हॉल मध्ये आली.

"अगं झोप, झोप!"

"अरे झोप काय? जेवायला देते चलं."

"अगं मी घेईन ना माझ्या हातांनी! तू झोप जा."

"नको.... राहू दे. सकाळी दुप्पट पसारा आवरावा लागेल मला. तू जा हात धू."

"पण मी कुठे पसारा....."

"केदार, पटकन फ्रेश होऊन ये." एक भुवई चढवून ती म्हणाली आणि केदारने बॅग जागेवर ठेवून मोबाईल चार्जिंगला लावला.

हात पाय धून बाहेर आला आणि मोबाईलकडे बघतो तर म्हात्रेचे दहा मिसकॉल येऊन गेलेले होते. मोबाईल अनलॉक करून कॉल करणार तोवर त्याच्याच कॉल पुन्हा आला.

"हॅलो."

"सर, म्हात्रे बोलतोय."

"हं, बोला!"

"सर, पोलिस निरीक्षक स्मिताबद्दल मी तुम्हाला सांगितले होते ना..... "

"हो. मी बघतो आहे त्यांच्या प्रमोशनच. त्यांचा रिपोर्ट भारावून टाकणारा आहे. मी त्यांचे नावं सुचवले आहे मिटींग मध्ये. बघू कोणाचे रँकिंग कसे येते आहे ते!"

"नाही सर.... त्याकरता कॉल नाही केला." म्हात्रेच्या आवाजातला कंप केदारला जाणवला.

"मग?"

"सर.... तुम्ही जो फोटो व्हॉटस अप केलात तो शुभांगीचा आहे."

"शुभांगी?"

"हो सर! माझी मैत्रीण शुभांगी आहे ती."

"ओह, आय सी! पेशाने कोण होत्या त्या?"

"वकिल..... LLB केलं होतं तिने. खूप मोठ्ठा धक्का बसलाय सर! हे असं अचानक कसं झालं?"

"अजून तरी काही कळलेलं नाहीये, म्हात्रे. पण उद्या तुम्ही या. ओळख पटवून स्टेटमेंट घ्यावे लागेल. आणि हो, तिच्या घरच्यांनाही कळवा."

"कोणाच्या?"

"शुभांगीच्या, म्हात्रे!"

"किती वाजता?"

"अकरा वाजता."

"सकाळी?"

'नाही.... रात्री! कोजागिरी आहे ना! सगळे मिळून मसाल्याच्या दुधाचे घोट घेत जागरणं करू! काय मुर्खासारखे प्रश्न आहेत, म्हात्रे?' अगदी केदारच्या जिभेपर्यंत आलेले शब्द! पण त्याला तडकाची आठवण झाली. फोडणीवाला नाही..... तुरुंगातला तडका! आपल्या प्रश्नांनी कंटाळून गेलेला. पण स्टेटमेंट असे अर्धवट, गृहीत धरून, बहुरुपी, बहुअर्थी आणि समोरच्याला वाचताना अक्कल वापरावी लागेल असे कसे चालेल? शब्द न् शब्द स्पष्ट वदवून घ्यावे लागतात. पण इथे म्हात्रेचे भलतेच प्रश्न सुरु! मैत्रिण गेल्याचा धक्का बसला असणार!

"सर?" काहीच उत्तर न आल्याने म्हात्रे ने हाक दिली.

"म्हात्रे...."

"हा सर, बोला ना.....काय झालं? " म्हात्रेने गडबडून विचारले.

"म्हात्रे, उद्या सकाळी क्राईम ब्रांच मध्ये भेटू सकाळी अकरा वाजता शुभांगीच्या संपूर्ण परिवारासोबत. ठिकेय?"

"हो...."
केदारने फोन ठेवला.
"केदार....." मिनाक्षीने हाक मारली.
"हो, आलो."

"गोळी मिळाली नाही? कसं शक्य आहे हे सावनी मॅम?"

"सर, पॉइंट ब्लँकने शूट केलयं. गोळी आरपार गेलीये."

"पण त्या परिसरात तर एकही गोळी सापडलेली नाही...... आणि बंदूकीतून निघाली तर कुठेतरी जाऊन गोळी पडली असेलच ना?" केदार हातात फोटो घेऊन शुभांगीच्या शरीराला पडलेल्या भगदाडाकडे पाहत म्हणाला.

"सर, ही सर्व बाजूंनी विचार करून घटनाक्रम आखून केलेली हत्या वाटते आहे." म्हात्रे म्हणाला.

"कश्यावरून?"

"सर, याला अनेक कारणे आहेत. ज्या रस्त्यावर हत्या झाली तो सुमसान होता. तिथे शुभांगी का गेली होती, यालाही काही ठोस कारण नाही. तिच्या जाण्या येण्याच्या मार्गावर हे ठिकाण येतच नाही. म्हणजे तिला तिथे बोलावले गेले असणार. शिवाय तिच्या पर्स मध्ये काही पैसेही होते. म्हणजे कारण चोरी नसणार. आणि जर बंदूक चालवल्यावर खुनी घाबरून पळून गेला असता, तर गोळी सापडली असती."

"तुम्हाला असं म्हणायचंय की....."

"हो सर, खूनी काही वेळ तिथेच होता. त्याने शुभांगीच्या मृत्यूनंतर रक्ताने माखलेली गोळी उचलली, सर्व पुरावे नष्ट केले आणि काही उरलेले नाही याची खात्री करून घेत त्याने ती जागा सोडली."

"हम्म. पण मग फोन कुणाचा आला होता पाटीलला?"

"कदाचित त्याने पाहिली असेल हत्या होताना..... आणि घाबरून लपून बसला असेल. नंतर पोलिसांना फोन केला असेल." स्वतःशीच बोलल्यासारखं शेवटचं वाक्य म्हात्रे हळू आवाजत म्हणाला.

"पण मग त्याने खुन्याचे आणि खून कसा झाला त्या प्रसंगाचे वर्णन न सांगताच का ठेवला फोन?"

"तो घाबरला असेल."

"कोणाला?"

"बहुतेक ज्याने खून केला त्याला किंवा....." म्हात्रे बोलताना थांबला आणि त्याने बिचकून सावनी आणि केदारकडे पाहिले.

"किंवा?" सावनीने विचारले.

"दुर्दैवाने पोलिस चौकशीला गुंडांपेक्षा सामान्य नागरिक जास्त घाबरतात, सर."

"म्हात्रे, तिच्या घरच्यांनी दिलेले स्टेटमेंट..... त्यांना तर हे माहितीच नव्हतं, की ती ऑफिस मधून लवकर निघाली आहे."

"एका वकिलाला असा शत्रू असू शकतो? इतकं वैर की सरळ जीवच घ्यावा?"

"म्हात्रे....."

"तिच्या घरच्यांना कसे सावरावे लागले सर.... पाहिलेत ना?"

"हो, म्हात्रे. पण आता ती केवळ एक बळी आहे.... एक व्हिक्टम."

"सर, माझी मैत्रीण होती ती."

"म्हात्रे, भावनिक होऊ नका."

"सर...."

"तुम्ही तिच्या घरच्यांसमोर ज्या विश्वासाने म्हणाला होतात ना की तुम्ही गुन्हेगाराला शिक्षा द्याल, त्याच विश्वासाला गृहीत धरून तुम्हाला या केस मध्ये घेतलंय मी."

"सर, मी बाकीचे डिटेल्स पाठवून दिलेत रिपोर्ट मध्ये. पण एक मान्य करावे लागेल की जो कुणी आहे त्याने खरचं एकही पुरावा सोडलेला नाहीये मागे. आणि ज्याने फोन केला त्याने इंग्लिशटरनेट कॉल केला होता. त्यामुळे ना नंबर कळू शकलाय आणि ना IP ट्रेस होतो आहे. प्रॉझी वापरला असेल." सावनीने म्हणाली आणि कॉफीचा मग घेऊन ती पुढच्या कामाला लागली.

---

"हॅलो, पो.... पोलिस?"
"हो, बोला?"
"एक प्रेत मिळालेले आहे."
"कुठे?"
"बनगार्डन."
"तुमचे नाव काय?"
"सोहम..... सोहम सुरवसे."
"तुम्ही खून होताना पाहिलाय?"
"नाही. प्रेत पाहिले फक्त."

"ठिक आहे, आम्ही येतोय.... प्रेताला हात लावू नका आणि सगळ्यांना बाजूला थांबायला सांगा."
"हो सर."

---

बनगार्डनला म्हात्रे पोचला आणि चौकातच घोळका पाहून त्याच्या कपाळावर आठ्या चढल्या. जिओ फ्री सिम करता दुकानापुढे गर्दी करावी तशी गर्दी लोकं प्रेत बघायला का करत असावीत हा प्रश्न त्याला कैकदा पडायचा.

"सरका.... सरका.... बाजूला सरका!" वाट काढत धक्काबुक्की करत म्हात्रे घोळक्याच्या मध्यस्थानी पोचला तेव्हा त्याचा शर्ट अर्धवट इस्त्री करून बुचगावण्याला बसवल्या सारखा दिसत होता. डाव्या हाताची दोन आणि उजव्या हाताचे एक बटण तुटले होते. तो काही ओरडणार तोवर त्याला त्याचीच चूक लक्षात आली. माहिती मिळाली की आहे तसे उठून क्राईम सीनला धावत जाणे ही त्याची सवय! घरातून हातात मिळेल तो शर्ट चढवून त्याने चप्पल पायात सरकवली होती. आज अंगावर वर्दी असती तर सगळ्यांनी स्वतःहून बाजूला होत त्याला मार्ग दिला असता. त्याला की वर्दीला? काहीही असो.... हे वर्दी न घालता गर्दीत घुसणे जोखमीचेच!

"ए.... सगळे बाजूला व्हा. मी पोलिस आहे."

तो ओरडला तेव्हा आधी सगळे त्याच्या आवाजाला घाबरून त्याच्याकडे बघू लागले. धगळपगळ शर्ट आणि पायातली फँसी चप्पल पाहून त्या भयंकर प्रसंगातही एकच हशा पिकला. तेव्हड्यात जिप सकट केदार घटनास्थळी पोचला.

"म्हात्रे?"

सगळ्यांची नजर केदार कडे गेली. आणि पोलिसांची व्हॅन पाहून तिथून अनेकांनी पाय काढता घेतला.

म्हात्रेने सुटकेचा श्वास सोडला.

"तुम्ही अश्या अवस्थेत इथे?"

"सर या खुनाची टिप मिळाली फोनवर." म्हात्रेने मागच्या बाजूला पडलेल्या प्रेताकडे बोट दाखवले.

केदारने नजरेने म्हात्रेला जवळ बोलावले. हवालदाराला ऐकू जाणार नाही अश्या आवाजात कुजबुजला, "तुम्ही बहुतेक तुमच्या पत्नींची चप्पल आणि मेहुण्यांचा शर्ट घालून आला आहात म्हात्रे!"

म्हात्रेने चपलेकडे बघितले आणि ओशाळला.

केदारने प्रेताकडे नजर टाकली. गुढघ्यावर बसून त्याने प्रेताच्या कपाळाला मधोमध रक्ताळलेली जखम वजा पोकळी दिसत होती.

"कोणी पाहिले होते का खून होता ना?" केदारने आवाज दिला.

कोणी काहीच बोलले नाही.

"फोन कोणी केला होता पोलिसांना?"

गर्दीतून एक माणूस पुढे आला.

"सर, मी! मी सोहम."

"सोहम सुरवसे ना?" म्हात्रेने विचारले.

"हो सर. पण खून होताना नव्हता पाहिला मी. आरडाओरडा ऐकला आणि बघितले तर हे असे रक्ताच्या थारोळ्यात पडलेले. म्हणून कॉल केला."

"ठिक आहे. पांडे यांचे डिटेल्स लिहून घ्या. आणि सोहम, तुम्ही स्टेटमेंट द्यायला पोलिस स्टेशनला या."

पोलिस स्टेशनला या ऐकल्यावर सोहमचा चेहरा खाडकन पडला. होकारार्थी मान हालवत पांडेला नाव नंबर लिहून देण्यात व्यस्त झाला.

"सर, मी पाहिले आहे याला." प्रेताचा चेहरा निरखून पाहत म्हात्रे म्हणाला.

"हो? कुठे पाहिले म्हात्रे?" केदारने फोन हातात घेऊन प्रेताचे फोटो घेतले.

"शुभांगी सोबत!"

"काय?"

"हो सर!"

"कधी?"

"याच्या कोर्ट हिअरिंगच्या वेळी!"

"नीट सविस्तर सांगा."

"सविस्तर आठवत नाही. मी ड्युटीला होतो कोर्टाबाहेर आणि तेव्हा शुभांगीशी भेट झाली. हा पण होता सोबत."

"काही बोलणं झालं?" केदारने पाटीलला मेसेज टाईप करत विचारलं.

"फार काही नाही. म्हणजे निदान माझ्यासमोर तरी नाही. आम्ही ओळखीचे हसलो. 'कशी आहेस', 'खूप दिवसांनी....' वगैरे बोललो.... आणि हिअरिंग होती म्हणून ती निघून गेली."

"ओह्ह..... नेमका किती वेळ झाला असेल या भेटीला?"

"३-४ महिने साधारण!"

पाटील रुग्णवाहिका घेऊन पोचला. आणि त्याने प्रेताला उचलण्याकरता सोबत आणलेल्या माणसांना सुचना द्यायला सुरवात केली.

---

"म्हात्रे, तुमचं निरीक्षण उत्तम आहे. केस डिटेल्स मिळाल्या सानिकाला. प्रेत अहमदचेच होते. वकिल बाईंचा.... म्हणजे शुभांगीचा अशील...."

"मला वाटतं सरं, मी केसचा अभ्यास करतो डिटेल मध्ये. मग अनेक गोष्टीहाताला लागतील."

"सानिकाने आधीच पुर्ण माहिती काढून ठेवलेली आहे. हॅव अ लूक!"

म्हात्रेने फाईल हातात घेतली आणि पाने चाळली.

"सर, दोघांच्या खूनामागे काहीतरी कनेक्शन आहे असा संशय होताच मला. पण आता खुनीही मिळाला." म्हात्रे आत्मविश्वासाने म्हणाला.

"कोण? निशा अगरवाल? रेप व्हिक्टम?"

"हो सर. त्याच रेप केसमुळे घडलंय हे सगळं."

"पण ती तर हॉस्पिटलमधून गायब झाली होती ना?" केदारने चहाचे गरम गरम घोट पोटात ढकलत विचारले.

"आणि सर तिचा फोटो मिसिंग आहे रेकॉर्ड्स मधून." सानिकाने NA लिहून रिपोर्ट फाईल बंद केली.

"सगळा शोध इथे येऊन संपतो थोडक्यात."

"असं का म्हणताय सर?"

"म्हात्रे, ना आपल्याला वेपन सापडलंय, ना मोटीव असलेली व्यक्ती! एव्हढ्या गर्दीत असताना खून झाला.... ते ही गनला सायलेंसर लाऊन. म्हणजे जबरदस्त प्रिप्लॅनिंग आहे. याही वेळी आपल्याला गोळी सापडलेली नाही. आता प्रेताजवळ आधीच अनेकजण उभी होती. किती जणांची चौकशी करणार तुम्ही?"

"सर, एक गोष्ट मला खटकते आहे."

"कोणती सानिका?"

"हॅव अ लूक ॲट हर बँक अकाउंट ट्रांझ्याक्षनस!"

केदारने हातात दिलेल्या प्रिंटवर नजर टाकली. म्हात्रेनेही केदार जवळ सरकून त्या पेपरवर डोळे स्थिरावले.

"शुभांगीच्या रेग्युलर फीजपेक्षा कैक पटीने जास्त आहे ही रक्कम." म्हात्रे उद्गारला.

"ह्या व्यतिरिक्त फी म्हणून तिच्या अकाउंटला काहीही जमा झालेले नाही. म्हणजे....."

"म्हणजे काय म्हणायचंय तुम्हाला सानिका मॅम? शुभांगीने या केसकरता जास्त पैसे चार्ज केले? ते पण दहापट?"

"इतकंच नाही म्हात्रे, ही रक्कम ज्या व्यक्तीने बँकेत जाऊन भरली तिने बुरखा घातला होता."

"पण ती व्यक्ती एक पुरुष होता..... हेच ना?" सानिकाचे वाक्य पुर्ण करत केदार म्हणाला.

"कसे ओळखलेत सर?" सानिकाने अचंबित होऊन विचारले.

"त्या cctv च्या फुटेज वरून! चाल पाहून कुणीही सहज सांगेल.... ओळख लपवायला पायघोळ पोषाख घातला पण बाकी चाल बदलायला विसरला तो...... अहमदला वाटलं त्याला कोणीच ओळखणार नाही."

"म्हणजे.....शुभांगीचा अशिल?"

"हो, म्हात्रे! रेप केस जिंकण्याकरता त्याने फी पेक्षा खूप जास्त रक्कम भरली..... तेही वेश बदलून!"

"इतकंच नाही सर, ही केस रेप व्हिक्टमच्या बाजूने स्ट्राँग होती. तरीही केस मात्र अहमद जिंकला..... शुभांगीमुळे. तिने सर्व पुरावे फिरवून दिले." सानिका म्हणाली तसा म्हात्रे गपकन खुर्चीवर बसला. चेहऱ्यावर धक्का लागल्याचे भाव स्पष्टपणे झळकत होते.

"म्हणूनच म्हणालो, म्हात्रे. इथे येऊन आपला शोध संपतो. त्या केस नंतर शुभांगीने एकही महत्त्वाची केस घेतलेली नव्हती. केवळ नोटरीची कामे केली असावीत. त्या दोघांचा लगोलग झालेला खूनही हेच सूचित करतो. म्हणून संशय केवळ अनुराधावर जातो, जी missing आहे. ना तिचा फोटो आहे आपल्याकडे, ना वर्णन करायला कोणी! तिचे नाव सोडले तर बाकी काही हाती नाही. आता आपल्याकडे कोणतेही पुरावे नाहीयेत. फक्त लॉजिक आहे. ज्यावर आपले सिनिअरस विश्वास ठेवणार नाहीत."

"सर, अनुराधा हॉस्पिटल मधून पळून गेली त्या नंतर तिची काहीच माहिती नाही. चौकशी करायला तिच्या घरच्यांचाही पत्ता नाही. अगदी मिसिंग म्हणूनही रिपोर्ट करायलाही कोणी आलं नाही." सानिकाने ३ महिन्यांआधीची जुनी फाईल काढली आणि एकदा चाळून जागेवर लावली.

"पाटील.... पाटिल...." केदारने हाक दिली तसा पाटील धावत आला.

"हा सर?"

"त्या तडकाला सोडून द्या."

"कुनाला सर?"

"अरे तो..... चोर! वकिलबाईंच्या पर्स मधून पैसे चोरताना ज्याला पकडला तो!"

"हा सर!"

---

केदार खुर्चीवर येऊन टेबलावर डोकं टेकणार तोवर आतून तडकाचा आरडाओरडा ऐकू आला.

"पाटील, मारू नको त्याला. जाऊ देत." बसल्या जागेवरूनच केदारने जेलच्या खोलीपर्यंत आवाज जाईल अश्याप्रकारे ओरडून सांगितले.

"ओ सर, म्या नाय मारत त्याला. त्यो भाईर निघत न्हाईये."

'काय?' दिवसभराच्या धावपळीने थकलेल्या केदारला खुर्चीतून उठणे म्हणजे मोठे जड काम वाटू लागले होते. पण वाढत्या आरडाओरड्याने डोकेदुखी नक्की होईल म्हणून केदार एकदाचा चिडून जागेवरून उठला.

"काय झालंय पाटिल?" असं म्हणत त्याने भिंतीला पाठ लावून उभे राहत म्हणायला आणि समोरचे चित्र पाहून हसू फुटायला एकच गाठ पडली.

पाटील तडकाला धरून बाहेर खेचत होता आणि तडका रेटा देत त्याच्यासकट पुन्हा मागे जात होता.

"हे काय चालू आहे?" हसू आवरत उसना राग आणूत केदारने विचारले तेव्हा कुठे दोघांची कबड्डी थांबली.

"बघा ना साहेब.... हे येतच न्हाय भाईर." पाटिलने तक्रारीचा सूर धरला.

केदारने आश्चर्याने विचारले, "काय रे तडका? मार आवडायला लागला की काय?"

"साब, चाहे तो मार बी खायेगा आपून.... लेकिन यहाँसे नई जाएगा!"

"तुला काय वेड बिड लागलंय का? कशाला रहायचंय इकडे?"

"साब, आपून नई जाएगा! बतारेलाए आपून!"

"पर मी तर म्हनतो याला घालवाच. जेलच खान हा असं हादडत्यो, जसा का 'बा'चाच माल हाय याच्या!"

"साब, आपून नई जाने वाला! इस बटाटेवडे को जितना बोलने का हैं, मारने का हैं, आपून रेडी हैं....."

"अरे भूसनळ्या...." पाटिल चिडला.

"जर मी तुला माझ्या घरी काम दिलं तर? तरी इथेच राहायचंय तुला?" पाटील त्याला फटकवणार त्याआधी केदारने विचारलेला प्रश्न पाटीलच्या कानाला टोचला.

तडकाने आश्चर्याने केदारकडे पाहिले.

"बघ! ऑफर काही वाईट नाहीये." केदारने हसून म्हटले.

"खाना मिलेगा?" तडकाने आशादायी डोळ्यांनी केदारकडे पाहत विचारलं.

"इथे मिळते त्याहून जास्त छान! आणि तुला कोणी मारणारही नाही."

"सच में?"

"हो."

"और सवाल भी नई पुछेगा आढेतेढे और बिना सिरपैरके?" उत्साहाने त्याने विचारले.

"नाही."

पाटिलकडे बघून गाल वाकडा करून बघितले आणि तडका स्वतःहूनच आनंदाने जेलमधून बाहेर आला.

"साहेब, ह्यो डोकेदुखी हायं बरं का!"

केदार नुसताच हसला आणि एकदाचे टेबलाजवळच्या खुर्चीवर येऊन बसला. काही क्षण त्याने टेबलावर डोके टेकवले. क्षणभर डुलकी लागली असेल त्याला. उठला तेव्हा समोर चहा घेऊन तडका उभा!

"माझ्याकरता?"

"हा साब| इस टपरी का चाय वाला पेहेचानवाला निकला आपून का|"

"बरं." चहा पिऊन पुन्हा रिफ्रेश झाल्यासारखं झालं.

"साब, घर कब चलेगा?"

"जाऊयात, जाऊयात. हा रिपोर्ट लिहितो आणि मग निघूच."

"साब, वो तो पुरा कर दियेलाए!"

केदारने आश्चर्याने पाने उलटून पाहिली. सही सोडून बाकी सगळे डिटेल्स भरून 'डेडएंड' लिहून 'closed' चा शिक्काही मारून ठेवला होता.

"हे कोणी पुर्ण केलं?"

"बटाटावडे का काम है साब."

"अरे तो स्वतःच वेळेत पूर्ण करत नाही. आणि आज माझंही पूर्ण करून ठेवलं त्याने? कसंकाय?"

"आपूनने उसको सच बोल डाला ना|"

"काय? कोणते सत्य सांगितलेस?"

"यईच की अगर उसको प्रोमोशन मंगता है, तो साब का काम भी करके रखने का होता है|"

केदारला काय बोलावे कळेना. मिश्किलपणे हसून त्याने बॅग खांद्याला लावली.

---

"अरे वाह, आज लवकर आलास!" मिनाक्षी हसून म्हणाली.

"हो. हे बघ सोबत कुणाला घेऊन आलोय!" त्याने तडकाकडे मान वळवली.

"हे कोण?" तिने त्याच्या मळक्या अर्धवट फाटक्या कपड्यांकडे पाहत विचारले.

"तडका. आपल्याकडे स्वच्छतेचे काम करणार आहे."

"अरे वाह! ये ये.... तू पण ये! हे बघ घर मी रोज सकाळी झाडते, आता तू झाडत जा! किचन मध्ये आठवड्यातून एकदा डबे आतून बाहेरून साफ करून घेत जाऊयात. ठिक आहे?" मिनाक्षी तडकाला आनंदाने घर दाखवत आणि कसं साफ करायचं याची गाथाच ऐकवत होती. तडकाही घर उत्साहाने पाहत होता.

"बाहेर सोसायटी वॉचमनसाठी ठेवलेली खोली रिकामी आहे ना? याची तिकडे व्यवस्था लावतो."

"हो, पण आत्ता दोघे जेवून घ्या."

"तडका,तिला स्वयंपाक स्वतःला करायला आवडतो हा. त्यात तिला मदत केलेली चालते, पण दुसऱ्या कोणी स्वयंपाक केलेला आणि वाढलेला खपवून घेत नाही हं ती."

तडकाने सगळं काही समजल्यासारखी  होकारार्थी मान हलवली.

मिनाक्षीने ताटं वाढली. त्या खमंग वासाने आणि पूर्णांन्नाने भरलेल्या थाळीकडे पाहून तडकाच्या चेहऱ्यावर स्वर्गसुख मिळाल्यासारखा  आनंद पसरला होता.

---

"म्हात्रे, तुम्हाला सांगितले ना मी..... ती केस संपली आहे आता. सतत मला कॉल करून ती रिओपन करायला सांगून काय फायदा आहे? एक काम करू. तुमच्याच हातात देतो ही केस रिपोर्टओपन करून.... घ्या काय शोध घ्यायचाय तो! पण मी पुन्हा माझ्या टीमला अश्या डेडलॉक केस मध्ये इंवॉल्व करणार नाहीये." केदारने कॉल डिस्कनेक्ट केला.

"साब.... साब.... ये देखो आपून को क्या मिला|"

एका हातात मळकट फडक आणि दुसऱ्या हातात काही कागदपत्र घेऊन तडका उभा होता.

"ये कचरा है की कामकाज का है समझ नै आरेलाए आपून को| क्या करनेका इसका? फेकने का के रखने का?"

केदारने त्यावर नजर टाकली. अनुराधाचे नाव वाचून त्याला क्षणभर कसंतरीच वाटलं. ते रिपोर्टस.... त्या जखमा..... तो त्रागा..... तो त्रास.... ती आर्त किंकाळी..... ते हृदयद्रावक रडणं..... त्याच्या डोळ्यांपुढे तो ४ महिन्यांआधीचा काळ उभा राहिला.  अनुराधाचे जखमी शरीर.... किंबहुना शरीराची केवळ लक्तरे वाटावीत, अश्या स्थितीतला तो देह! आणि तो पाहून बघणाऱ्याच्या मनात धगधगणारा ज्वालामुखी! डॉक्टरांनी प्रयत्न करून तिला जीवन दिलं..... पण बघणाऱ्याला ती मृतच भासत होती..... तिला काय माहित होते, दुर्दैव तिथेच संपणार नव्हते! कोर्टात पुन्हा पुन्हा तिच्यावर शाब्दिक बलात्कार होत राहिले. लक्तरे होत राहिली.... बातमी ऐकून घरच्यांनी नाते तोडले..... 'चारित्र्य भंग केलेस ते केलेस, वर कोर्टात जायची काय गरज होती?' असे शब्द साक्षात घरच्यांकडून आले आणि एकही कोपरा वाचला नाही. जखमांनी ग्रासलेली ती..... हॉस्पिटलच्या टेरेसवर उभी होती! तिला अंग झोकून द्यायचं होतं..... एक पाय तिने टाकलाच होता पुढे. तिला अडवले नसते तर लोकांनी 'खोटी केस केल्याचे सिद्ध झाल्याने आत्महत्या'  म्हणून त्याची ब्रेकिंग न्यूज करायला मागे पुढे पाहिले नसते. तिच्याबद्दल कळले नसते आणि धावत तिला बघायला गेलो नसतो तर अगदी तेच होणार होते.

तिच्या तोंडून तिचा भूतकाळ ऐकताना अक्षरश: पाणी भरलं होतं डोळ्यांत. सगळ्यांचाच राग आला होता. त्या अहमदचा, त्या वकिलबाईचा, तिच्या घरच्यांचा......! शाळेत असताना कायम मॉडर्न फॅमिलीतली जिला समजायचो, तिचे घरचे तसे नव्हते अजिबातच!

पण या सगळ्यात एक वाक्य पटलं होतं. खरतरं मलाही पडलेला प्रश्न होता तो! 'कोर्टात जायची काय गरज?' तसही, 'शहाण्याने कोर्टाची पायरी चढू नये' म्हणतात.

आणि जर वकिलिणबाई पुरावे मिटवू-फिरवू शकतात, तर एक क्राईमब्रांचवाला का नाही?

बलात्कारी केवळ अहमद नव्हता, शुभांगीसुद्धा होती. त्या विकृतीला मदत करणारी! ते दोघे नष्ट झाले तर ना देशाचे नुकसान होते, ना मानवतेचे! हं.... कायद्याचे झाले असेलही, पण अपवाद तर प्रत्येक नियमाला असतो.

तशी ही जास्त मोठी रिस्क नव्हती. शेवटी गोळी गायब करायला का होईना, सर्वात आधी मीच पोचणार होते तिथे! अहमदच्या वेळी म्हात्रे आधी पोचला तेव्हा क्षणभर बंदूकीची गोळी त्याला मिळाली असेल की काय अशी भिती वाटली. पण त्याच्याच समोर मी गोळी कधी उचलून खिशात घातली, ते अगदी म्हात्रेलाही समजले नाही!!

मी अनुराधाकरता पहिल्यांदा कायदा मोडला होता..... मोडावा लागला! हॉस्पिटल तिच्याकरता सुरक्षित वाटतं नव्हतं....... माझ्या घरापेक्षा दुसरं काय सुरक्षित होतं तिच्याकरता? पण तिला कसं शक्य होतं सगळ्या आठवणी घेऊन जगणं? शेवटी....'

"टिचिक..... टिचिक" तडकाने चुटकी वाजवली.

"साब, क्या करने काए इसका?"

केदार भूतकाळातून बाहेर आला. त्याने पुन्हा कागदपत्रांकडे पाहिले.

"जाळून टाक."

"शेकोटी बनानेका है? पर साब, अभी तो हिवाळा चलरेलाए ना?"

"तरीही.... जाळून टाक."

"आपून ले जाएगा तो चलेगा क्या साब? हिवाळा मे इसको शेकोटीमें जलाएगा|"

"त्याकरता मी दुसरे कागद देईन.... पण हे आत्ताच जाळ. नाहीतर दे मला, मी जाळतो....." केदार उठू लागला.

"अरे बेठो साब. जलाताए ना आपून. तूम बैठो!"

तडकाने बाहेर नेऊन कागदांचा तो गठ्ठा बाहेर ठेवून त्यावर माचिसबॉक्सच्या कडेच्या भागावर खर्रकन घासून जळकी काडी टाकून दिली.

मिनाक्षीच्या नजरेला हे पडायला नको होते. पुन्हा जुन्या आठवणी नकोत म्हणून बदललेले नाव आणि ओळख शाबूत राहण्याकरता हे गरजेचे नाही का?

केदारने टिव्ही वर बातम्या लावल्या. मिनाक्षीसुद्धा समोर येऊन बसली.

'बनगार्डनजवळ भर गर्दीच्या रस्त्यावर एका होतकरू तरुणाचा झालेला खून हे हिंदू पुरोगामी लोकांचे कृत्य असण्याचा संशय व्यक्त केला जातो आहे. या व्यक्तीचे नाव अहमद असून त्याच्या बरोबर कपाळावर निशाणा साधला गेला होता. on the spot त्याचा मृत्यू झालेला आहे.'

मिनाक्षीला धक्काच बसला. मिनाक्षीच्या डोळ्यांत सारे भाव दाटून आले होते. एक वेगळंच समाधान पसरलं होतं. आनंदाने डोळ्यांतून काही थेंब घरंगळले.

"केदार..... हा..... तो.... यानेच मला..... तोच हा...."

केदारने तिच्याकडे नुसतेच पाहिले. तिच्या चेहऱ्यावरचा आनंद तो टिपून घेत होता.

"काय गं?"

"काही नाही." तिने डोळ्यांतले पाणी पुसले.

'मला माहितीये, केदार, तुला मी जुन्या आठवणी आणि अगदी जुन्या नावापासूनही दूर ठेवायचे आहे. पण खऱ्या अर्थाने आत्ता माझ्या भूतकाळाने माझी पाठ सोडलीये.' केदार कडे बघताना तिच्या मनात हे सारं उमटून गेलं. जखडून ठेवलेल्या व्यक्तीचे साखळदंड तुटावेत तसे तिला आता भूतकाळाच्या पाशातून सुटल्यासारखे मोकळे वाटू लागले होते. ती किचनकडे निघाली.

"काय गं, कुठे चाललीस?"

"बासुंदी बनवायला." तिने आनंदा-ने ओरडून सांगितले.

केदारही आता आरामात बातम्या बघत बसला होता. पत्रकारांच्या अनाकलनिय अश्या तर्क-वितर्क ऐकून हासत होता.

तडका कागद जाळून घरात आला आणि उरलेली साफसफाई करू लागला. त्याला जराही कल्पना नव्हती की त्याच्याही नकळत त्याने शेवटचा पुरावासुद्धा साफ करून टाकला होता.

# कशी साजरी करु दिवाळी

- सौ. संध्या भावे

कशी साजरी करु दिवाळी ला ग बाई दिवाळीला
महागाईने केला कहर
रोज च अहे महिना अखेर
पगार तयार नाही वाढायला
कशी साजरी करु दिवाळीला

पाऊस बाई रोजच पडतो
हिवळा की पावसाळा कळतं नाही
पावसाची सर तयार नाही थांबायला
अन कशी काढू मी रांगोळीला
कशी साजरी करु दिवाळीला

लाडू करंज्या करु म्हंटल
चकल्या नाही तळायला घेतल
सर्दी खोकल्यने डोके वर काढले
गर्दी वाढली दवाखान्याला
कशी साजरी करु दिवाळी ला

आकश कंदील छत्री खाली
पणत्या लावल्या छताखाली
फटाके लागले भिजायला
अन फुलबजी लगली रडायला
कशी साजरी करु दिवाळीला

चला एखाद्या आश्रमात जाऊ
त्यांच्या संगे फरळ खाऊ
उजळले ले चेहरे पाहू
नाही तोटा आनंदाला
अन साजरी करु दिवाळीला

***************

# सखे तूच आहेस गझल

- ज्योत्स्ना चांदगुडे

सखे तूच आहेस
तुझ्या चित्रपटाची नायिका
जग तुझ्या मनासारखं
हो कधी तू मुलगी
कधी बहीण कधी पत्नी
आणि कधी आई
बन कुणीही पण
गुंतून पडू नकोस त्याच त्या प्रतिमेमध्ये
जगायला शिक मात्र तुझ्याच मनासारखं

सखे आहेस तू
तुझ्या घराची बॉस
तुला हवं तेव्हा आणि तेव्हाच
तू काम कर
इतरांवर हुकूम सोडायला शिक
इतरांकडून कामं करवून घे
कधीतरी आरामही कर
तुझ्या अस्तित्वाची जाणीव
इतरांना करून दे
पण जग मात्र तुझ्याच मनासारखं

सखी तू आहेस जन्मसिद्ध देवी
कधी सरस्वती कधी शारदा
अन्नपूर्णाही तूच आहेस
पण नुसती विशेषणे लावून घेऊ नकोस
तुझ्यात अंश आहे
कालीचा , दुर्गेचा हे विसरू नकोस
वेळोवेळी तुझ्यातल्या योग्य
देवीला निवड
आणि जग मात्र तुझ्याच मनासारखं

सखे तू आहेस तूच
कुठे बोलायचं काय बोलायचं
ते तुझं तूच ठरव
तुझ्या कपड्यांची निवड
तुझी तूच कर
तुझा मेकअप तुझी लिपस्टिक
हा तुझाच अधिकार आहे
आणि राहील
सखे तू कुणासारखी नाहीच
लक्षात ठेव
तू तुझ्याचसारखी
म्हणूनच सखे जग मात्र
तुझ्याच मनासारखं

सखे जगत राहा
सखे तू म्हणूनच राहा .

**************

# मोठ्यांचे आशीर्वाद का घ्यावे

- कु. प्रियांका हेमंत पई

ह्या प्रश्नाच्या उत्तरात दडलेलं वैज्ञानिक महत्त्व तर सर्वश्रूत आहेच. परंतु आणि एका दृष्टीने ह्या विषयावर प्रकाश टाकू इच्छिते.

माणूस आपलं पोट भरण्यासाठी प्रचंड मेहनत करतो, खस्ता खातो. आपल्या सृष्टीत उपलब्ध असलेले resources हे माणूस किंबहुना ह्या पृथ्वीवर उपस्थित असलेल्या जीव सृष्टीच्या मानाने खूपच कमी आहेत. म्हणून ते कमी प्रमाणात उपलब्ध असलेले resources मिळवण्यासाठी माणूस स्वार्थी बनतो, आणि ह्या मनुष्यरूपी प्राण्यामध्ये चढाओढ चालू होते - ते resources मिळवण्याकरीता. "एकाचा फायदा हे दुसऱ्याचं नुकसान"- अशी म्हण प्रचलीत आहेच. मग 'तो फायदेशीर' माणूस आपण असावा असं प्रत्येकाला वाटतं. त्यासाठी माणसं एकमेकांच्या मार्गात अडथळे निर्माण करतात, क्रूर कृत्य करतात. मग ही नको असलेली आव्हानं नशीबात कमी यावीत, किंबहुना त्या आव्हानांतून उभारण्याचं बळ मिळावं म्हणून आपल्याला luck factorची गरज भासते. तेच luck factor बळावतं ते मोठ्यांच्या आशीर्वादातून.

आपल्या वडीलधाऱ्या माणसांनी खूप खस्ता खाल्ल्या असतात. झगडून-धडपडून स्वतःच्या आयूष्यात उभे राहिलेले असतात, नाहीतर तग तरी धरलेली असते. ह्या process मध्ये involve असतात ते त्यांच्या इच्छा, अपेक्षा, भावना, ambitions इत्यादी बाबी. त्यांना जगाचा अनुभव आलेला असतो. निदान त्या बाबतीत तरी ते आपल्याहून कायमच श्रेष्ठ ठरतात.

आपण त्यांचेच वंशज असतो. आपल्यात त्यांच्याच गुणांची-अवगुणांची सरमिसळ असते. जरी आपल्याला सामोरे जावे लागणारे अनुभव हे तंतोतंत त्यांच्या अनुभवांशी साधर्म्य साधत नसले तरी त्या मागची मूळ 'कारणं' ही सारखीच असतात .

मोठ्यांचे आशीर्वाद हे आपल्याभोवती 'सुरक्षाकवज' निर्माण करतात. आपल्या 'luck factor' मध्ये सकारत्मकतेची भर पडते आणि आपण ज्या गोष्टी मिळवण्यासाठी जे मनापासून मेहनत घेतो, ती गोष्ट आपल्याला वेळ आली की मिळतेच.

***************

# तळघरे

*- अज्ञातवासी*

रात्रीचा एक वाजला होता. त्याने शेवटी पुस्तक वाचून संपवलं, आणि शांतपणे डोळे मिटले.

'चला, आजचं पुस्तक संपलं. उद्यासाठी शोधाशोध करायला हवी.' तो स्वतःशीच म्हणाला. गेले काही दिवस तो एकाच लेखकाची पुस्तके वाचत होता, त्यावर समीक्षण लिहीत होता, लोकांशी वाद घालत होता.

जरा आल्हाद थंड हवा सुटली होती. हा गारवा नैसर्गिक होता. 'लेखनातला अनैसर्गिक थंडावा कसा जाणवत असेल?' त्याने मनाशीच विचार केला.

तो उठला, पंखा थोडा कमी केला. आणि त्याने शांतपणे डोळे मिटले.

खालून काहीतरी दणदणीत आवाज येत होता.

"आई, बाबा..." त्याने हाक मारली.

खाली भयाण शांतता होती. फक्त तो दणदणीत आवाज. दरवाजावर दणके दिल्यासारखा.

तो अनिच्छेने खाली उतरला.

त्याने बटन दाबून बघितलं. वीज गेली होती वाटतं. तेवढ्यात एका थंडगार झुळुकीने त्याच्या अंगावर शहारा आला.

दण!!!दण!!!

बाबांच्या खोलीतून आवाज येत होता.

त्याला भीती वाटू लागली. तरीही मनाचा हिय्या करून तो पुढे पाऊल टाकू लागला.

खोलीचं दार लोटलेलंच होतं. त्याने दाराला हलकासा धक्का दिला, तरी दार सताड उघडलं.

दण!!!दण!!!

आवाज वाढत चालला.

बाबांच्या खोलीत कुणीही नव्हतं.

त्याची भीतीने गाळण उडाली. तो मागे जायला वळणार, तेवढ्यात दरवाजा बंद झाला.

तो दरवाजाला धडका देऊ लागला. सुटण्याची पराकाष्ठा करू लागला.

अंधाऱ्या खोलीत, एक कंप सुटला होता. एक विचित्र कंप, एक विचित्र गंध. डोळ्यात बोट घातला तरी कळणार नाही, इतका मिट्ट काळोख.

"ये... पुढे ये!!!" एक चिरका आवाज घुमला.

त्याच्या अंगातली शक्तीच गेल्यासारखं झालं. तो जागीच खिळून उभा राहिला.

"अरे ये ना...!!!" तो आवाज चिरकला.

तो दाराकडे वळून अजून धडका देऊ लागला. शेवटी जीवन मरणाचा प्रश्न होता.

थकून तो खाली बसला. गुडघ्यात डोकं घातलं. बराच वेळ तो तसाच बसला होता.

आसमंतातली दाहकता कमी झाली, तो आवाज येणं बंद झालं.

त्याने हळूच डोळे उघडले.

समोरचं म्हाताराचा चेहरा होता... हिडीस, कुरूप!!!

'तळघरातला पिंजऱ्यातला कोंडलेला म्हातारा...'

त्याने हिडीस हास्य केलं...

"म्हटलं ना मी मरत नाही, कधीच नाही."

त्याच्या शरीरातून क्षणक्षणाला कुणीतरी मांस काढून घेतंय असं झालं, आणि केव्हा डोळे मिटले गेले कळलंच नाही.

डोळे उघडले, तेव्हा वारा चालू होता, खारट वारा. आजूबाजूला पानांची सळसळ...

समुद्र...कोकण... पोफळी...

...आणि समोरच ते जळालेलं घर....

एक अदृश्य शक्ती त्याला खेचायला लागली. तो जिवाच्या आकांताने तिच्याविरुद्ध जाण्याचा प्रयत्न करत होता, पण ती शक्ती त्याला खेचत होती.

जळलेलं घर... अनेक वर्षांपूर्वी...

तो यंत्रवतपणे त्या घरात गेला, आणि वरच्या मजल्याची वाट धरली. सर्वकाही जळलेलं होतं, काळपट राख झालेलं. मात्र कोपऱ्यात एक बाहुला होता, हुबेहूब त्याच्यासारखा दिसणारा... त्याच्यासारखे कपडे घातलेला.

तो बाहुला बघून त्याच्यावर संमोहन झाल्यासारखं झालं. तो त्या बाहुल्याजवल गेला.

बाहुल्याने त्याच्या मानेवर उडी घेऊन काळी लवलवती जीभ बाहेर काढली.

'आम्ही मरत नाही, कधीच नाही.'

आणि त्याने जिभेने चाटून त्याची कातडी सोलायला सुरुवात केली.

...आणि ते जळकं घर कोसळलं...

तो एका रस्त्यावर पडला होता. एक रस्ता सरळ निघत होता.

हवेलीपर्यंत....

त्याच्या डोळ्यावर क्षणभर अंधारी आली. आणि मग तिची जागा उत्सुकतेने घेतली.

हवेलीत कुणीतरी त्याला बोलावत होतं. आणि तोही चालला होता. त्याला भीती वाटत नव्हतं.

सर्वत्र अंधारून आलं होतं. सूर्य ढगांच्या मळभाखाली झाकला गेला होता.

तो हवेलीत पोहोचला. जळकी हवेली, जळका जिना.

याच जळक्या जिन्यावर वरच्या खोलीत कुणीतरी त्याला बोलवत होतं.

तोही गेला...

त्याने खोलीचं दार उघडलं.

पण आता ते संमोहन क्षणात नाहीसं झालं होतं. त्याला भीतीची जाणीव झाली...

समोर मृतदेह लटकला होता. हिरवा, सुजलेला.

'आम्ही कधीच मरत नसतो...'

त्या मृतदेहाचे डोळे खाडकन उघडले.

...आणि मृतदेहामागून कुणीतरी त्याच्यावर झेप घेत त्याच्या नरडीचा घोट घेतला!!!

संपलं सगळं. संपलं...

काळोख, भयाण शांतता!!!

आणि लख्ख काहीतरी प्रकाशमान झालं. क्षणभर तो भांबावून गेला.

हळूहळू प्रकाश कमी होत गेला, आणि त्याला समोरचं दृश्य दिसलं.

एक साधा टेबल. त्यावर लिखाणाचं बाड.

मागे टेबलावर काळ्या काड्यांचा चष्मा घातलेला, पांढरी बंडी पांढरा पायजमा, गव्हाळ रंग आणि डोक्यावरून विरळ होत गेलेले केस.

तो सरळ त्यांच्यासमोरच जाऊन बसला.

"आपण कोण?" त्याने त्या गृहस्थांना विचारले.

"मी कोण...? मी एक साधा लेखक. माझ्या लिखाणात पात्र असतात. सुष्ट, दुष्ट...लोकांना ती कधीकधी आवडतात, कधीकधी नाही. काही लोकांच्या मनात ती घर करून बसतात. मग पिच्छा सुटता सुटत नाही.'

"अहो, तुमची तीच भयानक पात्रे माझा जीव घेतायेत क्षणोक्षणी," तो काकुळतीला येऊन म्हणाला.

"असं?" लेखक क्षणभर विचारात पडले.

थोडावेळ पूर्ण शांततेत गेला.

"तुम्ही माझी पुस्तके वाचली आहेत ना?"

"हो."

"मग तुम्हाला हेही माहितीये ना, की त्या सगळ्या वाईट शक्तींचा अंत पुस्तकातच झालाय."

"अहो ती प्रत्यक्षात माझ्या मागे लागलीत."

"अरे असं कसं झालं मग?

"मला काय माहीत?"

ते हसले.

"तुम्हाला नाही तर कुणाला माहीत असणार? मी प्रत्येक दुष्ट शक्तीला परावृत्त करणारी सुष्ट शक्ती निर्माण केलीच होती ना?"

"मग या दुष्ट शक्तीच माझ्या मागावर का?"

"कधी तुम्हाला पांढऱ्या सफारीतला सत्पुरुष आठवतो? त्या कुरूप तळघरातल्या म्हाताऱ्याच्या नायनाट करणारा? तुमच्या ध्यानी, मनी स्वप्नांत असतो, तो फक्त म्हातारा. तुम्हाला आठवतात ते कपडे घातलेले बाहुली, ती काळी सावली..

...ते कधीच मरणार नाहीत. ते पुस्तकांत तर संपलेत. पण वर्षानुवर्षे तुमच्यासारख्या वाचकांच्या मनात ते घर करून राहिलेत. तुमच्या मनाचा एक भीतीचा कोपरा त्यांनी व्यापून टाकलाय. रात्रीची वीज गेल्यावर भिंतीवरच्या सावलीत ते तुम्हांला दिसतात, जुनाट घरांमध्ये ते तुम्हांला दिसतात. ते अमर आहेत, अक्षय्य आहेत."

"मग त्यांना मारण्याचा काहीच उपाय नाही?"

"जर मनातली भीतीच काढून टाकली, तर ते नाहीसे नाही होणार का? दुष्ट शक्तींबरोबर जगात सुष्ट शक्तीही आहेत, ही जाणीवच बळ देण्यासाठी पुरेशी नाही? पण माणसाला ही जाणीवच होत नाही. मग त्या काळ्या, आडव्यातिडव्या, चित्रविचित्र सावल्या तुमच्या मनात शिरतात."

"म्हणजे, हा जाणिवेचा खेळ आहे की मनाचा?"

"नाही, श्रद्धेचा. अशी श्रद्धा, जी तुमच्यापासून कुणीही हिरावून घेऊ शकत नाही."

माझ्या मनावरचं मळभ दूर झाल होतं.

"जा, भीती तुमची वाट बघतेय..."ते हसले.

मी परतीच्या प्रवासाला निघालो.

"एक विचारायचं होतं," मी काहीतरी आठवून म्हणालो.

"विचारा ना."

"तुमची कथानके इंग्लिशमध्ये लिहिणाऱ्या एका लेखकाच्या कथेवर बेतलेली असतात, असं लोक म्हणतात. तुम्हाला काय वाटतं?"

"जर तसं असेल, तर त्यांच्या कथांवर मराठीतली वाचके इतकी प्रेम करायला लागलीत, म्हणून तो माझी गळाभेटच घेईल आधी, नाही का?"

मी हसलो, आणि परत जायला निघालो.

पायऱ्या खाली जात होत्या...

त्या तळघरात.

मी सरळ तळघरात गेलो, वखवखलेला म्हातारा माझी वाट बघत होता.

'आलास, ये...' तो माझ्यावर झेपावला.

आणि जागच्या जागी तिथेच उभा राहिला.

"काय करतोय तू??" तो खेकसला.

"विसरलास तू, तुला मारणारा आहे अजून, आमच्या मनात."

"नाही," तो ओरडला.

मागून एक पांढऱ्या कपड्यातला पुरुष आला.

"मी आलोय हं, धीर धर." त्याने हसतमुखाने मला धीर दिला.

आणि त्यांचं तुंबळ युद्ध जुंपल.

तिथून तो निघाला, वर, सरळ त्या जळक्या घरात. बाहुल्याजवळ.

"डोन्ट वरी, मी आलेय." मागून एक सुंदर मुलगी त्याच्याजवळ आली. आणि तिने बिया फेकायला सुरुवात केली.

तोही समाधानाने तिथून निघाला.

...आता ते हिरवट, सुजलेला चेहरा असलेलं समोर येणार होतं.

हवेलीने त्याला खेचून घेण्यास सुरुवात केली.

पण आता तोच हवेलीकडे निर्धास्त पावले टाकू लागला, आणि सरळ वरच्या मजल्यावर पोहोचला.

"आलास???" आणि मागून कुणीतरी त्याच्यावर उडी घेतली...

...आणि लख्ख सूर्यप्रकाश पडला...

त्याला जाग आली....

कालच स्वप्न आठवून त्यालाच हसू येतं होतं.

तो पटकन उठला, त्याने आवरलं, आणि तो नवीन पुस्तक शोधू लागला.

(नारायण धारपांना समर्पित)

***************

# गुलाबी चिरोटे

- सिद्धि चव्हाण

९८३३३२६६०९
siddhic1991@gmail.com



दिवाळीच्या फराळासाठी तयार केला जाणारा एक पारंपरिक महाराष्ट्रीयन गोडाचा पदार्थ म्हणजे चिरोटे. खुसखुशीत चिरोटे त्यावर मस्त साजूक तुप आणि वरुन भुरभुरलेली पीठी साखर असा याचा थाट. बिनसाखरेचा चिरोटा देखील चवदार लागतो . खारी प्रमाने चहा बरोबर किवा नुसताच खाऊ शकता. पण खारीपेखा नक्कीच पौष्टिक आहे. गोड न खाणाऱ्यांसाठी किंवा कमी गोड खाणाऱ्यांसाठी साखरेचे प्रमाण कमी-जास्त करून करता येतो. कोणी फक्त मैद्याच्या करतात तर कोणी मैदा आणि रवा मिक्स करून करतात अशा चिरोटे करण्याच्या वेगवेगळ्या पद्धती आहेत .
लाटण्याच्या ही दोन पद्धती आहेत गोल आणि उभी. मी गोल चिरोटे बनवते. पण जरा वेगळी पद्धत आहे. गुलाब पाकळ्यांचा पाक म्हणजे इथे आपण मेप्रोचा तयार गुलाब सिरप वापरु शकता. यामध्ये केलेले गुलाबी चिरोटे हे माझ स्पेसीफीकेशन आहे.
तर मी ज्या पद्धतीत चिरोटे बनवते त्याची ही आगळीवेगळी कृती.

साहित्य:
२ वाटी मैदा ( दोन भागात विभागुन घ्यावे.)
१ वाटी पिठी साखर ( दोन भागात विभागुन घ्यावे.)
२ चमचे कडाडीत गरम तूप ( दोन भागात विभागुन घ्यावे.)
२ छोटा चमचा मीठ ( दोन भागात विभागुन घ्यावे.)
१/२ चमचा बेकिंग पावडर ( दोन भागात विभागुन घ्यावे.)
३ चमचा गुलाब सिरप
१/२ वाटी तांदळाची पिठी (साट्यासाठी)
३ चमचे पातळ तूप (साट्यासाठी)
पीठ भिजवण्यासाठी थोडे दूध
तळण्यासाठी तूप.

कृती:
१) विभागलेल्या दोन भागापैकी प्रत्येक साहीत्याचा फक्त एक भाग येथे घावा.
मैदा, पिठी साखर, गरम तूप, मीठ, बेकिंग पावडर एका भांड्यात घ्यावा. या मधले तूप आधीच कडक तापवावे मग वापरावे, जर मोहनासाठी तूप कमी गरम असेल तर चिरोटे नरम पडतात. दूध घालून सर्व साहीत्य घट्ट भिजवावे.
२) विभागलेल्या दोन भागापैकी प्रत्येक साहीत्याचा दुसरा भाग येथे घावा.
मैदा, पिठी साखर, गरम तूप, मीठ, बेकिंग पावडर , गुलाब सिरप हे सर्व एका भांड्यात घ्यावा. वरील कृती प्रमानेच दूध घालून घट्ट भीजवावे.
दोन्ही तयार पीठाचे गोळे ( १ व २) थोडा वेळ वेगवेगळे झाकून ठेवावे.
३) भिजवलेला दोन्ही पीठान्चे वेगवेगळे मध्यम असे पोळी करताना जसे गोळे करतो त्या आकाराचे गोळे करून घ्यावे. त्याच्या एकदम पातळ पोळ्या लाटून घ्याव्यात. यामध्ये साधारण ३ पोळ्या सफेद पीठाच्या आणि ३ पोळ्या गुलाब सिरप घातलेल्या गुलाबी पीठाच्या होतील. जितक्या पातळ पोळया तितके चिरोटे हलके होतील आणि चिरोट्यांना छान पदर सुटतील.
३) एक सफेद पीठाची लाटलेली पोळी घ्यावी. त्या पोळीवर पातळ केलेले साजूक तूप आणि तांदूळ पिठ याची मध्यमसर घट्ट पेस्ट लावावी. त्यावर एक गुलाबी पीठाची पोळी ठेवावी परत त्यावर तूप आणि तांदूळ पिठाची पेस्ट लावावी.
४) नंतर दोन बाजूंनी गुंडाळी करत मध्यापर्यंत यावे. एका बाजूची गुंडाळी दुसर्या गुंडाळीवर ठेवून थोडे चेपावे. आणि हि तयार गुंडाळी त्यातील तूप सुकेस्तोवर ठेवून द्यावी. अशाच प्रकारे उरलेल्या २-२ पोळ्यांची गुंडाळी बनवून घ्यावी.
५) या गुंडाळ्यांचे १ इंचाचे तुकडे करून घ्यावे. गुंडाळीचे तुकडे वरील बाजूने न लाटता जिथून कापले आहे त्या बाजूला हलके दाबून एकदा उभे आणि आडवे असे लाटणे फिरवावे. या चिरोट्यांचा आकार गोल येतो. आणि दिसायला ही आकर्षक दिसतात.
७) तळण्यासाठी तेल तापत ठेवावे. तेल गरम झाले कि आच मध्यम करावी. आणि चिरोटे गोल्डन ब्राउनतळून काढावे. पेपरवर काढून लगेच त्यावर २-३ चिमटी पिठीसाखर पेरावी.

मस्त सफेद गुलाबी रंगाचे चिरोटे तयार होतील. फार आकर्षक दिसतात आणि चवीलाही खुसखुशीत लागतात.




लाटलेले चिरोटे
रोल
पोळ्या

***************

# सहज

- संदिप अवचट

सहज सहज लिहित जा
मोकळे ठेव मनाचे अंगण
शब्दांचे मोर आपणहून येतील
तुझ्यासाठी घालत रिंगण

सारवून ठेव कोपरे कोने
खडबडीतपणा धोपटून
शब्द येतील बाळासारखे
कुशीत घे त्यांना थोपटून

उंचावर टांग पाळणा
तुझ्या विचारांचा झोका दे
हृदयात उसळण्याला
एक मायेचा ठोका दे

आवरून घेशीलच घर सारे
मनाचे आरसे लख्ख ठेव
शब्द हसतील कसेही फसतील
जागती जाणीव झक्क ठेव

सवय लावू नकोस पण
मुठीत अडकतो त्यांचा पदर
तान्हे असतानाच ठेवावी लागते
सारखी त्यांच्यावरती आपली नजर

शब्द मग बाळ होतात
समजूतदार अर्थासहित
एकदा लय सापडली की
सहज हाकेत येतात वहीत

# गंमत रव्याच्या लाडूची

- अश्विनी दंडवते खांडवे



रव्याचा लाडू......तसं पाहिलं तर तो विशेष आवडीने खाल्ला जात नाही.म्हणून तो दिवाळीच्या फराळापैकी शेवटपर्यंत आपल्या सोबतीला राहणारा पदार्थ.पण फराळापैकी एखादा जरी पदार्थ केला नाही तर चुकल्या चुकल्या सारखं वाटतं.म्हणून इच्छा नसतानाही करावाच लागतो..

मग या वर्षी ठरवलं हा लाडोबा संपवण्यासाठी काही गंमत करुया.मग काय लागले तयारीला काजु,बदाम,मनुके आणि चारोळे घेतले.नेहमीप्रमाणे ते दिसतील असे न लावता काही लाडूत काजु, काहीत बदाम, काहीत मनुके तर काहीत चारोळे लाडूच्या एकदम पोटातच ठेऊन दिले..

खरी गंमत तर इथून पुढे आहे...लाडू बांधून झाल्यावर मुलांना सांगितल ज्याला बदाम येईल तो राजा,ज्याला काजु येईल तो राणी,ज्याला मनुका येईल तो पोलिस आणि ज्याला चारोळे येतील तो चोर...

मग काय झाली स्पर्धा चालू..ज्याला बदाम आला तो राजा झाल्यामुळे त्याला वाटलं अजून एक खातो मी परत राजा होईल😀😀जो राणी👸झाला तो जर मुलगा असेल तर बिचारयाला चिडवुन चिडवुन सगळ्यांनी हैराण केला मग त्याला वाटायचं चोर झालो तरी चालेल पण राणी👸 नको😟😟मनुक्यावाला तर पोलिस👮झाल्यामुळे त्याला आपण एकदम भारी असल्यासारखं वाटायचं..मग त्याला मी ही अजुन फुगवून द्यायचे."अरे पोलिस झाला ना..तुला चोराला पकडण्यासाठी ताकद पाहिजे ना...घे घे अजुन एक घे"...😉आणि बिचारा चोर झालेला आपल्यावरचा चोराचा शिक्का पुसण्यासाठी त्याला लाडू खावाच लागणार...😉.

अश्याप्रकारे मुलांनी शेवटी संपणारा रव्याचा लाडू मज्जा मस्तीत सगळ्यात आधी संपवले आणि वर आता "आई आता मोठा डब्बा भरुन कर बरं का.."म्हणून मागे लागलेत...

खरं तर मला मला फराळाचा भरलेल्या डब्यापेक्षा फराळ संपवलेला डब्बा पाहूनच जास्त बरं वाटतं..

चला आता परत रव्याचे लाडू..कोणत्यातरी नवीन गंमतीने.....😉😉🙏🙏

वयोगट:५ ते ७ वर्षे

फोटो:लाडू संपवणारे माझे Super stars!!!

***************

# जगून बघ

- यतीन कुलकर्णी

जन्माला आलाच आहेस तर जगून बघ
श्वासाला थोडं थांबवून जगणं जमवून तर बघ

घरातील वादविवाद दिसतील तुला
परी तू घर बांधून तर बघ

जीवनात खुप दु:खाचे डोंगर दिसतील
एकदा थोडं सोसून तर बघ

डाव मांडून खेळणं फार अवघड असतं
एकदा तरी जीव लावून खेळून तर बघ

मरण सोपं असतं जगणं अवघडच असतं
आरे हेच जीवनातलं कोड सोडून तर बघ

कोंडीचा भडिमार डोक्याला असतो
परी डोकं लावून सोडवून तर बघ

मरता मरता जगण्यापेक्षा
जगता जगता मरून तर बघ

जीवन सुखदुःखचा एक प्रवास आहे
परी जगता जगता आनंद देऊन तर बघ

***************

# गोडसर लिंबू

- यतीन कुलकर्णी

मी शकुंतला ऊर्फ शकु, शकुन की अपशकून च्या फेऱ्यात अडकलेली. तशी मी श्रध्दा बाळगून अंधश्रद्धेला खतपाणी न घालणारी एक सामान्य घरातील साधीसुधी ग्रुहिणी पण रीतीरिवाजाच्या किंवा प्रथेच्या चक्करात सापडलेली. वंशवेल जपणे एकतरी दिवा लावणे या अशा भोळ्या भाबड्या भ्रामक कल्पनेत बिधरलेली.

माणूस म्हणून जन्माला आलेल्या प्रत्येक माणूस प्राण्यांना काहीना काही तरी चालीरिती चिकटलेल्या असतात. समाजाने कितीही प्रबोधन केले तरी आपण त्या रुढी परंपरा च्या विळख्यात भरडले जातो.

या बंधनांना कसे आवरू हेच कळत नाही, जे जे सजीव त्यांना बंधने असतात का? बर असतील तर ती बंधने सजीव असतात का? का ती निर्जीव, पण खरतर या बंधनांना तर आपण चिरंजीवी सारखे बाळगतो.

हे काय मी कुठल्या गोष्टीवर भाष्य करते आहे, चिंता - विवंचना याच आपल्या ब-या आपण आहोत तोपर्यंत त्या आपल्या बरोबर असतात अन् आपण गेलो की आपल्या बरोबरीने त्याही संपतात. जे पेरतो ते उगवते आणि काही काळानंतर ते अस्ताला जाते. जश्या छोट्या छोट्या झाडी झुडपे उगवतात आणि कुठल्या ही रीती रिवाजात न अडकता आपले कार्य करून जातात. सगळ्या सजीवात झाडाझुडपांनी बहरलेली बाग खुपच सुंदर व आपसुकच आकर्षित करणारी असते. त्यातल्या त्यात परसबाग ही एक खुपच छान टवटवीत दिसणारी रोजच्या रोज फुले उमलणारी व आपल्याही ताजीतवानी ठेवणारी असते, अशीच माझी ही परसबाग आहे.

माझ्या परसबागेत सुध्दा छोटी रोपटी, फुलझाडे किंवा थोडे मोठे पण फळ देणारे झाडे आहेत. असेच एक लिंबाचे झाड आहे आणि हो हे झाड सध्याला माझ्याशी छान गप्पा मारते, तशी मी सर्वच परसबागेशी हितगुज करते पण ह्या लिंबाच्या झाडा बरोबर छान गोड...... हो गोड गप्पा मारते. तसे हे लिंबाचे झाड खुप वर्षांपुर्वी पासून आमच्या परसबागेत आहे, ते छान बहरते फुलते, टवटवीत दिसते आणि पाना फुलांनी बहरून तरतरीत दिसते.

एवढे छान सुंदर अशा झाडाबद्दल मला कुठेतरी खटकले काहीतरी बिघडले असे मला जास्त जाणवले. सारखे मला वाटत होते की हे झाड गेले कित्येक वर्षे फळ न देताच ते तरतरीत दिसते पण आतून कोठेतरी मुग गिळून गप्प बसलेले वाटते म्हणून मी त्याच्याशी गप्पा मारते आणि गप्पा मारता मारता दुःख ही विचारते, पण ते काहीच बोलत नाही फक्त शांत राहते. हे असे बरेच दिवस चालू होते शेवटी मी त्याला खुप विनवण्या केल्या तेव्हा ते कुठे माझ्याशी बोलले आणि त्याने मनातले काळे आभाळ सगळे मोकळ केलं, तेव्हा कुठे मला कळल की यांनीही काही वेदना असतात यांनाही काही दुःखे असतात.

त्याने सांगितले गेल्या कित्येक ऋतूपासून मी एकही फळ देऊ शकलो नाही, या क्षितीजाला रुजवायला काहीच देऊ शकलो नाही. फळ न देता उदर भरण करायला नको वाटते, नुसतेच उभे राहायचे आणि फुले फळे ने देता ताडामाडा सारखे रुतून राहायचे हे पटत नाही म्हणुनच मी फार एकचित्त व शांत राहतो.

हे सगळे ऐकल्यानंतर मला थोडे गहिवरले, त्याचे दुःख माझ्या पेक्षाही जास्त वाटले.

न राहवून मी त्याला एक विचारले की तुला येणारे फळ तर आंबट अन् त्यात ते गोड पण नाही, तर मग तु का तुझे मन कडु करते. फळ कसे गोड गोंडस असावे, ते सर्वांना हवेहवेसे वाटणारे हवे.

त्यावर तो म्हणाला अगं वेडे आपले फळ आपल्याला बळ देणारे असते, ते कसेही असले तरी ते आपले बाळ असते. त्याला वाढविणे व त्याला फळू देणे हेच तर आपले कार्य असते आणि असे होत नसेल तर आपला काय उपयोग, म्हणून मला टवटवीत असून हसता येत नाही आणि बहरत असून फळे देता येत नाही याचीच जास्त खंत आहे.

हे सर्व ऐकून मी पुरती गपगार झाले, प्रत्येकाला वाटत असते की "आपल्यालाच जास्त दुःख आहे" हे किती चुकीचे आहे.

मन भरून आल आवंढा गिळत तिचे दुःख कमी करण्याचा प्रयत्नात माझेच दुःख खुजे झाले. मी अशीच त्याच्या सारखीच दुःखी, कोमेजलेली होते. या लिंबाच्या गोड झाडाकडे पाहून मला त्याच्या सारखेच छान बहरायचे अन् फुलायचे, पोटातले दडवायचे अन् सर्वांना तरतरीत दिसायचे.

हे मी शिकले माझ्या आंबडसर गोड हो गोड लिंबा कडून.........

***************

# *उभी आहे तुझ्या वाटेवर*

***- शबाना मुल्ला***

भारतभूच्या रक्षणार्थ लढला सीमेवर
डोळे लावून उभी आहे मी तुझ्या वाटेवर||धृ||

गेलास सैन्यात वाटला मला अभिमान
हिंमतीने लढला तू ठेवून तटस्थ मान
झेललास वार तुझ्या तू निधड्या छातीवर
डोळे लावून ऊभी आहे मी तुझ्या वाटेवर ||१||

जखमी होऊनही नाही तू डगमगला
उत्तर देण्या दुष्मनाला रोजच धडपडला
फिरंग्यांचे नाव तुझ्या बंदुकीच्या गोळीवर
डोळे लावून ऊभी आहे मी तुझ्या वाटेवर ||२||

डबडबून गेले नेत्र तुला पाहण्यासाठी
अधीर झाले मन तुझी पाठ थोपटण्यासाठी
कोरले आहे तुझेच मी नाव रे हृदयावर
डोळे लावून उभी आहे मी तुझ्या वाटेवर ||३||

नको वाटतो हा आता दुरावा क्षणभर
नजरे आड होऊ देणार नाही पळभर
आठवण तुझी ती होते मला रे  अनावर
डोळे लावून ऊभी आहे मी तुझ्या वाटेवर ||४||

आभार देवाचे शतशः, नशीब सौभाग्याचे
जरी  प्रतीक आहे ते माझ्या अखंड त्यागाचे..
खुलले रूप माझे कुंकू लावता भाळावर,
डोळे लावून उभी आहे मी तुझ्या वाटेवर ||5||

***************

# राहून गेलेली तेल मालिश

**- डॉ कल्पना देशमुख**

काही दिवसापासून सतत फिरत असलेला whatup वरील एक लेख वाचला. त्यात मुलीला आपली आई पायाला तेल लावून मालीश करून देते असा उल्लेख आहे. त्या मुलीला तेलाच्या मालीशमधील ऊब सासरी गेल्यावर प्रखरतेने जाणवते. खरेच आई ही आईच असते, तिच्या प्रेमाची सर अजूनही कोणाला देता आली नाही. प्रत्येकाच्या आयुष्यात आई वेगवेगळ्या प्रकारे आपले अस्तित्त्व ठेवून जाते. प्रत्येकजण आजीवन हे ओझे लिलया पेलण्यातच आपल्या जीवनाचे सार्थक मानतो. म्हणून मला असे वाटते की मनुष्याला देव पाहावा असे वाटले तर तिच्या कष्टात पाहावा, तिच्या प्रेमात पाहावा आणि तिला समजून घेऊन गरज असेल त्यांना तो देऊ करावा. देव म्हणजे केवळ देणे तसे आई म्हणजे केवळ देणे हे तिच्याकडून शिकावे.

थोडक्यात माझ्याबद्दल सांगायचे झाल्यास हा लेख वाचून मी माझ्यातील आई शोधत होते. माझ्या मुली आता मोठ्या झाल्या आहेत. तरी मी स्वत:ला विचारत होते, मी काही केले आहे का माझ्या मुलींसाठी? त्या थकल्या भागल्या किंवा खूप प्रवास करून आल्या तेव्हा तरी? पण मी त्यांना कधीच तेल लावून दिले नाही हे मला निश्चित आठवते. माझा दिनक्रम पहाटे ४ पासून सुरू होत असल्यामुळे त्याला अनुसरून माझ्या मुली मोठ्या होत होत्या. लग्नापूर्वीच माझे शिक्षण M. Com. पर्यंत झाले होते. मी खाजगी शिकवण्या घेते. शिकवणीचा वेळ सकाळी ७ ते १० आणि संध्याकाळी ४ ते ८ असा सर्वसाधारणपणे दरवर्षी असतो. मी जशी माझ्या कामात व्यस्त राहिले तशी त्यांनाही ठेवत होते. त्यांची शिकवणी घरीच होत असल्यामुळे उरणारा वेळ गायनाच्या शिकवणीमध्ये गुंतवला. अशाप्रकारे लहानपणापासूनच व्यस्त राहाण्याची सवय त्यांना लागली होती.

शिकवणीपूर्वी पूजा, मंदिरात जाऊन दर्शन घेऊन येणे, व्यायाम, चहा, स्वयपाक अशी कामे आटोपणे गरजेचे होते. त्यापैकी मी चहा, स्वयपाक, स्वत:चे कपडे धुणे, पतीदेवाच्या डब्यासाठी लागणाऱ्या पोळ्या करून त्यांचा डब्बा भरून ठेवत असे. कधी कधी शक्य असूनही स्वयपाक पूर्ण करण्याचे मी प्रयत्नपूर्वक टाळत असे. मोठ्या मुलीला भाजी बनवून घे तर कधी धाकटीला पोळ्या करून घे असे सांगत असे. त्या धावपळीत माझ्या बुद्धीला एवढे पटले होते बाकी कामांपेक्षा किमान ह्या दोघींना स्वयपाक येणे महत्त्वाचे आहे. त्यामुळे काहीही झाले तरी स्वयपाक अर्धवट ठेवून बाकी कामे मी करत असे. कधी पतीदेव गावाला गेले की मी स्वयपाक करतच नसे. अर्थातच कॉलेजला जाण्याच्या धावपळीसोबत डब्यासाठी पोळीभाजी बनवून घेणे हे काम दोघींसाठी राहू लागले. त्या पण माझ्या व्यस्त जीवनशैलीकडे पाहून काहीही कुरबुर न करता स्वत:चा डब्बा स्वत: बनवून घेऊ लागल्या.

कधी मी गावाला गेले, माहेरी गेले किंवा कोणाच्या कार्याला गेले तर मुली माझ्या शिकवण्या पण सांभाळू लागल्या. त्या दोघींचे अभियांत्रिकीचे शिक्षण चालू होते त्यासोबत नकळत माझ्या कामामध्ये त्या पारंगत होत होत्या. नंतर मला M. A. संस्कृत आणि PhD चे शिक्षण घेण्याची संधी मिळाली. तेव्हा त्यातील बरेच technical कामे मी त्यांच्याद्वारे करवून घेत असे. त्या पण खूप आनंदाने माझी कामे करत असत. हे पाहून माझा उत्साह अधिक वाढत असे. स्वत:ची कामे स्वत: करणे, घरातील इतर कामाची वाटणी, परस्पर सहकार्य आणि रोजचा अभ्यास ह्या गोष्टी सांभाळत असताना तेलाच्या मालीशची आठवण कधी झालीच नाही असे म्हणावे लागेल. पण त्यांना एवढे तेल दिले गेले की ते स्वत: आयुष्यभर वापरून दुसऱ्यांचे जीवनही प्रफ्फुलीत करतील. दिवसभर सर्वच कामात व्यस्त राहात असल्यामुळे रिकामा वेळ कधी मिळाला नाही. सुट्टीच्या दिवशी किंवा परीक्षेनंतर ज्या सुट्ट्या मिळत असत त्या मराठी नाटके किंवा रामायणाच्या मालिका पाहाण्यात आम्ही घालवत असू.

हा लेख लिहिण्याचा माझा उद्देश हाच आहे की माझ्याद्वारे मुलींना काय दिले गेले. त्यांना फक्त उपदेश करणे किंवा त्यांच्याद्वारे अपेक्षा करणे असे झाले नाही. त्यांनी काय करावे किंवा काय करू नये हे प्रत्यक्ष कृतीतून करून दाखवण्याचा माझा प्रयत्न असे. त्या प्रयत्नांना यश लाभले असे त्याचा मागोवा घेताना मला दिसले-

१) स्वत:च्या आचरणातून त्यांच्या जीवनात व्यस्त जीवनशैलीचा पाया घातला.

२) शिक्षण घेत घेत आर्थिक चणचण भासू नये म्हणून पैशाचे महत्त्व शिकवले गेले.

३) सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्यांना स्वत:ला किमान पोळीभाजी बनवता आलीच पाहिजे यावर भर दिला गेला.

४) गायनाच्या माध्यमातून त्यांच्या जीवनात छंद जोपासला गेला.

५) या सर्वांचा परिणाम असा झाला की त्या शैक्षणिक कारकिर्दीत प्रथम क्रमांकावर राहिल्या.

६) एकमेकांना मदत करूनच पुढे जाता येते हा महत्त्वाचा धडा त्यांच्या भावी आयुष्यासाठी यशस्वी ठरला.

अशाप्रकारे प्रत्येक आई आपल्या मुलांना आपल्यापेक्षा अधिक सुंदर बनवण्याचा प्रयत्न करते. तिची नित्य जीवनशैली सांभाळून ती आपल्याला धडे देत असते. आपली लेकरे जगवणे जेवढे महत्त्वाचे असते त्यापेक्षा अधिक, ते सरस कसे होतील ह्याकडे आई लक्ष देते.

***************

# घरगुती साजूक तूपाची खास रेसिपी

– *सिद्धि चव्हाण*

९८३३३२६६०९
siddhic1991@gmail.com

तूप हे लोणी कढवून बनविले जाणारे एक पाकमाध्यम आहे. त्याचा उपयोग पाककलेत तसेच धार्मिक क्रियांमध्ये केला जातो.

तुपाचे आरोग्यदायी फायदे:

1. शरीराला उष्णता मिळते.
2. इन्स्टंट एनर्जी मिळते
3. स्मरणशक्ती वाढते
4. मुळव्याधीचा त्रास कमी होतो
5. सांधेदुखीतून आराम मिळतो
6. लहान मुलांच्या वाढीसाठी उत्तम
7. वजन नियंत्रित राहते
8. तूप कॅन्सर पेंशटसाठी उपयुक्त
9. हातापायाची जळजळ कमी होते
10. डोळ्यांचे विकार कमी होतात
11. मुत्रविकार कमी होतात


**साहित्य :**

- मलईसाठी एक डब्बा
- गाळणी
- तूप गरम करण्यासाठी पातेले
- लोणी घुसळण्यासाठी पातेलं
- तूप साठवण्यासाठी भांड

**कृती :**

तूप बनवणे हे सोपे आहे. पण त्यासाठी पुरेशी पुर्वतयारी करणे आवश्यक आहे. त्यामुळे तूप बनवण्यासाठी दूधावरची मलई नियमित काढून हवाबंद डब्ब्यात साठवून ठेवा. तो डबा नेहमी फ्रीजमध्ये ठेवा. अन्यथा मलई खराब होईल.

- पुरेशी मलाई साठल्यानंतर ( मलईच्या निम्मे तूप बनते) ते मोठ्या भांडयात काढूब ठेवा.मलई रवीने घुसळा. हळूहळू त्यावर लोणी साठायला सुरवात होईल. लोणी चमच्याने बाजूला काढा.
- लोणी काढलेले पातेले गॅसवर ठेवा. त्यातील फॅट हळू हळू वितळेल. त्याचा रंग़ गोल्डन ब्राऊन होईपर्यंत गॅस मंद आचेवर ठेवावा. दरम्यान चमच्याच्या सहाय्याने मिश्रण हलवत रहा.
- त्यानंतर तूप गाळून घ्या. ते तूप स्टीलच्या भांड्यात साठवा.


गाळलेला चुरा
५
४ gas वर उकळलेले
3 लोणी
2
1


गाळुन तयार झालेले तुप

***************

# अहो ......

-मनिषा शंकर सूर्यवंशी

देव देव, पती देव, देवाधी देव, पती देव

काय काय संबोधू तुम्हाला

कसे आहात नक्की, कळेल का आम्हाला

कधी खूप ओरडतात

कधी खूप जीव लावतात

कधी खूप चिडचिड करतात

कधी खूप माया करतात

असे तुम्हाला सर्वांची काळजी

धडपडत असतात सतत, आम्हाला खूष ठेवण्यासाठी

तुम्हाला सतत असते, स्वतःबरोबर आमच्या आरोग्याची काळजी

तरी मी अन्नपूर्णा तरी मी आहे अन्नपूर्णा

स्वादिष्ट अन्न  तयार करते

चमचमीत , तिखट ,गोड,

तरी सुद्धा अजिबात निघत नाही तुमची तोंद

आई वडिलांसाठी, तुम्ही आहे श्रावण बाळ

मुलांसाठी तुम्ही आहे केयरफुल डॅड

कसं जमतं हो तुम्हाला एवढे निभावणे पार्ट

म्हणून सांगते कधी स्वतःचा पण विचार करा

म्हणून सांगते कधी स्वतःचा पण विचार करा

तुमच्यासाठी नाही पण आमच्यासाठी नेहमी हसा.

# पारध

**- मयुरेश पालकर**

ब्लू फ्रॉग, रात्री दीड वाजलेला... माझ्या सोबतीला पबच्या आतून येणारा डान्स म्युझिकचा पुसट आवाज आणि साईनबोर्ड वरच्या बेडकाचा निळा निऑन लाईट. त्या निऑनच्या प्रकाशात मी अगदी एनिग्मॅटिक दिसते... कित्येक गिऱ्हाईकांकडून ऐकलंय मी तसं!

आणि का नाही दिसणार? मूळचा गोरा रंग. मेकपने त्याला आणलेली झळाळी. स्ट्रेटन केलेले केस. त्यांच्यातल्या हायलायटेड स्ट्रीक्स. वर्कआऊट करून मेंटेन केलेली सेक्सी फिगर. आणि ती ऍक्सेंच्युएट करणारे टॅन्क टॉप आणि मिनी स्कर्ट... सोबत हाय हिल्स चे बूट... आणि जोडीला घायाळ करणारी नजर... उगाच नाही पुरुष पागल होत माझ्या मागे! आफ्टर ऑल, माय बॉडी इज माय वेपन!

दुरून कोणत्या तरी बाईकचा आवाज येतोय... फायरिंगवरून तरी एखादी सुपरबाईक वाटतेय. दॅट इज गुड! एवढ्यात आलीच ती बाईक समोर... ट्रायम्फ फँटम! म्हणजे चांगलंच मालदार गिऱ्हाईक असणार! सवयीने मी किंचित पुढे झुकून लिफ्ट मागितली... माझं क्लिव्हेज बघून गाडी थांबली नाही, असं होणारच नाही! आताही काही वेगळं झालं नाही... सराईतपणे रायडरने गाडी थांबवली.

कसला चिकणा आहे हा! सिक्स वन तरी नक्की असेल... लेदर जॅकेट मधून पण त्याचे ब्रॉड शोल्डर्स आणि मस्क्युलर आर्म्स कळून येतायत... आणि हेल्मेटच्या वायझर मधून मला न्याहाळणारी ती भेदक नजर... वखवखलेल्या, अधाशी नजरांची रोजची सवय आहे मला, पण हे मॅटर काहीतरी औरच आहे!

"एक्सक्युज मी! कॅन यू ड्रॉप मी टू रॉयल पाम्स?"

माझ्या क्लिव्हेज वर अडकलेली त्याची नजर वर झाली.

"रॉयल पाम्स?"

एकाच स्मूथ मूव्हमेंट मध्ये त्यानं जॅकेटच्या आतल्या खिशातून फोन काढून त्यावर गूगल मॅप्स ओपन केलं. आयफोन इलेव्हन प्रो! माय गॉड! नक्कीच तगडी पार्टी आहे... हा फोन लॉंच झाल्यापासनं मला घ्यायचाय... आज मिळेल!

"इट्स इन गोरेगाव ईस्ट... आय होप यू आर गोइंग इन दॅट डिरेक्शन." मी, त्याला डोळा मारत.

"हॉप ऑन" तो, मिस्कील हसत आणि फोन पुन्हा खिशात टाकत.

त्याच्या सुपरबाईक वर मी त्याला खेटून बसलेय... त्यानं गाडी सुसाट सोडलीये...

कलानगर ओलांडताना त्यानं विचारलं, "व्हाय यू हॅड टू लूक फॉर अ राईड, मिस..."

"इशिका" नाव विचारायची ही पद्धत जणू मला माहीतच नाही!

"इशिका... आयम रोहित!"

"आयम ग्लॅड टू मीट यू, रोहित!" त्याला घट्ट आवळत माझ्या नेहमीच्या मादक आवाजात मी म्हणाले आणि त्यानं गाडीचा वेग आणखी वाढवला... त्याच जोडीला त्याचा डावा हात माझ्या मांडीवर फिरू लागला!

त्या वेगात हां हां म्हणता आम्ही जेव्हीएलार चा फ्लायओवर ओलांडला सुद्धा.

"टेक इनसाईड आरे कॉलनी" त्याच्या मानेजवळ चावत मी.

आरे कॉलनीत शिरून पंचवटी ला लेफ्ट घेतल्यानन्तर मी सावध झाले... हा भाग सम्पूर्णपणे निर्मनुष्य असतो. आणि शिवाय पूर्णपणे अंधारात! हा अंधारच माझा पहिला असिस्टंट, आणि इस्माईल दुसरा!

"शिट !" त्यानं एकदम ब्रेक मारून गाडी थांबवली. समोर रस्त्यावर एक बॉडी पडलेली... इस्माईल! हा माझ्या नेहमीच्या प्लॅन मधला महत्वाचा पॉईंट असतो... मी घाबरल्यासारखी बाईक वरून उतरले... माझ्या सगळ्या सावजांसारखा रोहित पण बाईक वरून उतरला, आणि इस्माईल च्या जवळ जाऊन वाकून त्याचं निरीक्षण करू लागला.

चपळाईने इस्माईल उठला, आणि त्यानं हातातला रामपुरी रोहित च्या गळ्याला टेकवला.

"आवाज नहीं. रोकडा निकाल चुपचाप."

"अँड फर्स्ट, हँड मी दॅट आयफोन, डार्लिंग!" खिजवत, मी.

त्यानं फोन काढायला जॅकेटच्या खिशात हात घातला. मघासारखाच, एका स्मूथ मूव्हमेंटमध्ये त्याचा हात बाहेर आला. पण यावेळेस त्याच्या हातात फोन नव्हता.

हँडगन!

आय वॉज शॉक्ड! काही कळायच्या आत त्यानं इस्माईल वर फायर केलं. इस्माईल जागच्या जागी कोसळला. खरोखरची बॉडी बनून... रिफ्लेक्स ऍक्शनने मी रस्ता सोडून बाजूच्या जंगलात धावत सुटले. माझ्या मागे फँटमचं फायरिंग फेड होत गेलं.

मी किती वेळ धावत होते कोण जाणे... शेवटी थकून खाली बसले आणि एका झाडाला टेकून डोळे मिटले.

गॉड नोज किती वेळ झोप लागलेली. पण जाग आली तेव्हा पण मिट्ट काळोखचं होता. हळूहळू मी भानावर आले. इस्माईलच्या मर्डर चा रिपोर्ट करायलाच हवा होता. आरे पोलीस स्टेशनमध्ये सबइनस्पेक्टर राणेला भेटायला हवं. तो वसूल केल्याशिवाय सोडणार नाही, बट नाऊ आय हॅव नो चॉईस!

हळूहळू रस्ता शोधत मेन रोडला आले. दोन किलोमीटर रस्ता तुडवत आरे पोलीस स्टेशन गाठलं. राणे आत बसलाच होता. मला बघून नेहमीप्रमाणे त्याची लाळ गळायला लागली. तिकडे इग्नोर करून मी त्याला घडलेला प्रकार ऐकवला.

त्याच्या हद्दीत खून म्हटल्यावर तो सुद्धा जरा हलल्यासारखा झालेला....

"चल, एसीपी सायबांना सांगायला हवं" असं म्हणून तो आतल्या केबिनमध्ये शिरला. त्याच्या पाठोपाठ मीही.

एसीपी आत पाठमोरा उभा होता.

"सर..."

"येस राणे?" आय हॅव हर्ड धिस व्हॉइस समव्हेअर...

तो गर्रकन वळला... ओह फक! दॅट सिक्स वन हाईट... ब्रॉड शोल्डर्स... मस्क्युलर आर्म्स... आणि तीच भेदक नजर!

शुद्ध हरपताना मला टेबलवरचं त्याचं नाव दिसलं... रोहित प्रधान, एसीपी

---------------------------------------------------

कथेतल्या मुख्य पात्राची भाषा आणि विचार इंग्रजाळलेले असल्यानं कथेत अनेक इंग्रजी शब्द आले आहेत.

***************

# ***अलक***

***- अभिषेक चौधरी***

अलक 1:

"कोणाला काही काळजीच नाही,सगळं मीच मेलीने करायचं...जरा म्हणून विसरायची सोय नाही" अनेक काम आवरून घरातून निघाली ...
काहीतरी विसरली असं वाटलं म्हणून मागे वळली..तर मागुन येता येता त्याने तिला थांबवलं
***"गॅस, geyser, light बंद केले, दूध फ्रिजमध्ये आहे... चल लवकर ऑफिसला पोहचायचे आहे."***

अलक 2:

पुर्ण शहरात red अलर्ट होता. त्याच्या थैमानाचा अतिरेक झाला होता...
तेवढ्यात बातमी आली, थैमान आटोक्यात आल्याची... दिवसभर जीव मुठीत धरून असलेली माणसं भितभित का होईना बाहेर पडली आणि तेवढ्यात घात झाला...
***जोराचा पाऊस आला...परत....***

अलक 3:
आज त्याने ठरवलच, काहीही झालं तरी सोडायचं नाही..
राग मनात तर होताच आता डोक्यात पण गेला..
हत्यार आणि विषाची बाटली तैयार ठेवली..आज दिसला की संपवायचं त्याला...
आणि थंड डोक्याने व्यवस्थित विचार करून आज रात्री त्याने काम बिनबोभाट पार पाडलं...
देहाची विल्हेवाट लावणार तेवढ्यात जोशी काकूंनी बघितलंच***....."अय्या तुमच्या घरी पण उंदीर निघालाच का शेवटी!!!!***

***************

# अल्याड पल्याडच्या वेणा

*- बिपीन सांगळे*

अपूर्वा कळवळून किंचाळली ...
तिच्या पोटात भयंकर कळ आली होती. अगदी असह्य ! ती कळवळली.
ती आता लेबर रूममध्ये होती. तिला मधूनच कळा येत होत्या. कमी होत होत्या. अशा कळा की जगात त्यावाचून दुसरं काहीच नाहीये !
बाळंतपणाच्या कळा ! सगळ्यात असह्य. एखादा बॉम्ब फुटून त्याचे धातूचे तुकडे प्रचंड वेगाने शरीरात शिरल्यानंतर जेवढ्या वेदना होतात, त्याही पेक्षा जास्त. तरीही प्रत्येक स्त्रीला हव्याहव्याशा वाटणाऱ्या वेणा !
पण कळांमध्ये सातत्य नव्हतं. त्या आतल्या जिवाचा जीव बहुतेक अजून आतच रमला होता.
कळा हळूहळू कमी होत गेल्या. तिचं कण्हणं कमी होत गेलं .अपूर्वा थकून शांत पडून राहिली. तिच्या अंगातलं त्राण आत्ताच गेलं होतं.झोप येणं शक्यच नव्हतं .
त्या वेदनांमध्येही तिला मजा वाटली. तिची चार दिवसात ॲडमिट व्हायची दुसरी वेळ होती. दोन दिवसांपूर्वी असंच पोटात दुखतंय म्हणून ॲडमिट केलेलं. मग पुन्हा घरी रवानगी. नुसतीच ये-जा .
ढगांनी भरलेल्या पण पाऊस न पडणाऱ्या काळपट आभाळासारखं.
दोन दिवसांपूर्वी घरी जाताना आई म्हणाली होती, " अपू ,सीझर करू या का ? उगा तुला त्रास नको. नाहीतरी तुझ्या नवऱ्यालाही मुहूर्तावर सीझरच करायचं होतं . म्हणजे मुलगा सुलक्षणी होईल, भाग्यवान होईल."
त्यावर अपूर्वा म्हणाली होती, " हे बरंय ! मूल जन्माला घालायचं मी आणि ते कसं घालायचं हे बाकीचेच लोक ठरवणार. माझा काहीच निर्णय नाही का ?... मला नॉर्मलच हवीय."
त्यावर अपूर्वाची आई तिच्याकडे पहातच राहिली. त्यांना वाटलं – ' काय ही मुलगी ! आताशा सगळ्या मुली सीझर करा म्हणतात. डोक्याला त्रास नको,' त्यांना मध्येच हसू आलं ,' अन कशालाच त्रास नको. हिला नॉर्मल हवीय शहाणीला.
ज्याला आपण जन्म दिला तो जीव आता एक नवीन जीव जन्माला घालण्याच्या प्रतीक्षेत आहे. पोरगी कित्ती मोठी झाली...स्वतंत्र विचार....स्वतःचे निर्णय. आपल्यासारखं नाही. आपल्यावेळी सारं काही सासूबाईंच्या मनाप्रमाणे.'
सासूबाई !... तो शब्द आठवताच त्यांना अपूच्या सासूबाई आठवल्या. 'त्यांना मुलगाच हवाय . कारण भल्या मोठ्या इस्टेटीला वारस हवा ना.'
त्यांना थोडी काळजी वाटली.
'कधी होते पोरीची सुटका कोणास ठाऊक ? अन काय होणार ? कोणास ठाऊक ?- ही एक गंमतच असते. डिलिव्हरी कोणाचीही असो, घालमेल ही प्रत्येक क्षणालाच. नीट होईल ना ? काय होईल ?- मुलगा की मुलगी ?... असं उत्कंठा वाढवणारं, सरप्राईझच.
ही म्हणालीये, काही होऊ दे.मला चालेल. आणि अमेयलादेखील तसं सांगितलंय. त्यालाही अपूचं म्हणणं मान्य आहे. म्हणते कशी - जे व्हायचंय ते आमचं आम्ही बघू. सासूबाईंना काय घेणं पडलंय ?
अमेय म्हणाला होता - चेक करायचं आहे का ? पण ही नाही म्हणाली. आपल्याला म्हणाली होती, कशासाठी करायचं गर्भलिंगनिदान ? ह्याला काय ? ह्याला वाटतं, पैसे फेकून कुठलंही काम करून घेता येतं. त्याच्या शंभर ओळखी आहेत. पण कशासाठी ?
तर तो मुहूर्त काढून सीझर करू या म्हणाला होता. त्यावरही ही म्हणाली होती, जेव्हा त्याची वेळ असेल तेव्हा येईल जन्माला. त्याचं जसं नशीब असेल ते घेऊनच तो जन्माला येईल.'
अपूर्वाला पुन्हा तिच्या रूममध्ये आणण्यात आलं. ती बेडवर शांत पडून राहिली.
बाहेर घुसमटीसारखी हवा होती. पण रूममध्ये छान होतं.
नसायला काय ? प्रायव्हेट एसी रूम होती. टापटीप. अमेयच्या डामडौलाला साजेशी. छान फिकट गुलाबी भिंती. समोर भिंतीवर टीव्ही. एका बाजूला खिडकी. खिडकीला फुलांच्या नक्षीचा गुलाबीच पडदा. थोडासा सरकलेला . त्यातून बाहेरचा दिसणारा लाल गुलमोहर.मागे चुकून थोडंसं निळं दिसणारं आभाळ. बाकी ढग भरून आलेले. पावसाचे दिवस होते. पण तो बेटा कुठे दडी मारून बसलेला.
त्या चकाचक रूममध्येही औषधांचा वास पूर्ण लपत नव्हता. पुन्हा तिला त्या कळा आठवल्या.
'कित्ती एकटं वाटलं त्यावेळी कळा देताना. समोरची नर्स तर परकीच. पण बाहेर असलेली आईही परकी वाटायला लागली होती. काही क्षण कसे असतात ना ...खूप एकटं वाटायला लागतं... तसा तो क्षण. नकोसा वाटणारा .
त्यावेळी आपल्याला फक्त आपली जाणीव...त्यावेळी सोबत, फक्त त्या जीवघेण्या कळांची.'

तिचा चेहरा सुकल्यासारखा, ओढल्यासारखा दिसत होता. थकवा आणि शारीरिक ताणाने तिचं मूळचं सौंदर्य कुठे झाकलं गेलं होतं. केसांच्या बटा-बटा. जे केस तिने स्वतःच थोड्या वेळांपूर्वी ओढले होते. कळा सहन करताना.वेदना सहन न होऊन.
अपूर्वा तिच्या आईवर गेली होती. गोरीपान, गोल चेहऱ्याची, आनंदी, हसऱ्या ओठांची. बघता क्षणी कोणीही प्रेमात पडेल अशी. म्हणून तर अमेयचं स्थळ चालून आलं होतं.त्यांच्याकडे पैशाला तोटा नव्हता. त्यामुळे त्यांना 'सुंदरच' मुलगी हवी होती.
अपूर्वाच्या डोळ्यांसमोर उगा चित्र-विचित्र प्रतिमा येऊ लागल्या.
ती वेदनेच्या स्वरात पुटपुटली," आई ".
" हो गं राणी."
अपूर्वाने आईचा हात धरला. आईने तिच्या अंगावरचा वर सरकलेला गुलाबी गाऊन खाली केला. तोही खोलीला साजेसा,रंगसंगती साधणारा.
"अपू, झोपू नकोस. नर्सने सांगितलंय ना .!"
रात्रीपासूनच झोप कशी ती नव्हती. पण अनुभवी नर्सने सांगितलं होतं. बजावलं होतं, झोपायचं नाही म्हणून.
" आई, माझा हात सोडू नकोस ना गं ."
" नाही गं सोडत."
अपूला ग्लानी आली.

----------

" ए, माझा हात सोडू नकोस ना," अपू म्हणाली.
" नाही गं सोडत," विक्रम म्हणाला. वाढवलेले केस मागे सारत,
विक्रमच्या डोळ्यांत पाहत अपू त्याला म्हणाली, " विकी, कधीच नाही ना रे सोडणार ?"
कधीच म्हणजे कध्धीच नाही," तो म्हणाला. त्यांचे हात एकमेकांच्या हातात होते . ओलेपणाने ते निसटत होते .
असेच पावसाळ्याचे दिवस होते. पण पाऊस पडत नव्हता. राखाडी रंग आभाळभर भरून राहिला होता.
आधी तो मुसळधार बरसला होता. दोन दिवसांपूर्वी त्याचा जोर ओसरला होता. धरणं तुडुंब भरलेली होती.
विक्रम आणि अपूर्वाची जोडी, लोणावळ्याच्या भुशी डॅमच्या पायऱ्यांवर होती. मागून येणाऱ्या खळाळत्या पाण्यात भिजत बसलेली. दोघेही पूर्ण भिजलेले. त्याच्या पांढऱ्या, अंगाला चिकटलेल्या शर्टमधून त्याचं पुरुषी सौंदर्य दिसत होतं. आकाशी रंगाच्या टॉपवर तिने त्याचं काळं जॅकेट घातलं होतं .
कॉलेज बुडवून पावसाच्या संगतीने धमाल चालली होती. मोठं रोमँटिक वातावरण होतं.
त्याने केसांमध्ये बोटं गुंफली. केस वर केले. त्याच्या मानेवर डावीकडे, मागच्या बाजूला एक तीळ होता. अपूर्वा तो पाहत राहिली. तिने आज तो पहिल्यांदाच पहिला होता.
" विकी, काय छान दिसतोयंस तू अशा भिजलेल्या अवस्थेत."
" छे ! माझ्यापेक्षा जास्त तर तू दिसतेयस ! ब्युटीफुल !"
" बरं मग ?"
" कॅडबरी चाखावंस वाटतंय ."
" देते हं बाळा. नंतर तुला घेऊन देते."
"अंहं ! ते नाही वेडू . तुझ्या गालांचं...."
त्यावर अपूर्वाच्या गालांच्या कॅडबरीचं रूपांतर लाल स्ट्रॉबेरीमध्ये झालं ...

----------

मध्येच आईने अपूच्या हातातून स्वतःचा हात सोडवून घ्यायचा प्रयत्न केला . अपूची विचारधारा त्यामुळे तुटली आणि तिला वाटलं ... विक्रमचा हात सुटलाय आणि तो पाण्यात वाहून जाऊ लागलाय ...लांब ...आपल्यापासून खूप लांब !...
अपूर्वा 'विकी ' म्हणून किंचाळणार होती. तोच, तिने डोळे उघडले. तिला लक्षात आलं की ती आत्ता दवाखान्यात आहे.
आईने तिचा हात धरलेला होता व ती वाकून, काळजीने अपूच्या चेहऱ्याकडे पाहत होती.
" अपू, जागी राहा.त्रास होतोय का ?"
"नाही "
तिने डोळे मिटले. तिच्या नजरेसमोर पुन्हा विकी आला.

----------

विक्रम- सावळा, उंच, तरतरीत ,स्मार्ट. कमावलेल्या तब्येतीचा. अफाट वागणारा पण तितकाच प्रेमळ.
एकाच कॉलेजमध्ये ते दोघं. तिथेच जमलेलं त्यांचं प्रेम.
पहला नशा, पहला खुमार !....
तो तिला सिनियर होता .विक्रमचं कॉलेज संपलं. अचानक त्याची आई गेली. तो सैरभैर झाला. त्याचा आईवर खूप जीव होता. त्यावेळी अपूचा आधार होता म्हणून तो सावरला. अन ही गोष्ट तो अपूला वारंवार सांगायचा.

त्याची आयुष्याची जणू दिशाच बदलली. पुढे तो सैन्यात गेला .अपू त्याला नको म्हणत असताना. वारंवार नको म्हणत असताना. अन दोन वेडे जीव उगा दुरावले. दोघांचे इगो आड आले. दरी वाढतच गेली.
त्यानंतरही त्यांचा संपर्क होता. पण स्वर नुसतेच उमटायचे.त्यांचं मधुर संगीतात रूपांतर व्हायचंच नाही. मेलडी जमून यायची नाही.
त्यावेळी अपूला अमेयचं स्थळ चालून आलं. त्यांचा कंस्ट्रक्शनचा खानदानी बिझनेस होता. बड्या बिल्डरचं पैसेवालं स्थळ .
अमेय थोडा स्थूल होता . पैशाची ऊब शरीरात मुरलेला वाटणारा , बेरकी . पण तिच्या आई-वडलांना ते स्थळ पसंत पडलं, यात काही आश्चर्य नव्हतं.
अमेयच्या घरच्यांच्या काही अटी नव्हत्या. एक सोडली तर- त्यांना सून सुंदरच हवी होती.
अपूर्वा देखणी होती. त्यांच्या अटीत बसणारी.
पण तरी, स्थळ आवडलं तरी - अपूच्या,मनात खुटखुट होतीच...विक्रमची.
त्यावेळी तिने आईला पहिल्यांदा त्याच्याबद्दल सांगितलं.
" अपू, अगं काय बोलतेस हे ? अन कुठल्या वेळेला ? एवढं चांगलं स्थळ आलंय. नशीब उघडलंय तुझं. तुला काही कमी पडणार नाही.
अन तो विक्रम, तो सैन्यात. आज इथे तर उद्या तिथे बदली. तुझं कसं होणार ? आणि सैन्यातील नोकरी- कधी कानावर काय वाईट ऐकायला मिळेल त्याचा नेम नाही .कधी जीवावर बेतेल सांगता येत नाही..."
अपूर्वाची स्थिती दोलायमान झाली होती. शेवटी तिने निर्णय घेतला . नाहीतरी आता दोघांमध्ये एक अदृश्य दरी होतीच.
तिने व्यावहारिकतेला झुकतं माप दिलं आणि ती अमेयच्या घराचं माप लवंडून त्याची गृहस्वामिनी झाली.
लग्न झटपट आटपलं होतं. अपूने विक्रमला लग्नाचं कळवलं नव्हतं. पण शेवटी, दोन दिवस आधी तिने त्याला कळवलं . काय सांगावं, कसं सांगावं हे तिला कळत नव्हतं .
तिने त्याला मेसेज पाठवला -" विकी सॉरी ! पण पुढे कधीही मला मेसेज पाठवू नकोस. दोन दिवसांनी माझं लग्न आहे. पण तू कायम माझ्या मनात राहशील. ऑल द बेस्ट . टेक केअर ."
तिचा हा असा मेसेज पाहून विक्रम सटपटलाच. दिवसभर रडतच राहिला. त्याचे जे साथी होते त्यांना त्याचं काहीतरी बिनसलंय हे कळलं ; पण तो त्यांनाही काही बोलला नाही .
पण तो एक सच्चा सैनिक होता. दुसऱ्या दिवशी तो सावरला. पण त्याला कळलं, तिने नुसता मेसेज असा शब्द वापरला तरी त्याचा अर्थ स्पष्ट होता...
....पण सैनिक असला तरी शेवटी माणूसच होता. लढताना जखमा झाल्या तरी सैनिक दुर्लक्ष करून लढत रहातो. पण जखमा ? - त्या तर असतातच. ठसठसणाऱ्या ! एकदा आई गेली तेव्हा आणि आता पुन्हा ही जीवघेणी जखम !
थोड्या थोड्या वेळाने तो अपूचा मेसेज वाचे. तिला फोन करायला त्याचे हात शिवशिवत. पण तो थांबे. बंदूक हातात असतानाही ' सीझ फायर ' ची ऑर्डर असल्यासारखा.
त्याचं मन मूकपणे रडत राहिलं. ते आतल्या आत धुमसत राहिलं. ते धुमसणं साठत राहिलं.
काही क्षण कसे असतात ना. खूप एकटं वाटायला लागतं... तसा तो क्षण. नकोसा वाटणारा.
----------
पहिली रात्र होती.
लग्नानंतरची पहिली रात्र.
अमेयचं प्रशस्त घर. त्याची स्वतंत्र , मोठी बेडरूम. श्रीमंती ओथंबून वाहणारी ती बेडरूम त्याच्या मित्रांनी छान सजवली होती. आणि बेडसुद्धा , संगमरवरी नक्षीच्या सॅटिनच्या पांढऱ्या बेडशीटने. पांढऱ्या फुलांच्या माळा, पांढऱ्या फुलांच्या पाकळ्या. अन लाल गुलाबांचा मंद सुवास.
तशीच - अपूपण सजली होती. केशरी रंगाच्या अस्सल रेशमी साडीत. एखाद्या जाहिरातीसाठी परिपूर्ण सजवलेल्या मॉडेलसारखी!
अमेयचे मित्र घरातून निघेचनात. त्याची आई ओरडली तेव्हा ते खिदळत बाहेर पडले.
अमेय आत आला. त्याने दाराला कडी घातली. तो अपूजवळ आला. बसला, त्याने तिचा चेहरा हातात धरला. तिच्या डोळ्यांमध्ये तो पाहत राहिला प्रेमाने. अपूर्वाची नजर स्त्रीसुलभ लज्जेने खाली झुकली.
मग तिने नजर वर उचलली.
ती त्याच्या डोळ्यांमध्ये बुडाली. मग शरीरांनी निसर्गाला प्रतिसाद दिला व तिने त्याला.
----------
जवानांनी हुकमाला प्रतिसाद दिला-
" येस्सर !"
स्थळ काश्मीर. पाम्पोर.
रात्रीची वेळ. मिलिटरी बेसवर अतिरेक्यांचा हल्ला झाला होता.
जेव्हा अमेय अपूच्या कुशीत शिरत होता, तेव्हा जवानांच्या शरीरात अतिरेक्यांच्या गोळ्या शिरत होत्या .

रात्रीच्या अंधारात किती अतिरेकी होते, कळत नव्हतं. त्यांनी अगोदर योग्य पोझिशन्स घेतल्या होत्या. त्यामुळे ते टिपून टिपून जवान मारत होते. दहा जवान धराशायी झाले. गोळ्या सणसणत होत्या . जळालेल्या दारूचा वास सुटला होता.

एका अतिरेक्याची गन अचूकपणे धडधडत होती. ती थांबवणं आवश्यक होतं. त्याला टिपणं आवश्यक होतं. पण तो मोक्याच्या जागेवर होता.

विक्रमने त्याची गन सावरली. तो जमिनीवर झोपून पोझिशन घेऊन होता. तो उठला. त्याचा सहकारी दबक्या स्वरात ओरडला, " ए पागल, नीचे झुक ! "...

पण विक्रमने ऐकलं नाही. तो दुसऱ्या बाजूने योग्य टप्प्यात पोचला. त्याला तरीही तो अतिरेकी दिसत नव्हता. त्यासाठी उघड्यावरच जावं लागणार होतं. तो पुढे सरसावला. जे अतिशय धोक्याचं होतं. पण तो विक्रम होता. त्याने ते जिवावरचं धाडस केलंच.

पुन्हा सहकाऱ्याची आरोळी आली, " विकी, रुक ."

त्या आवाजाने अतिरेक्याची बंदूक थांबली. तो अंदाज घेत होता.

तो एक क्षण !.....विक्रमने पुढे झेप घेतली. त्याची बंदूक धडधडली- त्वेषाने, संतापाने, दुःखाने...

जणू समोर तो अतिरेकी नव्हताच....

'काय होतं ?- काय नव्हतं ?' विक्रमचं सारं धुमसणं, ते आत साठून राहिलेलं सारं कडवटपण, गेल्या दोन-चार दिवसांचं, ते सारं त्या गोळ्यांमधून बाहेर पडत होतं !

समोरचा तो उग्रट अतिरेकी ढेर झाला.

दुसऱ्या क्षणाला दुसऱ्या अतिरेक्याची बंदूक कडाडली- विक्रमच्या दिशेने. त्याला गोळ्या लागल्या,

चार-पाच तरी अन एक तर वर्मी !

पण विक्रमने त्याकडे दुर्लक्ष करत, खाली कोसळण्यापूर्वी त्याला टिपलं.

विक्रम खाली कोसळला . त्याची बंदूक हातातून निसटली. त्याचा हात छातीकडे गेला. त्याची छाती, त्याचा युनिफॉर्म आणि त्याचा हात रक्ताने भरला. त्याच्या युनिफॉर्मवरचा खिसा छिन्न विछिन्न झाला होता.... आणि अपूचा फोटोही . त्या खिशात अपूचा फोटो होता. त्याच्या हृदयाजवळ... तोही फाटलेला, जळालेला,रक्ताळलेला.

मृत्यूने त्याचा पंजा पूर्ण आवळण्याआधी त्याच्या मनात विचार होते, ' माझा हात सोडू नको म्हणायचीस ना तू अपू...पण... आता तर मी आयुष्याचाच हात सोडलाय. आता ?- खरं प्रेम केलं तुझ्यावर . आय डोन्ट वॉन्ट टू मिस यू ... नेव्हर ! '

तो कायमचा शांत झाला, मृत्यूच्या मिठीत !

----------

तेव्हा त्या क्षणाला अपू आनंदात, धुंदीत, थकून शांत झोपली होती. अमेयच्या मिठीत .

दुसऱ्या दिवशी सकाळी सर्व पेपर्समध्ये, पहिल्या पानावर त्या हल्ल्याची बातमी होती. चौकटीत महाराष्ट्राचा सुपुत्र शहीद झाल्याची बातमी होती. त्याच्या शौर्याचं वर्णन होतं.

त्याच्यामुळे चार अतिरेक्यांचा खातमा करण्यात यश आलं होतं .त्यातले दोन तर त्यानेच टिपले होते. त्यामुळे प्राणहानी कमी झाली होती. त्याने लवकर बाजी पलटवली होती. आणि त्यामुळेच तर, तो धारातीर्थी पडला होता.

अपूने केलेल्या गरमागरम चहाचा घोट घेत अमेय पेपर वाचत होता. त्याने हेडलाईन वाचली तोच त्याचा मोबाईल वाजला. त्याने तो घेतला. पलीकडे त्याचा लेबर कॉन्ट्रॅक्टर होता.

अपूही शेजारी बसून चहा पीत होती.

" नमस्ते साब."

" हां बोलो हरीराम, अभी तो शादी हो गयी और तू मुझे अभी खाली छोडता नहीं क्या रे ? अमेय हसत म्हणाला .

" सॉरी साब. लेकिन बातही ऐसी है. साइटपे बहोत सारा मटेरिअल आया है ....."

"हां ! आया है , दसवाँ स्लॅब चढाने."

" क्या ? हरीराम आश्चर्याने किंचाळला.

" अरे, शादी हो गयी तो आदमीका खर्चापानी बढ जाता है .... है क्या नहीं ?"

" हां साब . लेकिन हमारा परमिसन तो नौं का है ना . आगे लफडा हो गया तो ?...."

" कुछ नहीं होता रे . वो सब पहलेसे संभाल लिया है मैने .तू काम चालू कर . लफडा हो गया तो देख लुंगा मैं."

अपू ऐकत होती. अमेयची ही बाजू तिला नवीन होती. बिझनेस आणि त्यातून कंस्ट्रक्शन लाईन म्हणल्यावर हे होतंच ;पण सरळ एक अख्खा मजला ?.... तिला धक्काच बसला.

तिचा चहा झाला. ती कपबश्या उचलायला गेली ,तेव्हा तिचं लक्ष पेपरकडे गेलं . त्या बातमीकडे गेलं ... शेजारी चौकटीत फोटो होता-विक्रमचा !...

ती कपबश्या उचलून आत पळाली. मग बाथरूममध्ये . फुल शॉवर सोडून त्या पाण्याच्या आवाजात ती रडू लागली. बाहेर आवाज जाऊ नये म्हणून . अपराधी भावनेने ... विकी आता लांब गेला होता. आयुष्यातूनही आणि जगातूनही . खूप लांब . कायमचा . कुठल्या तरी अज्ञात प्रदेशाच्या बॉर्डरवर !

अमेय चांगला होता. तो एक चांगला बिझनेसमन होता. आणि तो एक चांगला नवराही होता. पण ? - त्याचं आयुष्य पैशाभोवती एकवटलेलं होतं. त्याची पैशाची हाव न संपणारी होती. अपूवर त्याचं प्रेम होतं. पण तिला वाटत रहायचं की त्याने त्याच्या पैश्याच्या बदल्यात, आपलं सौन्दर्य विकत घेतलंय ! पण- अगदीच तसं नव्हतं .
ती अगदी लगेच प्रेग्नन्ट राहिली. तर अमेयने तिचे कित्ती लाड पुरवले. कोडकौतुक केलं. तिचे डोहाळे पुरवले. तिला काही म्हणजे काही कमी पडू दिलं नाही. तिला जपलं. तिचं मन जपलं.
अपू सुखावली. अन ते सुख तिच्या अंगावर दिसामासी वाढू लागलं. गर्भारपणाचं तेज तिच्या चेहऱ्यावर -देहावर झळकू लागलं .
अमेय त्याच्या वेगवेगळ्या प्रोजेक्ट्समध्ये बिझी होत गेला. त्याला वाटत राहिलं- पोराचा पायगुण. अजून या जगात बेट्याचं पाऊल पडायचंय. तरी त्याआधीच आपली यशाची घोडदौड चालू झालीये .
त्याचे उलटे-सीधे व्यवहार वाढत चालले होते. तो पैश्याच्या मागे धावतच होता.
अपू खुश होती. मनाने आणि शरीराने. ती सगळे बदल, सगळे त्रास टिपत होती, अनुभवत होती , आनंदत होती . एक अमेयचं पैसा पैसा करणं सोडलं तर, त्याचे बेकायदा व्यवहार सोडले तर. ते तिला आवडत नव्हतं.
ती एकच तर गोष्ट तिला सलायची. त्यावेळी तिला विकीची आठवण यायची. त्याच्या वागण्याची, त्याच्या संस्कारांची आठवण यायची . आता तर तो या जगातच नव्हता. पण जर तो असता ? तिला वाटायचं- जर त्याच्याशी लग्न झालं असतं तर- आज आपण एक वीरपत्नी असतो. एका शहीद वीराची पत्नी. देशासाठी बलिदान केलेल्या, शौर्य गाजवलेल्या वीराची पत्नी ... आणि आपल्या पोटात, त्याचा अंकुर आकार घेत असता. आपल्याला त्याच्या बाळाची आई व्हायला आवडलं असतं ?...असतं ! पण मग आज तो नसता... तरी, त्याचं नाव तर अभिमानानेच घेतलं गेलं असतं.

----------

" अपू, जागी रहा पोरी," आईची हाक आली.
" आई, मी जागीच....."
अनुभवी नर्स मध्येच येऊन ओरडून गेली, " जागं रहा. झोपायचं नाही अजिबात."
आणि पुन्हा कळा सुरु झाल्या. त्या वाढत गेल्या. अनुभवी नर्सने ओळखलं, वेळ जवळ आलीये. अपूला लेबर रूममध्ये नेण्यात आलं.नर्सने डॉक्टरांना फोन केला. त्या दुसऱ्या दवाखान्यात होत्या.
त्याचवेळी बाहेर पाऊस सुरु झाला. आधी रिमझिम मग धोधो.
जणू ढगांनाही पोटातलं ओझं जड झालं होतं. त्यांनाही मोकळं व्हावंसं वाटत होतं.
त्या पावसाने लगेच ट्रॅफिक जॅम झालं. रस्त्यांच्या नद्या झाल्या .डॉक्टर त्यामध्ये अडकल्या. तिकडे नर्स म्हणाली," घे देवाचं नाव अन दे बाई - जोरात कळा दे ,श्वास खाली सोड. एकतर पावसाला याड लागलंय"
तिच्या डोळ्यांपुढे क्षणार्ध विक्रम आला. मग तिने श्वास खाली सोडला .सगळ्या वेदना, सगळं ओझं
खाली सोडलं. मनातल्या अन शरीरातल्या सगळ्या ठसठसणाऱ्या वेदना खाली सोडल्या.
डॉक्टर आल्या. अपूला ते कळलंही नाही.
एक क्षण - ती कुठे तादात्म्य पावली होती ,कोणास ठाऊक ? तो एक क्षण- निर्विकार ! - अन तिची प्रसूती झाली.
डॉक्टर आणि नर्स समाधानाने हसल्या,' आणखी एक प्रसूती,' असं असलं तरी शेवटी नावीन्यच ते. वेदनांचा क्षण आणि आनंदाचाही क्षण. स्त्रीत्व सफल झाल्याचा सोहळा !
डॉक्टरांनी त्या गुलाबी नाजूक, नवजात बाळाला उलटं धरलं . " मुलगा झालाय गं ," त्या ओरडल्या व त्यांनी बाळाला थापट्या मारल्या. ते बाळ 'टयँहयँ ' करत रडायला लागलं.
तिथली आया मोठी प्रेमळ आणि बडबडी होती. तिला प्रत्येक बाळाचं कौतुक. ती त्या बाळाला स्वच्छ करायला घेऊन गेली. तिने त्याला स्वच्छ केलं.
बाळाला एका स्वच्छ पांढऱ्या दुपट्यात गुंडाळून ती बाहेर आली . अपूला म्हणाली, " पाज बाई आता." अन पुढे ऐकून माहित झालेल्या इंग्लिशमध्ये म्हणाली , " युअर बंडल ऑफ जाय !"
तिचं इंग्लिश ऐकून हसू आलेल्या अपूने बाळाला जवळ घेतलं. तिने त्याच्या इवल्याश्या नाजूक बोटांत बोट दिलं तर त्याने ते धरूनच ठेवलं. ती म्हणाली, "गुंड्या, मी तुझा हात कध्धीच नाही सोडणार बरं. असा घाबरू नकोस. बोट धरून ठेवलंय माझं . शहाणा कुठचा !"
त्यावर आया ओरडली, " अगं- बोलत काय बसलीस , बाई?"
अपूने बोट सोडवलं. त्याला जवळ घेतलं अन तिने पाहिलं ... त्याच्या मानेवर, डाव्या बाजूला मागे एक तीळ होता. ती तो पहातच राहिली...
तिने त्याला छातीशी घट्ट धरलं. मग त्या वेगळ्या आनंदात ती हरवूनच गेली.
बाहेर , पाऊस ही शांत झाला होता .

***************

# दशावतार

- चंचल काळे

दशावतार ही प्रामुख्याने तळकोकण आणि उत्तर गोव्याच्या काही भागातील एक खूप जुनी परंपरा असलेली लोककला! आपल्या पुराणांमध्ये विष्णूचे दहा अवतार सांगितले आहेत. मस्त्य,कूर्म, वराह, नरसिंह, वामन, परशुराम, राम, कृष्ण, बुद्ध आणि कल्की हे ते दहा अवतार होत.

दशावतारी मध्ये प्रामुख्याने वामन, परशुराम, राम आणि कृष्ण या चार अवतार कथांचा समावेश केला जातो.

सिंधुदुर्गातील जवळजवळ सर्वच तालुके आणि उत्तर गोव्यामध्ये ही कला पाहायला मिळते. अभ्यासकांच्या मते कर्नाटकामधून साधारण अठराव्या शतकात ही कला महाराष्ट्रात आली. तर दासबोधामध्ये एका श्लोकात या कथेचा उल्लेख आढळतो.

खेळता नेटके दशावतारी। तेथे येती सुंदर नारी ।

नेत्र मोडी ती कलाकुसरी । परी अवघे धटींगण ||

'परी अवघे धटींगण' या ओळीतून आपल्या लक्षात येईल, की दशावतारी नाटकांमध्ये पुरुषच स्त्रियांच्या भूमिका वठवीत असत. अजूनही काही ठिकाणी पुरुषच स्त्री भूमिका करताना दिसतात. दरवर्षी साधारण जत्रांचा कालावधी म्हणजे, दिवाळीच्या आसपास दशावतारी मंडळी आपल्या नाटकांना सुरुवात करतात. थंडीची चाहूल लागली की सिंधुदुर्ग जिल्ह्यात अगदी राजापूर पासून ते बांद्यापर्यंत दशावतारी मंडळींची लगबग चालू होते. ही नाटके दरवर्षी जरी सादर केली जात असली तरी त्यात तोचतोचपणा न येता वैविध्य असते.

कोकणातील माणसांच्या जगण्याचा ही नाटके म्हणजे अगदी अविभाज्य भाग आहेत. गावातील देवळे, मोकळ्या जागा, शाळा अशा ठिकाणी अगदी नाममात्र नेपथ्यासह ही नाटके केली जात. पुरुष नट स्त्रीचा हुबेहूब पेहराव करून लीलया वावरत असत. प्रत्येक गावांमध्ये कुठली दशावतारी कंपनी येणार हे अगदी ठरलेले असे. पूर्वी लाईट नव्हते, त्यावेळी बत्ती म्हणजे पेट्रोमॅक्सच्या उजेडात किंवा कंदिलाच्या प्रकाशातसुध्दा ही नाटके सादर केली जात असत. आता सगळीकडे लाईटची सोय आहे. स्टेजची व्यवस्था केली जाते. नेपथ्य, रंगमंच, रंगभूषा आदी सगळ्याच गोष्टीत आधुनिकता येऊ लागली आहे. मात्र कलाकारांचे उत्पन्न तेवढे नाममात्र तुटपुंजे असते. पार्सेकर, वालावलकर, चेंदवणकर अशा अनेक नामवंत दशावतारी नाटक कंपन्या कोकणामध्ये होत्या. काही अजूनही आहेत. कालानुरूप त्यामध्ये भरही पडत गेली आहे. दशावतारी कंपन्यांचं स्वरूपही बदलू लागलं आहे.

ही नाटके पूर्वी मध्यरात्री सुरू होऊन अगदी पहाटेपर्यंत सुरू असत. या नाटकांचे प्रामुख्याने पूर्वरंग आणि उत्तररंग असे दोन भाग असत. आता मात्र वेळेच्या नियमांमुळे ही नाटके दहा बारा वाजेपर्यंत संपतात.

नाटकाची सुरुवात ही गणेशाच्या स्तवनाने होते. नाटकात एक सूत्रधारही असतो.नंतर रामायण किंवा महाभारतातील एखाद्या कथाभागावर नाट्याविष्कार होतो. मुख्य म्हणजे या नाटकाची संहिता लिहिलेली आढळत नाही. नाटकातील पात्रे आपल्या मनाने कथेचा धागा पकडून संवाद सादर करतात. त्यामुळे काहीवेळा मूळ कथा भलतीकडेच जाताना दिसते .पूर्वी माईकचीही सोय नव्हती. त्यामुळे नाटकातील पात्रांना ओरडून-ओरडून संवाद बोलावे लागत. गंमत म्हणजे आता माईक आले तरीही काहीवेळा पात्रांची ओरडून बोलण्याची लकब तीच दिसते. यातील संवाद उत्स्फुर्त असल्याने नाटकाची रंगत मात्र वाढत जाते, यात शंका नाही.

अशी ही दशावतारी नाटके जुन्या काळातील लोकांच्या मनोरंजनाबरोबरच सामाजिक मूल्यही वाढवताना दिसत. कारण प्रत्येक नाटकाचा शेवट हा वाईटावर चांगल्याचा विजय यानेच होत असे. त्यामुळे लोकशिक्षण ही होई. कोकण मुंबईच्या नात्यामुळे ही कला मुंबईतही पोहोचली आणि या कलेला राजाश्रय मिळाला. प्रसिध्द कलावंत कै.श्री बाबी नालंग यांना भारत सरकारचा संगीत नाटक अकादमी पुरस्कार प्राप्त झाला होता. अशी अनेक उदाहरणे देता येतील महारष्ट्र शासनानेही ह्या लोककलेच्या जतन आणि संवर्धनासाठी प्रयत्न सुरु केले आहेत. दशावतारी महोत्सवही शासनातर्फे भरवला जातो..

बदलत्या काळाप्रमाणे आता ही नाटके अनेक वेगवेगळे विषय हाताळताना दिसतात. शेगावचे गजानन महाराज, साईबाबा अशा संतकथासुद्धा दशावतारी नाटकांमधून दिसू लागल्या आहेत. काही ठिकाणी स्त्रीभूमिका स्त्रियाच करू लागल्या आहेत. तर कोकणात काही ठिकाणी फक्त महिला दशावतारी नाटके सादर करताना दिसतात. पूर्वरंग व उत्तररंग असे दोन भागही आता सादर होत नाहीत. एकाच भागांमध्ये कथा सादर होते. लोकशिक्षणाचं एक प्रभावी माध्यम म्हणूनही या दशावतारी लोककलेचा कोकणच्या समाजजीवनात वाटा आहे.

काळानुरूप लोप पावत जाणाऱ्या लोककलांच्या रांगेत मात्र दशावतारी लोककला नाही हे नक्की1 काळाप्रमाणे स्वतःला बदलवत ही लोककला अजूनही कोकणच्या मातीतलं एक अभिन्न अंग आहे आणि राहील.

**************

# द वर्ड्स विथ सायलेंस

*- अजय चव्हाण*

सकाळची सहाची वेळ आणि स्वारगेट बस स्टॉप.
फेरीवाल्यांचे आवाज, दुर कुठूनतरी टेपवर मोठ्याने लावलेली गाणी, कंडक्टरचं ते "चला ऽऽऽ चलाऽऽ" ओरडणं परत त्या शिट्टीचा आवाज, बसच्या हाॅर्नचा आवाज, बाहेरील प्रायवेट बसच्या ऐजंटच्या "मुंबई..मुंबई..कोल्हापूर..कोल्हापूर सातारा..सांगलीऽऽ" अशा आरोळ्या ह्या सगळ्या गदारोळात मी हेडफोनमध्ये माझं फेवरेट भावगीत "केव्हा तरी पहाटे उलटून रात गेली" ऐकत मस्त वाफळत्या चहाचा आस्वाद घेतेय. खरंतर हे गाणं कधीच संपू नये असं वाटतं. ह्या गाण्याचे सूर सुरेख आहेतच पण ह्यातले शब्द मला जास्त भावतात. शब्दवेडीच आहे मी. आवडतं मला शब्दांशी खेळणं. शब्द म्हणजे श्वास, शब्द म्हणजे ओढ, शब्द म्हणजे बंध, शब्द म्हणजे मन आणि शब्द म्हणजे आनंद. मी स्वतःशीच विचार करतेय. कानातलं गाणं केव्हाच संपलं होतं आणि कपातला चहादेखील. गाडीची वेळ होत आलेली. मी कानातले ते बोळे काढून तसेच मानेवरून लोंबकळत खाली ठेवले.

इतक्यातच बस आली. मी लगबगीने चढले तशी सिट आधीच आरक्षित केलेली पण तरीही मला नेहमीच घाई असते कारण एकदा सामान व्यवस्थित ठेऊन बसलं की मोकळं. नंतर लोक येत राहतात आणि सामान वरच्या रॅकवर ठेवताना धक्का वैगेरे लागतो किंवा गाडी सुरू झाली की मग ती सामान ठेवायची सर्कस करावी लागते. मी माझी बॅग व्यवस्थित वर ठेवली आणि बसले एकदाचे. वरच्या ए.सी. चे गोळे हवा व्यवस्थित यावी म्हणून अॅडजस्ट केले आणि पाय पसरून मस्त आरामात बसावं म्हणून पाय पसरले तर पायाला काहीतरी जाडजूड पुस्तक का काहीतरी लागलं.
मी वाकून उचललं तर कुणाचीतरी डायरी होती. कदाचित पुढच्या माणसाची असावी असं समजून त्याला विचारलं तर त्याने नकार दिला. डायरी तशीच दाखवत मी उभे होते आणि अचानक बस सुरू झाली. झालं! सगळा सत्यानाश.. मी पुढच्या सीटवर धडकले आणि हातातली डायरी पुढच्या माणसाच्या टकल्यावर.
"बिचारा चौदहवी का चांद" काय बोलणार इतक्यात मीच साॅरी साॅरीचा जप केला आणि डायरी त्याची आहे का विचारलं तर त्याने
"मेरा नहीयेऽऽ" शक्य तितक्या रागात सांगत डायरी उचलून परत मला दिली. हात उंचावून मी डायरी डायरी ओरडत होते पण सगळेच नकारार्थी मान हलवत होते. डेपोत जमा करण्याचा प्रश्नच नव्हता कारण ज्याची आहे त्याला पुढच्या सात जन्मात डेपोतून मिळणं शक्यच नव्हतं.

मी गुमान सिटवर बसले. ह्या सगळ्या गदारोळात माझ्या बाजूला येऊन बसलेल्या हिंडीबाकडे माझं लक्षचं नव्हतं ती मला "खाऊ का गिळू" ह्या नजरेने पाहत होती मी हलकं स्माईल दिलं. ज्या डायरीसाठी मी पुढचा टकल्या आणि ह्या हिंडीबाला त्रास दिला त्या डायरीचा मालकाचं नाव तरी काय म्हणून पहिलं पान उलटलं तर नावचं नव्हतं फक्त एक मोठं टिंब तेवढं होतं.
काय विचित्र माणूस आहे ह्याला नावगावं आहे का नाही का टिंब हे नाव आहे? मला थोडा रागच आला त्याचा मी शेवटचं पान उघडलं कारण काही लोकांना शेवटच्या पानावर नाव लिहायची सवय असते तर तिथेही काही नाही नुसतचं कोरं. मी पुढचं दुसरं पान उघडलं मस्त मोगर्याच्या फुलांचा सुंगंध आला आणि सुरेख अक्षरात लिहलेली सुगंधित कविता -

"तुझ्या केसांतली "ती" फुले..
कधी रूसलेली कधी अचंबित.
इर्षा असावी बहुधा त्यांना..
कारण त्याहूनि "तू" सुगंधित..

हरवली मने ती.. हरवल्या भावना
जपल्या आठवां मी.. जपल्या त्या खुणा..
एक ओंजळ माझी ही..
आणि एक कळी तुझी ती..
कधी हर्षित तर कधी धुंदीत.."

वा!! सुरेख.. नकळत मनातून शब्द उमटले. मी अजून काही पाने पाहीली. पन्नास एक पानावर अशाच कविता लिहलेल्या. मला जणूकाही घबाड मिळाल्याचा आनंद झाला तो क्षणभरचं.

नंतर गिल्ट वाटलं कारण अशी दुसर्याची डायरी वाचणे बॅड मॅनर्स..
पण मला मोह आवरता आला नाही आणि अजून चार पाच कविता वाचल्या. सार्याच कविता अप्रतिम होत्या. मनातल्या मनात त्या अनोळखी कवीला दादही दिली. त्याच्या कविता वाचताना नकळत मन प्रफुल्लित झालं होतं. शब्दांच्या त्या सुंगधाने एकप्रकारची धुंदी येऊ लागलेली आणि त्या धुंदीत कधी मी ती डायरी छातीशी कवटाळून झोपी गेले हे माझं मलाच कळलं नाही. जाग आली तेव्हा मी माझ्या स्टॉपच्या आधीच्या स्टॉपवर पोहचलेले.
बापरे! इतकी कशी मी गाढ झोपले ह्याचं मला आश्चर्यच वाटलं. काय करावं ह्या डायरीचं? द्यावी का डेपोत? हिचा मालक शोधत असेल तर? त्याला ती परत मिळाली नाही तर ह्या कवितेचे कागद केवळ चण्या-शेंगदाणाच्या पुड्या होतील? नाही! नको मीच देते परत. शोधेन मी त्याला कसं ते माहीत नाही पण नक्की शोधेन त्याला. एक मिनिट! 'त्याला की तिला' हे कुठं माहीत आहे? पुरूषच असेल पहिल्या कवितेवरून तरी तेच वाटतयं. शोधू आपण.. हा सगळा विचार करत असताना माझा स्टॉप आलादेखिल. मी माझं सामान घेऊन उतरले.

मयुरी माझी रूममेट स्कूटीवरून मला घ्यायला आलेली.. मी काहीच न बोलता गुमान बसले. घरी गेल्यावर कॉफी पिता पिता मयुरीला सगळं सांगितलं. तिने आधी मला वेड्यातच काढलं. इतकी लोकसंख्या असलेल्या देशात त्याला कसं शोधणार असं म्हणाली. तिचही बरोबर आहे म्हणा पण एक मिनिट! देशात कुठे शोधायचं आपल्याला. महाराष्ट्रात शोधलं तरी भेटेल की तो पण शोधायचं कसं हाही प्रश्न होताच कारण एकट्या महाराष्ट्राची लोकसंख्या करोडोनी आहे. बघू काहीतरी नक्कीच मार्ग निघेल. दुसर्या दिवशी मनिष माझा ऑफिसमित्र तो ही कविता लेख लिहतो त्याला सगळं सांगितलं. त्याने एक आयडीया दिली आणि ती म्हणजे जिथे कविता रजिस्टर केल्या जातात तिथे चौकशी करायची ह्या कविता रजिस्टर्ड असतील तर त्याच नाव तरी किमान कळू शकेल. मनिषचा एक मित्र त्या ऑफिसात कामाला होता त्याला त्याने कवितेची काही नावे सांगून रजिस्टर्ड आहेत का हे तपासायला सांगितलं. दुसर्या दिवशी सांगतो म्हणाला. मला तर खूपच आनंद झाला. चला जर कविता रजिस्टर्ड असतील तर नक्कीच काहीतरी माहीती मिळेल पण कसलं काय? एक दोन सारख्याच नावाच्या कविता होत्या पण त्यातल्या एकही मॅच नाही म्हणजे हा ऑप्शन बाद.

मयुरीने सांगितल्याप्रमाणे वर्तमानपत्रात जाहीरात दिली, फेसबूकवर पोस्ट करून झालं,व्हॉटसअपवरसुद्धा शेअर केलं. कुणीतरी नक्की पोस्ट वाचून संपर्क करेल ह्या आशेवर दिवस सरत होते. पोस्ट केल्यापासून तब्बल एका महिन्याने फोन आला.
कोण आनंद झाला सांगू पण खात्री केल्याशिवाय ओळख पटणार कशी म्हणून एक ओळ ऐकवून पुढची ओळ ऐकवायला सांगितली तर पठ्ठ्याने फोनच ठेवला बाकी मुलांचे भलते सलते मॅसेज आणि कॉल्सचा त्रास झाला तो वेगळाच. आता काय करायचं? विचार करून डोक्याचा नुसता भुगा झालेला अशात मनिषने अजून एक आयडीया सांगितली आणि ती म्हणजे कविता सादर करण्याचे कार्यक्रम होतात तिकडे हा कवी नक्की हजेरी लावत असणार. आपण असे पुण्या मुंबईत होणारे कार्यक्रमांच्या आयोजकांना अपिल करूया जर तो आला तर त्याला कळेल आणि संपर्क करणं सोप्पं होईलं. मला तर ही आयडीया खुप आवडली पण देव जाणे ईट्स वर्क ओर नॉट.

दोन वर्षे झाले कुठून काहीच संपर्क होत नव्हता पण मी अजून धीर सोडला नव्हता. एक दिवस नक्की तो भेटेल. असचं एकदा ऑफिसवरून घरी जात असताना कॅबमध्ये रेडीओवर
"मन की बात" हा कार्यक्रम लागलेला. ह्या कार्यक्रमात आपण मनातलं सगळं ओळखीच्या व्यक्तीपर्यंत पोहचवू शकतो फक्त तो कार्यक्रम त्याचवेळी त्या व्यक्तीने किंवा त्याच्या ओळखीच्या कुणीतरी ऐकायला पाहीजे. मी लगेच नंबर डायल केला. अठराव्या प्रयत्नांनी तो जोडला गेला आणि मी सांगितलं सगळं आणि माझा मेलआयडी संपर्कासाठी दिला. फोन नंबर देणार होते पण मागचे आलेले कॉल्स आणि मॅसेजेसचा त्रास मला पुन्हा नको होता. आठवडाभर मी रोज मेल चेक करत राहीले पण अपेक्षित कुठलाच मेल आला नव्हता आणि आता तर माझी उरलीसुरलेली आशाच माळलेली. अशातच दहा दिवसांनी एक मेल येऊन धडकला.
फायनली अपेक्षित मेल आलेला पण लगेच आनंदीत न होता खात्रीसाठी कवितेच्या एक एक ओळ पाठवून पुढच्या ओळी पाठवायला सांगितल्या पण रिप्लाय शून्य म्हणजे हा पण फेक मेल होता तर..

कंटाळून ती डायरी माझ्याजवळचं ठेवायचा मी निर्धार केलेला. दुसर्यादिवशी सहज म्हणून चेक केलं तर त्याच आयडीवरून एक पूर्ण कवितेचा मेल आलेला. तिच कविता होती अगदी तंतोतंत जुळणारी. कसला आनंद झाला सांगू. "भगवानके घरपे देर है मगर अंधेर नही" हे कुठेतरी मला आता पटलं होतं. मी माझा फोन नंबर दिला. थोड्याच वेळात त्याचा फोन आला..

"नमस्कार, तुम्ही इतक्या दिवस..सॉरी वर्षे डायरी सांभाळलीत त्याबद्दल तुमचे खुप खुप धन्यवाद..मी तुम्हाला माझा पत्ता पाठवतो तिकडे कुरीअर कराल का प्लिज..हवे तर कुरीअरचे पैसे मी देतो"

" ठीक आहे.." इतकं बोलून मी पत्ता लिहून घेतला आणि माझ्या गुगल पे ला पैसे पाठवायला सांगितले. त्याचं बोलणं ऐकून खरंतरं मला रागच आल कारण एकतर त्याची डायरी त्याला मिळाली ह्याचा आनंद व्हायला हवा होता तो फारसा त्याच्या आवाजात जाणवत नव्हता आणि दुसरं म्हणजे कुरीअर पाठवा म्हणजे काय?त्याला मला प्रत्यक्ष भेटून साधं नीट धन्यवादही देऊ वाटलं नाही. नुसतं फोनवरच काय धन्यवाद..ते ही जबरदस्तीने..किती आटपिटा केला मी. वर्तमानपत्रात जाहीरात दिली. त्याचे पैसे मागितले का मी? कुरीअर चार्जेस देतो म्हणे.

मी मुकाट्याने कुरीअर करायला गेले. आता त्या डायरीचा मला तिरस्कार वाटू लागला होता. इतक्या छान कविता लिहणारा माणूस इतका रूक्ष कसा काय असू शकतो? कुरीअर तर करतेच पण नंतर त्या पत्त्यावर जाऊन चांगलेच खडसावते त्याला. दुसर्या दिवशी कुरीअर मिळाल्याचा त्याचा मॅसेज आला त्यातही फक्त "कुरीअर पोहचले" इतकेच दोन शब्द लिहलेले. पत्ता तर पुण्यातल्याच होता. तसंही जाणारचं आहे मी पुण्यात तर जाऊनच येते.

मला नेहमीच कसा दिसत असेल तो? कसा बोलत असेल तो? असे अनेक प्रश्न पडायचे. त्याच्या कविता इतक्या सुंदर आहेत की मी प्रेमातच पडले होते त्या कवितेंच्या किंवा त्याच्याही.त्याच्याही? खरंचं!! हो कदाचित कारण प्रेमाशिवाय त्या कविता मी जपल्याच नसत्या. त्याला परत मिळवून देण्याची धडपड मी केलीच नसती पण त्याने साधं माणूस म्हणूनही नीट वागू नये. हयाच आश्चर्य वाटतयं. असो.. मी त्याच्या घराजवळ आलेले. अंगणात चाफ्याची, मोगर्याची फुले लावलेली.

दुपारच्या त्या मंद झुळकेत त्या फुलांचा सुंगध सामावलेला.
मी चाचरत दाराची बेल वाजवली. दारात एक माणूस उभा होता. मी त्याचं नाव सांगितलं. त्याने मला आत घेतलं. मी पाहतच राहीले. संपूर्ण घर पांढर्या रंगाने रंगवलेलं. काही भिंतीवर सुबक पेंटीग्स लावलेल्या. काही फुलांच्या, काही सुबक आकृतीच्या. दारावरचे पांढरे पडदे अलगद हवेत लहरत होते आणि घरभर मोगर्याचा सुगंध दरवळलेला. मनातला सगळा राग कुठल्या कुठे पळून गेला. मन अगदी प्रफुल्लित झालेलं. जणू काही त्याच्या इथे असलेल्या अस्तित्वाने माझं मन भारलं जात होतं. त्याचं घर, घरातल्या वस्तूंवर त्याने लिहलेल्या कवितेंच्या शब्दांप्रमाणेच त्याचा प्रभाव जाणवतं होता आणि हा प्रभाव सुखद, शांत अशी अनुभूती देत होता.

त्या माणसाने मला बसायला सांगितलं तसं मी बसले. मग त्याने काचेच्या ग्लासात पाणी आणून दिलं.

"चहा वगैरे काही घेणार का आपण?" त्याने अदबीने विचारलं.

मी नाही सांगितलं. त्याचा आवाज मला परिचयाचा वाटला.... आधीही कुठेतरी ऐकल्यासारखा! पण त्याच्याकडे पाहून हा "तो" असेल असं वाटत नव्हतं. नव्हे, हा तो नाहीये, ह्याची मला शंभर टक्के खात्रीच होती. मी ग्लास ओठांवर लावत विचार करत होते.

पाणी आणून पिऊन झाल्यावर मी सहजच "कुठे आहेत ते?" असे विचारल्यावर त्याने एका खोलीत इशारा केला. मी त्या खोलीच्या दिशेने गेले आणि आत डोकवलं. आत पाच-सहा किशोरवयीन मुले बसलेली आणि समोर तो हातानेच मूकपणे मुलांना कविता ऐकवत होता. मनात उमटलेले सगळे भाव स्तब्ध झाले. शब्दांच्या ह्रदयात राहूनही त्यांना स्पर्श करू न शकणारा तो शब्दांशी प्रेम करत होता. शब्दवेड्याच्या ओठांतून न उमटलेले ते शब्द आज त्याच्या हातातून उमटू पाहत होते. माध्यम वेगळं असलं तरी भावना तीच होती. तोच अर्थ होता फक्त तो स्पर्श नव्हता आणि मी शब्दांना स्पर्श करता येऊनही आज निशब्द होते.

************

# बाप

- विवेक कुलकर्णी

मावेल का कधीही शब्दात बाप सांगा
का आठवे जगाला दुःखात बाप सांगा

चालायला हवा ना संसार छान अपुला
असतो सदैव का या नादात बाप सांगा

दिसते जगास कायम त्याची उदास मुद्रा
असतो सदैव कुठल्या ओझ्यात बाप सांगा

जोवर समोर आहे बोलून घ्या सुखाने
बोलेल काय नंतर चित्रात बाप सांगा

बापास आस केवळ व्हावे भले मुलाचे
असतो म्हणून का या विश्वात बाप सांगा

************

# स्वप्न आणि मी कविता

- अरुणा विचारे

स्वप्नात आली एकदा परी,
म्हणाली माग काही तरी,
पाणीपुरी,पिझ्झा आणि बर्गर,
अभ्यास नको खेळूया झरझर,
शाळेत नको तास फार,
मज्जा मस्ती घेऊया खेळण्यातली कार,
गणित,मराठी नको इंग्रजी चा तास,
खेळ, कार्यानुभव,चित्रकलेत करा आम्हला पास
परी हे ऐकून झाली खूप थक्क ,
म्हणाली जादू करून करते सगळं लक्ख,
परीने दिला आशीर्वाद फिरवला पंख,
आले समोर मागितलेली चक्क,
उठलो जागेवरून गेलो दूरवर लांब,
स्वप्नाच्या दुनियेला माझा सलाम .

************

# सुकुमार

- भाग्यश्री कुलकर्णी

मिळून करुया हल्ला गुल्ला विसरून जाऊ कट्टी रे
शाळा विसरा, झाला दसरा, दिपावलीची सुट्टी रे

गृहपाठाचा नाही धसका क्लास कशाचे कुठले हो,
नाही आता धाक कुणाचा, कुणी न मारील पट्टी रे

हवी तेव्हढी खेळत राहू मैदानावर पळापळी
दांडूने कोलून घालवू तीन ताड ती विट्टी रे

ताई- अक्कांची रांगोळी, कॅरम बाबा-काकांचा
पतंग शिकूया दादांचा अन् मजेत घुमवू शिट्टी रे

आबा आज्जी काकू मामी बेत बनवतील नामी ते
लाड पुरवतील स्वतःच माझे अन् वर म्हणतील हट्टी रे

पुस्तक वाचू फास्टर फेणे, हॅरी पॉटर अन् बाकी
खेळासोबत ज्ञानाशीही जरा करुया गट्टी रे.

************

# "गोष्टी फ़राळाच्या"

- सिद्धि चव्हाण

९८३३३२६६०९
siddhic1991@gmail.com




प्रत्यक्ष दिवाळीला १५-२० दिवस शिल्लक असतात , पण दसरा होतो न् होतो, तोच दिवाळी जवळ आली की, काय-काय करायचे याची चर्चा घरोघरी सुरु होते. याबाबतीत घरातील वडीलधारी मंडळी जरा जास्तच संवेदनशील असतात.

"अरे आरामात काय बसलाय? साफसफाई कधी करणार? भांडी घासायची आहेत. रंगरंगोटी करायची आहे. बापरे फराळाच काय?" असे म्हणत एखादी आजी फराळ या मुद्द्यावर येऊन एक मोठा पॉस घेते...... आणि रमून जाते ती गेल्या वर्षीच्या फराळाच्या आठवणीत. घरी काकु , आत्याबाई , मावशी अश्या कोणकोण सगळ्याच मग तीच्या शेजारी येऊन बसतात... आणि चालू होते फ़राळाच्या गोष्टीची ऊकळ-बेर !

"वंस, गेल्या वर्षी त्या पिंट्याचे आईने लाडू दिले होते काय म्हणून सांगू ....तोंडात टाकल्या-टाकल्या विरघळले की.
आणि हो , त्या आक्काच्या नव्या सुनेने अनारसे केलेले , आठवतंय का हो ? काय चविष्ट होते सांगू... आज कालच्या मुलीच हुशार बाई. नाहीतर त्या मामाच्या सुनेला काही धड करता येत नव्हते. " असे म्हणत आजी विषयाला हात घाली . 'मग शेजारच्या कोणाकोणाच्या चकल्या फसल्या , कोणाचे लाडू बसले, शेवेचा तर चुराच झाला , शंकरपाळे फसफसले आणि अनारसे कुस्करले.

गेल्या वर्षीच नव्याने शिकुन तयार केलेला पदार्थ,   ते कळीचे लाडू खाऊन पोटात कळ यायला लागली, असे म्हणत मग सगळ्या खो-खो हसत.'

यात अगदी ५० वर्षापुर्वी आजीचं लग्न झाल होत तेव्हाची दिवाळी कशी साजरी केली जायची याचीही चर्चा होई . अशी तिखट-गोड पण खुसखुशीत चर्चा चविचविने चघळली जायची. मग यामध्ये काही असे विषय निघत जे दरवर्षी ऐकून-ऐकून कंटाळलेली कोणी काकु यामध्ये विषयांतर म्हणून आठवण करुन देत असे, "अहो सासुबाई,  या वर्षीची काहीच तयारी झाली नाही. साफसफाईला सुरुवात करु म्हणते! आणि माळ्यावर ची भांडी-कुंडी घासून-पुसुन ठेवू म्हणते." अशी आठवण करुन दिल्याबरोबर सगळे महिला मंडळ तात्पुरती बरखास्त होई . आणि साफसफाई पासून सुरुवात होऊन त्याचा शेवट होई तो फराळानेच!

बहुतेक घरी आजही फराळ बनवण्याचा श्री गणेशा होतो तो चिवड्यापासुन! सहज सोपा पदार्थ म्हणजे चिवडा.  चिवड्यासाठी पोहे पातळच हवेत , यामध्ये खोबऱ्याच्या चक्त्या सुद्धा पातळ असु देत, शेंगदाणे खरपुस तळावे, नाहीतर चिवडा खवट लागतो.  पुढे शंकरपाळे.... ते प्रमाणबद्ध हवेत , उगाच वाकडा-तिकडा, छोटा-मोठा आकार करु नये.  चणा डाळ चांगली भाजुन घ्या कच्ची रहायला नको... लाडू जास्त मोठा नको, तसेच नीट गोल गरगरीत बांधावा. चकलीची भाजणी व्यवस्थीत करावी, उडिद डाळ कमी घ्यावी , यात जुना जाडा तांदूळ वापरावा यामुळे भाजणी फुलते व चिकट होते चकल्या फुटत नाहीत आणि खुसखुशीतही होतात. करंजी नंतर ही खुसखुशीत राहायला पाहीजे.  मऊ पडता कामा नये यासाठी मैदा मळताना यात थोडे तेलाचे मोहन घालावे.
हुश्श्श....! किती त्या सुचना!  यामध्ये घरी कोणाला डायबेटीस आहे हे पाहुन गोडाचे प्रमाण कमी जास्त केले जाते. तसेच म्हातारा-म्हातारी माणसे लहान मुलांचा विचार करुन तिकटाचे प्रमाण ही विचारात घेतले जाते. मागील फराळाच्या गप्पा, कडू-गोड आठवणी आणि त्यातून शिकलेले धडे, याचे मोजमाप समोर ठेऊनच प्रत्येक पदार्थ केला जातो.  यात अजिबात कोणतेही प्रमाण न लावता ओतपोत घेतला जाणार एक त्रुप्त घटक म्हणजे त्या गृहिणीचे प्रेम! रात्र-रात्र जागून हे पदार्थ बनवताना येणारा थकवा, आपली पाठदुखी , कंबरदुखी, जागरण हे सगळ सहन करुन आपल्या कुटुंबाच्या दिवाळीमध्ये खऱ्या अर्थाने आनंद भरण्याचा महत्वाचा वाटा कोणाचा असेल तर त्या गृहिणीचा!

अजूनही बऱ्याच ठिकाणी शेजारीपाजारी आणि नातेवाईकांना फराळाची ताटं किवा डब्बे पाठवण्याचा रिवाज आहे. कोणाकडे किती फराळ पाठवायचा,  यामध्ये ते शेजारचे आपल्याला फराळ देतात की नाही. (खोखो स्माईली) गेल्या वर्षी बाजुवाल्या ताईने तीच्या फराळातून आपलेच लाडू आपल्याला परत दिले होते. समोरच्या काकुने तर उरलेला फराळ दिला होता. तीचे सगळे लाडू फुटलेले, करंजे तुटलेले आणि चिवडा पण चिवट  होता.  या वर्षी त्या दोघींना फराळ द्यायचा नाही असाही पवित्रा घेतला जातो.
तर बाबुच्या मम्मीने छान खुसखुशीत फराळ दिला होता. आणि अनारसे तर फारच चविष्ट करतात त्या,  असे म्हणत त्यांच्या डब्यात दोन एक्स्ट्राचे लाडू भरले जातात.

प्रभात समई उटण्याची आंघोळ, नविन कपडे, घराची रंगरंगोटी झाली, दिव्याची आरास सजली, दाराला तोरणे आणि फुलापानांची माळा गुंफल्या, की शेवटी अंगणात रांगोळीचा सडा पडतो आणि मग  एकत्र बसून फराळाचा फन्ना उडवला जातो.
डायबेटीस असुनही एखादा मुगाचा लाडू गपकन तोंडात टाकला जातो, ' जरासे शंकरपाळे बघते ' म्हणत डिशभर शंकरपाळे आणि वर दोन करंजा रिचवुनही अजुन काहीतरी खावे असे सारखे वाटत रहाते.
दिवाळी आणि फराळ याचे गणितच वेगळे. फराळाशिवाय दिवाळी हे समीकरण जुळतच नाही. थोडा गोड, थोडासा तिखट व बराचसा खुसखुशीत चवदार असा ठेवा म्हणजे दिवाळीचा फराळ !

तर अशा खुसखुशीत फराळाच्या आठवणींसह , दिवाळी सणाच्या तुम्हा सगळ्यांना थोड्याशा तिखट , जराशा आंबट पण खुप साऱ्या गोड-गोड शुभेच्छा !

************

# वळण

*- अर्चना गवस*

मी बिल्डिंगच्या पार्किंगमध्ये गाडी पार्क केली. अनय त्याच्या मित्राच्या सायकल मागे धावत होता.
जोरात आवाज दिला, "अनय, तुझी सायकल घेऊन जा ना, त्याच्यामागे का पळतो आहे? "
अनयचं हु नाही की चु नाही.
"अरे काय झालं ...मी काय जमिनीशी बोलते आहे का?" समोर उभ्या असलेल्या अनयला धारेवर धरलं. ऑफिस frustation त्याच्यावर निघायला सुरवात झाली. अनय काहीही बोलत नव्हता.
"जा, चावी घेऊन ये...आताच्या आता" पळत पळत जाऊन पोरं बिचारं चावी घेऊन आला.
"चल बस सायकल वर."
"आई नको ना मला भीती वाट्ते."
"कसली वाट्ते आहे भीती?"
"पडलो तर?"
"लागेल अजुन काय?" ह्या तिच्या वाक्यावर तिथेच त्याने भोकाड पसरलं.आधीच डोक्यात कामाचा ताप, त्यात हे प्रकरण म्हणजे वैताग होता... त्याला रट्टे बसणार होते पण तिने आवरत घेतलं... बिल्डिंगमध्ये अजून शोभा नको... त्याला कसंबसं सायकलवर बसवलं आणि आम्ही चक्कर मारायला लागलो... पुढे उतार आणि नेमका रस्ता पण खराब ... paddle तर मारलेच अनय नि अचानक ब्रेक दाबला... बाजूचे छोटे चाक असुन सुद्धा व्हायचं ते झालंच, सायकल पडली... त्याला धरलं मी पण परत एकदा मोठं भोकाड... अशी चीड चीड झाली त्याच्यावर... जाम रट्टे घालावे असं वाटलं...सायकल उचलली, त्याला बकोटीला धरलं आणि शेजारच्या बाकावर आम्ही बसलो दाणकन.मला इतका राग येत होता.. अनयला फटका देणार म्हणुन वळली त्याच्याकडे पण पोरगं कसनुकस झालं होतं... केविलवाण्या चेहऱ्याकडे बघितल्यावर सगळं विसरून तिनेच काळजीनेच सुरवात केली बोलायला
"बाबू, काय झालं?"
"आई, नाही जमत मला सायकल चालवायला."
"अरे असं काय म्हणतोस...किती छान चालवतोस...आता थोडासा रस्ता पण खराब आहे.. थोडी प्रॅक्टिस केली की जमेल ना...आपल्याकडुन चुक झाली आणि ती आपल्याला समजली की अजुन छान ना...आपल्याला सुधारता येते... मी आहे ना तुझ्याबरोबर ... मी मदत करेन की."
"आई, पण मला भीती वाटते."
"अरे कसली भीती? पडायची का रे? IRON MAN आहेस ना तु? पडलं तर पडलं... औषध लावायचं आणि परत खेळायचं"
"दुखत ना ते..."
" एक गंमत सांगू का? लक्षच द्यायचं नाही त्याच्याकडे तर दुखणं पण बंद होत"
"काहीपण सांगते तू.. खुप दुखत.."
"अरे खरंच, एकदा मी सांगते म्हणून तर कर"
"Mumma, मला भीती पडायची नाही वाटत , मला भीती सायकल बेस्ट चालवता नाही येणार ह्याची वाटते... सगळं कसं बेस्ट असायला पाहिजे... all rounder... perfect.."
बोलत तो होता आणि धड धड माझी वाढली होती...मी कुठल्या वाटेवर घेऊन जाते आहे पोराला.. आजची मीटिंग आठवली ..अचानक दिलेलं काम झालं नाही म्हणून ह्या आठवड्यातला काम नाकारलं गेलं.पुढच्या वेळी दोन्ही एकत्र द्यायचं होतं... boss बोलला मला त्यात काय एवढं म्हणून पण असं कसं माझं काम reject... काय होतं ते ऑफिसमधलं frustation नेमकं? कसला अट्टाहास होता तो? का माझा अहंकार होता ? Perfect बनण्याची नुसती ओढ नाही तर चढाओढ ... आणि हेच मी अनयला देते आहे की काय? मी चमकली ... "आई, आई मी काहीतरी सांगतो आणि तू ऐकत पण नाहीस" एकदम चमकलीच मी, माझंच सुधारित बालपण माझ्याशीच संवाद साधत होत...
"नटू,(एकदम प्रेमात आली की नटू होतो अनयचा) ऐकलं रे बाळा मी, कुठलीही गोष्ट एका झटक्यात perfect नाही होत.. चुकत चुकत, त्या चुका सुधारत , प्रयत्नांनी परिपूर्ण होते"

"कुठली परी होते?"
"परिपुर्ण रे पिल्लू, म्हणजे perfect होते."
"तुला माहिती आहे पिलू, आई तर सायकल शिकताना स्वतः तर पडलीच होती पण सायकल पण मोडुन ठेवली होती..घाबरत घाबरत तुझ्या आबांना सांगितलं तेव्हा आबांनी फटके दिलेच वरून तंबी पण दिली काही झालं तरी सायकल चालवणं सोडायचं नाही...आई घाबरली होती, पडली आणि मार खाल्ला म्हणून.. पण नाही चालवली तर खेळता नाही येणार, असंच फिरावं लागेल म्हणून परत परत पडून पण शिकली सायकल , मग आबा आणि मी फिरायला पण गेलो सायकलवर आबांनी शाबासकी दिली आणि गोड गोड गोळी पण... सायकल चालवली की व्यायाम पण होतो, त्यामुळे भुक छान लागते... मस्त भरपेट जेवण केलं की झोप पण छान येते...आहे की नाही गंमत खेळ पण होतो आणि व्यायाम पण..."
त्याच्या डोळ्यात एकदम भारी चमक आली 'कसा चोर पकडला वाली'
"आई तू पण घाबरते, आणि चुकते पण"
"हो मग काय? माऊ सगळेच घाबरतात आणि चुकतात पण जो आपल्या चूका मान्य करतो आणि सुधारतो ... तो नवीन नवीन शिकत राहतो... पप्पा काय म्हणतात आपल्याला 'डर के आगे...'"
"जीत है।। अरे हो ना..आई चल मी दाखवतो बघ, एक चक्कर मारून, पण तू ये हा मागे ... पडलो तर सांभाळायला..."
"येईन रे सोन्या, तुझी आई नेहमीच तुझ्याबरोबर असेल... आणि तुही रहा असाच माझ्याबरोबर मला सांभाळून घ्यायला"
आई कधी कधी काय बोलते काय माहिती असा चेहरा करून पोर माझं सायकल पळवायला लागलं... आणि मी तिथेच उभी राहिली कोण म्हणतं आईचं पोरांना वळण लावते... कधी कधी वळणावर मुलंच आईला सरळ करतात...

************

# दोडक्याच भरीत रेसिपी

- मिनल बारटक्के



**साहित्य -**

पाव किलो दोडके
2-3 चमचे तेल
कांदा लसूण मसाला (चवीनुसार)
मीठ (चवीनुसार)
साखर (चवीनुसार)
५-६ चमचे शेंगदाण्याचे कूट
1 मध्यम आकाराचचा बारीक चिरलेला कांदा
पाव वाटी बारीक चिरलेली कोथिंबीर

**कृती -**

प्रथम दोडक्याच्या शिरा काढून स्वच्छ धुवून घ्या. नंतर त्याचे बारीक काप करून घ्या. कढई गॅस वर ठेवून त्यात मध्यम आकाराचे 2-3 चमचे तेल घाला. त्यामध्ये कापलेल्या दोडक्याचे तुकडे घालून मध्यम आचेवर तेल सुटेपर्यंत परतवून घ्या. थंड झाल्यावर मिक्सरमधून जाडसर वाटून घ्यावे. नंतर त्यात चवीप्रमाणे कांदा लसूण मसाला, मीठ, साखर व शेंगदाण्याचे कूट घालून चांगले मिक्स करुन घ्या. शेवटी तयार झालेले भरीत बाउल मध्ये काढून त्यावर कांदा व कोथिंबीर घालून सर्व्ह करा.
हे भरीत ज्वारीच्या भाकरीबरोबर खूप छान लागते. २ माणसांना पुरते.

************

# वाट पाहते मरणाची

- यतीन कुलकर्णी

मरणासाठी रजले की माझे मी सरण।
यमदूत थबकला बघता माझे मरण।।
विस्तवाच्या दाह लागल्या माझ्या सरणा।।
श्वासास सांगीतले थांबव जीवन यातना।।
माझी जीवन धारा बघता "निती" हि बिथरली।
सावली तर चार पाऊलच मागे थबकली।।
विट विट बांधता संसाराची उभी केली भिंत।
मजल दर मजल केली न चुकता एकही इंज।।
वाटेत काच खळ्यांनी केली माझी पुरती परवड।
परी म्यान असता तलवार, केले सगळ्यांना बिमोड।
दमेल थकले मी आता करता संसार।
श्वासाचा ही नाही पेलवत आता भार।।
अग्निला नमन करते जवळ कर मजला।
हवेत विरून जाऊ दे आता या देहाला।।
राम राम घेता मझला निरोप आता द्यावा
विसरून सारे काही आठवणीची ठेव ठेवा।।
वाटेत वाट पाहतो तो उभा माझा सखा।।
धुगधुगी ह्दयाची माझ्या आता थांबवा।
आयुष्याची भर भक्कम दोरी आता तोडवा ।
मुक्त करा पुनर्जन्माची आस नाही या जीवा।।

************

# हृदय आणि ती

- अरुणा धनंजय विचारे

रोज ती मस्त तयार होऊन यायची .मॅचिंग साडी ,मॅचिंग ब्लाउज ,टिकली ,बॅग सगळं मॅचिंग.तिच स्मित हास्य तर मस्तच .ऑफिसच्या खाली watchman पासुन ते ऑफिस मधल्या प्रत्येकाला तिच हसणं आवडायचं.तीही रोज न चुकता प्रत्येकाला हसून अभिवादन करायची.ती अरे नाव सांगायचं राहीलं तर ती म्हणजे परी .तर ही परी एका मोठ्या मल्टिनॅशनल कंपनीत मोठ्या पदावर कामाला होती.ती खूप हुशार होती .ऑफिसमधल्या सगळ्यांच गोष्टी तिला माहिती असायच्या .प्रेझेंटेशन तर उत्तमच .तीच सौंदर्य तर काय वर्णाव .सगळा साज तर असा कि कोणीही राजकुमार पाहताच क्षणी पसंत करेल.

कंपनीत तर ती सगळ्यांच्या लाडकी होती .सगळ्यांना समजून घ्यायची व ऑफीसातली तर सर्व काम ती पूर्ण करायची.आज तिला जरा घाई होती कारण आज ऑफसमध्ये नवीन बॉस येणार होता .तो स्त्री होता की पुरुष हे कोणालाच माहिती नव्हतं. नवीन बॉस साठी जो तो तयारी करत होता.परीला विशेष जबाबदारी होती की त्याना पूर्ण कंपनीची माहिती PPT तुन सांगायची होती .परी तर खूप कॉन्फिडट होती की ती पेसेंटेशन उत्तमच करणार आहे.

तेवढ्यात औफिसमध्ये घाई गडबड सुरू झाली .परीच लक्ष लॅपटॉप मध्ये होत .टॉक टॉक करत एका रुबाबदार तरुणाची एन्ट्री झाली.परीच्या बाजूला बसलेली मालविक म्हणाली ,"काय हँडसम आहे ग ".हे वाक्य एकून परी ने लॅपटॉप मधलं डोकं वर काढलं .खरच खूपच राजबिंडा मुलगा पुढे आला .एक क्षण परी पण बघतच राहिली आणि तेवढ्यातच त्यांनेही परीकडे पाहिलं.नजरानजर झाली .परी ला अचानक मनात काहीतरी हलचल झाली आणि सेम फिलिग त्याच्याही मनात आले.

तो सरळ केबिन मध्ये घुसला ."चला झाली ppt "परी म्हणाली .विनीत बोलवायला आला.आणि ती तयार झाली.तीने PPT बघून प्रेझेन्टेशन द्यायला सुरुवात केली .तीच प्रत्येक वाक्य तो लक्षपूर्वक ऐकत होता.पहिल्या बघण्यात तिच्या प्रेमात पडला .तिचे ही लक्ष मधून जात होतं आणि ती ही काहीश्या त्याच भावाने नि बघत होती.तिची प्रत्येक वाक्याला होणारी ओठाची हलचाल त्याला फारच अस्वस्थ करत होती.तो तिच्या एकटक बघत होता.तीच प्रेझेंटेशन संपलं आणि सगळ्यांनी टाळ्या वाजवल्या.आदित्य भानावर आला. त्यानेही टाळ्या वाजवल्या.पण तो कधीच घायाळ झाला होता .

ती केबिनच्या बाहेर आली .पण तिला काळात नव्हतं की काय रियाक्ट करावं.त्याचे डोळे ,त्या राजबिंडा देह,स्मार्ट मुलगा .ती काहीच बोलली नाही.काही दिवस अजून गेले .रोज आता तिला अस वाटायचं की त्यानी तिला बोलवावं आणि काही तरी काम सांगावं.इकडे तो ही काहीतरी काम काढून तिच्याशी बोलत होता .दोघेही प्रेमात आहेत हे कळत होतं पण आधी कोण पुढाकार घेणार हे दोघानाही काळत नव्हत.त्या दिवशी खूप काम होत आणि सर्व जण काम करत होते .परी काम करत होती तेवढ्यात मालविक म्हणली की ,"चल,कॉफी पिऊन येऊ ".परी ," हो" म्हणाली .उठली .आज जरा जास्त दमलेली दिसत होती ती.मालविक काही तरी तिला सांगत होती,तीच काहीच लक्ष नव्हतं. कॉफीच्या मशीनपर्यंत ती पोहचली आणि तिला चक्कर आली ती पडणार तेवढ्यात तिला कोणी तरी पकडलं.तिने पाहिलं तर आदित्य होता.त्यानेही अलगत तिला पकडलं.सगळे बघत राहिले.तो पटकन तिला घेऊन हॉस्पिटलमध्ये गेला .तिथे डॉक्टर नि तिला तपासलं आणि सांगितले की अशक्तपणा आला आहे .औषध लिहुन देतो आराम करायला सांग. तो हो म्हणाला.तिला घरी सोडायला गेला आणि घराची चावी मागितली .तिने ही मुकाट्याने चावी दिली.त्यानी तिचा हात पडला आणि तिला सोपफ्यावर बसवलं.तिने सोफ्याच्या कडेवर डोकं ठेवलं.तो तिच्याकडे बघताच राहिला .काही मिनिट गेली आणि तिला आठवलं की तोही आहे घरात .तिच बरोबर तिने पटकन डोळे उघडले .

तोही थोडा गडबडला कारण तो एकटक तिच्याकडे बघत होता .ती जरा लाजली .उठली पण अशक्तपणा मुळे पुन्हा चक्कर आली आणि त्यानी तिला पकडलं."थांब ,तुला काही हवं आहे का "."नाही मी तुमच्यासाठी काफी करणार होते ."तो म्हणाला,"काही गरज नाही .तू आराम कर .मी निघतो तुला काही हवं आहे का ."ती मानेनेच नाही म्हणाली. प्रेम ही भावना तर जागृत झाली .पण सांगणार कसं .अस दोघानाही वाटत होतं. बोलायचं असायचं पण औफीसमध्ये बोलता येत न्हवत . पण एकमेकांना बघितल्या शिवाय करमत नव्हतं.आदित्यला तर नेहमी ती जवळ असावी असं वाटत होतं.त्याच्यातला बदल विनीतने

पण observ केला होय आणि तिच्यातला बदल पण . रोज घरातून ऑफीसला पोहोचताच ते एकमेकांना कडे बघत आणि मगच कामाला सुरू करत असत.

आज अचानक सगळ्यांना आदित्यने केबिनमध्ये बोलवलं. सांगितलं की एक मोठ्या कंपनीचे लोक येणार आहे. त्याच्यासाठी अर्ध्या तासात प्रेझेंटेशन कार्यच आहे .परी मान डोलावली.सगळे जण कामाला लागले .परी डेस्क वर आली आणि पटापट प्रेझेंटेशन तयार केलं.आणि आदित्यला पाठवलं.त्यांनी ते वाचाल आणि परील बोलवलं. तिने दारावर टकटक केलं."मे इ काम इन सर" .तो हो म्हणाला.आणि वर पाहिलं.मस्त गुलाबी रंगाचा ड्रेस .आणि छान स्मित चेहऱ्यावर .तो 2 मिनिट बघतच राहिला ."आरे यार काय दिसते रे ही " मनात अस म्हणाला .ती आली त्याने काही प्रश्न विचारले .तिने उत्तर दिली.एक slid ला दोघंच मतभेद झाला.तिला वाटत होतं की सगळे आकडे द्यावे पण तो नको म्हणत होता.थोडा वाद झाला.तो म्हणाला" मी करणार आहे ना प्रेझेंटेशन मग माझ्याच पद्धतिने होणार.तिने रागाने पाहिलं.पण काहिच बोलली नाही.चुपचाप निघून गेली. काहीवेळात सगळे डिलिकेट्स आले .

आदित्य उभा राहिला,आणि अतिशय सौम्य आवाजात म्हणाला की"गुड मॉर्निंग ऑल ऑफ यु".मी आदित्य सरपोतदार नवीनच जॉईन झालो आहे .आणि असाच ५ मिनिटे बोलत होता .आणि अचानक म्हणाला की"आता पुढचं प्रेझेंटेशन मि.परि करतील."तिने वर बघितलं .त्यांनी डोळयांनी यायचा इशारा केला.ती उठून आली .आणि कॉन्फिडन्सनी बोलायला सुरुवात केली.एकएक करत सगळं प्रेझेंटेशन संपवलं. सगळ्यांनी टाळ्या वाजवल्या. काम झालं सगळ्या नोट्स आवरताना डिलिकेट्स मधला एक मुलगा उठला आणि परी बरोबर बोलायला लागला.तो खूपच जवळ जाऊन बोलत होता .आदित्यला त्याचा खूप राग येत होता .तो सारखा तिच्याकडे बघत होता पण तीच लक्ष नव्हत.आणि मग ते सर्व जण गेले .त्याना 2 वर्षाचा प्रोजेक्ट मिळाला.सगळे जण आदित्य ला congratulations करत होते .पण आदित्याचं लक्ष परीकडे होत.ती खरंच हुशार होती .आज तिच्या मुळेच प्रोजेक्ट मिळाला होता .तिनेही त्याच्याकडे पाहिलं पण त्याच्या डोळ्यात कौतुक आणि राग दोनीही दिसत होते .तिला कळलंच नाही.काय रियाक्ट करावं .तिने smile दिली.पण तो हसलाच नाही.ती जागेवर जाऊन बसली.

हा रागातच होता .ऑफिसमध्ये पण सगळे परीविषयी बोलत होते .तिला पण भारी वाटत होतं.ती फ़क्त आदित्याच्या बोलावण्याची वाट बघत होती.आणि तिला त्यानी केबिन मध्ये बोलावलं.ती खूप आनंदात केबिनमध्ये गेली. तिने परवानगी घेतली आणि आत आली.तो समोर कॉम्पुटरमध्ये बघूनच बोलला."चांगलं केले प्रेझेंटेशन".तिने थँक्स म्हणायला तोंड उगडल आणि तो बोलला "नेहमी काय लोकांनवर इम्प्रेशन पाडण्यासाठी सजतेस का तू.का लोकांनि तुझ्याशी बोलावं म्हणून करतेस .का फ़क्त पुरुषांनाइम्प्रेस करायला करतेस".परीला या बोलण्याची अपेक्षा नव्हती.

तिच्या डोळ्यात पाणी आलं.आज पर्यंत कधी कोणी तिच्याशी अस बोललं नव्हतं. तिला राग ही आला.पण ती काहीच न बोलता केबीनच्या बाहेर गेली.मालविक म्हणाली की काय झालं पण परी काहीच सांगण्याचा मूड नव्हता.ती उठून वॉशरूमला गेली.बाहेर आली आणि पटकन सुट्टी चा अर्ज भरला .विनीत तेवढ्यात येताच होता.त्याच्या हातात अर्ज दिला.आणि निघून गेली.

तिला कळत नव्हत की तो असा का वागला .तिला प्रचंड राग पण येत होता.घरी पोहोचली आणि बेड वर पडून रडायला लागली.इकडे आदित्यला पण करमत नव्हतं. तो असा नव्हता.विनीत केबिन मध्ये आला .परीचा अर्ज टेबल वर ठेवला.आदित्यने त्याच्या कडे पाहिलं" रागात म्हणाला का सुट्टी दिलीस." विनीत म्हणाला "तू का असा वागतो आहेस." "मी काय वागलो.ती बघ ना .त्या राजशी कशी बोलत होती.काही गरज आहे का.तुला तर माहीती आहे ना तो कसा आहे आणि ही जवळ जाऊन बोलत होती.

विनीत म्हणाला"अरे मला सगळं माहिती आहे .पण तुला का राग येतो आहे."आदित्य रागात होता आणि म्हणाला,कारण मला तिची काळजी वाटते.i think i love her ." विनीतच्या हे आधीच लक्षात आलं होतं.तो फक्त हसला."खरच परीला तुझ्या सारखा मुलगा हवा होता.ती खरच लकी आहे.आणि तू पण " आदित्याने वर आश्चयाने पाहिलं.विनीत ने मग परिची पूर्ण स्टोरी सांगितली.ह्यात तिच्या आई बाबा कसे वारले आणि मग कशी तिने नोकरी मिळवली .आणि आज या पदापर्यंत पोहोचली आहे .हे सांगताना विनीत चा चेहरा खूप बोलका झाला होता . मग काय होरो ला तर आजून परी आवडायला लागली.आता काय मॅडमचा राग काढावा लागेल .मनातल्या मनात म्हणाला.

दुसऱ्या दिवशी परी तयार होऊन आली.तीला यायचं नव्हत पण विनीत ने सांगितलं की सुट्टी नाही मिळणार अस बॉस नि सांगितलं आहे.म्हणून ती ऑफिसला आली आणि डेस्क वर पोहोचताच तिला मेल आला .अजून 1 काम हातात आला होता.तिने कामाला सुरुवात केली.4 वाजले काम आटपत आलं आहे असं वाटायचं आदित्य ने बोलावलं असा massage आला.ती केबिन मध्ये गेली.त्यानी सांगितले अजून डिटेल्स add करायलला हवे आहेत तू काम संपवा आणि मला मेल कर ."काय माणूस आहे .कालचा

बद्दल sorry नाही आणि किंवा कौतुक पण नाही .आणि अजून मला काम सांगतो आहे."ती रागाने हो म्हणून निघून गेली.त्यांनी ही फक्त smile केली . त्या नंतर तो एका मीटिंगला गेला .एकडे परी काम संपवण्याचा पर्यन्त करत होती.पण काम संपत नव्हतं.

रात्रीचे 10 वाजले .काम संपलं .तेने मेल केला.हुश्श करून उठाली.वॉशरूम ला जाऊन आली.आणि परत एकदा डॉउमेन्ट चेक करायला गेली तर एका फाइल मध्ये जर गडबड वाटली.तिने परत कामाला सुरुवात केली.तेवढ्यात कुणी तरी येत आहे असं दिसलं तर आदित्य .ती अदबीने उठली."सर तुम्ही मी मेल करत होती." अरे यार ही किती cute आहे .किती कष्टाळू.आणि सुंदर सुध्दा."हो मी त्या साठी नाही आलो तुझा मेल पहिला आणि मग माझ्या लक्षात आला की तुला मी काम करायला लावलं आहे सो तुला मदत करायला आलो."परी ने काम संपवलं आणि ती जायला निघाली .तर आदित्य म्हणाला की चल जेवायला जाऊ.ती नको म्हणली.करण राग होताच ना ."गाडीत बस "ती बसली"तो लगेच तिला एक सुंदर अश्या हॉटेल मध्ये घेऊन गेला.तिला खूप आश्चर्य वाटलं .करण तिचे बाबा पण तिला याच हॉटेल मध्ये घेऊन येत असत .

खुर्ची वर बसताच मस्त म्युझिक सुरू झालं .आता परिच्या मनात धाकधूक सुरू झाली.आधी तिला 1 बुके आला .त्याच्यावर सॉरी अस लिहिलं होतं.आता तिला खूप भारी वाटायला लागलं.मग तिच्या आवडीचं गाण लागलं .आकाश गुढग्यावर बसला आणि तिला। love you म्हणाला.तिने मानेनेच हो म्हणाली. तिला रडू यायला लागलं.तो जवळ आला तिचे डोळे पुसले आणि तिला जवळ ओढल.ती काही न बोलता लाजली. सगळं कसं स्वप्नात असल्यासारखं वाटत होतं. मस्त जेवण झालं .मस्त गप्पा झाल्या आणि तो तिला सोडायला घरी आला .रात्रही खुप झाली होती.

तिने कार मधून उतरून खाली आली आणि आदित्यला बाय केले.तिला काय वाटलं के म्हणली। " सर घरी कॉफी घेऊ या का".तो लगेच हो म्हणाला.तिने कॉफी केलेली आणि दोघे खूप वेळ गप्पा मारत होते .नंतर ति त्याला म्हणली की आज रात्री थांबलात तरी चालेल.तो जर ओकवार्ड वाटत होतं पण तरी तो थांबला .आणि मग सकाळी त्याला जाग आली तेव्हा घरात मस्त अगरबत्ती चा वास येई होता .तो उठून बाहेर आला तर मस्त साडीत ही समोर आली.त्याच्या मनात हालचाल झाली।तो हळूच तिच्या जवळ आला आणि तिने वर पाहोल ,अचानक झालेल्या स्पर्शाने नि ती घाबरली आणि मागे सरकली आणि पडणार तेवढ्यात त्यानी तिला पकडलं.आणि जवळ ओढले .ते दोघे एवढे जवळ होते की एकमेकांचे श्वास जाणवत होते.तेने त्याच्या कडे पाहिलं आणि लाजून खाली पाहिलं.त्यानी दोन बोटांनी तिची हनुवटी वर केली .त्यानी हलकेच चुंबन घेतले .आणि विचारलं" लग्न करशील का माझ्याशी"

तिने डोळ्यांनी हो म्हंटल .लवकरच त्याच लग्न झालं .

************

# हो ! तुझी जाहली

- प्रशांत पोरे

हो! तुझी जाहली कृपा मजवरी देवा
जन्मली पोर, ही दुनिया करेल हेवा
हे पाय चिमुकले येता माझ्या दारी
मरगळल्या जन्मा आली नवी उभारी

मज बोल बोबडे ऐकू येता कानी
भासते जणू की मंजुळ, सुमधुर गाणी
चालते, थबकते, पडते, रडते, उठते
पण क्षणात हसते, विसरुन सारे जाई

ती भातुकलीचा खेळ मांडते इवला
अन संसाराचा धडा गिरविते पहिला
बाहुलीस जपते समजुन लेक स्वतःची
इतक्यातच मजला दिसते माय उद्याची

चैतन्य नवे सर्वत्र सळाळत असते
धावते, खेळते कधीच ती ना थकते
मी थकून येतो घरास संध्याकाळी
ती हसतमुखाने सदैव स्वागत करते

हे अल्लड, अवखळ खळाळणारे शैशव
अन गोड गोजिरे, सालस, लोभस, मार्दव
लेकीच्या पायी सार्थक शतजन्मांचे
हे नशिबी नसते प्रत्येकाच्या वैभव.

************

# बिघडलेला की घडलेला फराळ: चंपाकली

***- अर्चना गवस***




दिवाळीचा फराळ हा माझा प्रांत कधी असेल असं मला कधी वाटलंच नव्हतं...कदाचित मी प्रयत्न पण केला नसता जर माझ्या दिराच्या सासूबाई म्हणजे स्वाती गव्हाणकर मला भेटल्या नसत्या... मामी म्हणतो आम्ही त्यांना एकदम energentic म्हणतात ना तसं व्यक्तिमत्त्व आहे त्या....मामींनी एकदा खोबऱ्याच्या वड्या आणल्या होत्या.आजी वारल्यानंतर खुप वर्षांनी इतक्या छान वड्या खाल्या आणि त्यांना बोलली पण...

"आजीनंतर एवढ्या छान वड्या तुमच्याकडेच खाल्या म्हणून.."

"अग, आता तु बनवायला शिक, तुझ्या मुलांना नातवंडांना पण तुझं कौतुक करू दे की" हा टोमणा नव्हता, खुप प्रेमानी मला त्यांनी सांगितलं.. त्या दिवशी त्यांनी मला चिरोटे बनवायला शिकवले साटा न लावता ..खोटं वाटेल पण काय सुंदर पदर सुटले होते आणि तेलही खराब नव्हतं झालं.. एकदम तरल हाताने लाटले काय, तळले काय..मस्तच ... ह्याला म्हणतात सुगरण...आणि आम्ही कॉपी कॅट... कोणाची कला नाही घेता येत हो... दिवाळीत मी एकटीनेच करायचे ठरवले चिरोटे. त्यांनी सांगितलेले केलं हो, सगळं पण तरल वगैरे माझ्यापासून कोसादूर असतात हो... झालं, केलेल्या पीठाचं करायचं काय, त्या पुऱ्या तशाच तळून काढू का? काय करू?कसं करू?विचार येत असतानाच, सगळा मूडच गेला ...म्हटलं मधुराला विचारुया आपली madhurarecipi वाली हो, तिने

दाखवली चंपाकली...आणि चुपचाप ती बनवली आणि असली खुसखुशीत झाली की सगळे खुश... बिघडलेल्या फराळातून एक अप्रतिम पदार्थ मिळाला ...

चला बघूया त्याची साहित्य आणि कृती –

साहित्य:
1 कप मैदा,
चिमूटभर मीठ,
2चमचे तुप
अर्धा कप पिठीसाखर
पीठ मळायला पाणी किंवा दूध (अर्धा कप पाणी खुप होत)
हो हो एवढंच साहित्य लागत...

तर वाचा......
1. मैद्यामध्ये मीठ आणि तुप मिसळून घ्या... दोन्ही हातावर चोळून चोळून प्रत्येक मैद्याच्या दाण्याला तुप लागलं पाहिजे.. तो मऊ मऊ मैदा रव्यासारखा झाला पाहिजे.
2. त्या रवाळ मैद्यात थोडं थोडं पाणी टाकुन मध्यम पातळ असा गोळा बनवून घ्या.
3. अर्धा तास त्या पिठाला झाकुन ठेवा
4. अर्ध्या तासानंतर त्या पिठाच्या छोट्या छोट्या लाट्या बनवा.
5 पिठाच्या लाटीची पुरी करायची आणि शंकरपाळी कापतो तश्या सुरीने रेघा मारायच्या मधोमध, काठ जसेच्या तसे हवे.
6. रेषा मारून झाल्या की काठ पकडून गोल गोल roll करायचा.
7. रोल तळून घ्यायचा आणि पिठीसाखर भुरभुरायची...
चंपाकली तैयार.... गलती करना अच्छा होता है(दाग अच्छे होते है च्या धर्तीवर) चुका करा खुप करा पण घाबरून जाऊ नका... फराळ जेवढा चुकातून शिकता येतो ना तितका कशातूनच जमत नाही... चला चुकूया ... माफ करा शिकूया...

************

# निरोपाच्या वेळी

- अजित चौधरी

काळ साधारण ३०-३२ वर्षांपूर्वीचा . दिवाळी नुकतीच संपलेली असायची . थंडीला नुकतीच सुरवात झालेली असायची . मंदावलेल्या शेतीच्या कामाला आता वेग आलेला असायचा .कुणाची कापसाची वेचणी चालू तर कुणी मका मळायला घेतलेली असायची .गावातले बहुतेक कुटुंब एकतर स्वतःच्या शेतात शेतकामासाठी नाहीतर दुसऱ्या कुणाच्या शेतात रोजंदारीने गेलेले असायचे . त्यामुळे गावात काही घरे सोडली तर बहुतेक घरे सोडली तर बहुतेक घरांना कुलुपं असायची.
गावाकडच्या पूर्व दिशेला दलित वस्ती होती. ह्या वस्तीमधील बहुतेक कुटुंबाना फार पूर्वी इनामी जमिनी मिळालेल्या होत्या.पण एकतर त्या कोरडवाहू आणि फार तर एक-दोन एकरच असायच्या . उत्पन्नाचा आणि खर्चाचा मेळ कधीच जमायचा नाही त्यामुळे त्या जमिनी एकतर पडीक असायच्या नाहीतर कुणाला तरी बटाईने नाहीतर ठोक्याने दिलेल्या असायच्या आणि आपला पारंपरिकव्यवसाय हे लोक सांभाळायचे . त्यामुळे ह्या वस्तीमध्ये हंगामातही गजबजाट जाणवायचा .कुठे तापलेल्या लोखंडावर घणाचे घाव उमटायचे तर कुठे लाकडावर करवत चालताना दिसायची .
वेळ साधारण दुपारी दोन अडीचची . कुणीतरी दिवाळीला आलेली लेक परत सासरी निघालेली असायची .सकाळधरन तिने घरातली तिची माय नको नको म्हणत असताना वरवरची सगळी काम निपटून टाकलेली असायची . जेवण खाणं झाल्यावर ती मग आपल्या वायरच्या पिशवीत कपडे भरायची तर एका दुसऱ्या पिशवीत तिची माय दिवाळीचे जिन्नस भरायची घरसमोर असलेल्या झाडाच्या ओट्यावर बसून कट्ट्यामधील विड्या कमी करता करता कुठे तरी एकटक बघायचा. वातावरणात एक प्रकारचा तणाव असायचा .
सगळी तयारी झाल्यावर बापाने दिवाळीला घेतलेली नवीन साडी नेसून ती लेक बाहेर यायची.ओट्यावर बसलेला बाप मग हातातली विडी जमिनीवर रगडून विझवायचा . ती लेक मग आपल्या डोक्यावरच्या पदराचं एक टोक डाव्या हातात घेऊन पार त्याच्या पायावर डोकं टेकवायची. बाजूच्या अंगणात गोधडीला टाके मारत असलेली धुरपदा काकूचा आवाज यायचा "काय व संगे निघाली का तू ?".
"हा निघले ना आता काकू ". अन मग हि काकू गोधडी बाजूला सारून संगी जवळ यायची . तो पर्यंत अजून पाच सहा साळकाया माळकाया जमा व्हायच्या .
मग कुणीतरी विचारायची "एकलीच चालली का ?"
"व्हय"
"अन जावई ?"
"ते नाय आले "
"अन मंग तू कशी चालली ?"
"दादा गोळेगावहुन विहीरगावच्या गाडीत बसून देणार हायेत "
मग सगळ्या जमलेल्या बायकांना माय बापाला केला तसा नमस्कार संगी करायची . तिच्या पाठीवरून मायेन हात फिरायचा . कुणीतरी म्हणायचं "सुखानं नांद व माय "
" हा आत्या तू बी कमाल करती आता ,संगी नाही म्हणती व्हय नांदायला ? असं आत्याला कुणीतरी विचारायचं.
संगीच्या लग्नात सगळा मान पान नीट करूिही तो नीट झाला नाही असं संगीच्या सासू-सासऱ्याचं म्हणणं होत . संगीचा नवरा लग्नानंतर कधीच सासुरवाडीला आला नव्हता . संगीला सासुरवास होता हे सगळ्या गावाला होत .हि चर्चा न ऐकता संगी बाजूच्या घरात असलेल्या नव्वदीच्या अंथरुणाला खिळलेल्या म्हातारीला भेटायला निघून जायची . म्हातारी आता पार आंधळी झालेली आहे . वाच्याही गेलेली आहे. कान फक्त थोडे शाबूत आहे. घरातली सून मग मोठ्याने तिच्या कानापाशी "संगी चाल्ली म्हणलं ...संगी " असं ओरडायची .

धडपडत म्हातारी उठायचा प्रयत्न करायची. सून आणि संगीतिला मग बसत करायच्या.संगीच्या चेहऱ्यासाठी म्हातारीचे हातचाचपडायचे. संगी तिचे हात धरायची आणि मग म्हातारी तिच्याडोक्यावरून चेहऱ्यावरून दोन तीनदा आपला खडबडीत हातफिरवायची .

म्हातारी बोलण्याचा प्रयत्न करायची पण घश्यातुन घर्रर घर्रर असा आवाज आणि डोळ्यातून पाणी फक्त यायचं.म्हातारीचा आशीर्वाद घेऊन संगी परत यायची .

एका झाडाखाली खेळत असलेल्या सहा सात वर्षाच्या पोराचंलक्ष्य संगीकडं जायचं .

"अय संगी अक्का चाल्ली" असं म्हणत अजून दोन तीन पोरांसोबत पळत पळत ते संगीकडं जायचं .संगी अक्का पायापडलं कि भातकुलाला पैशे देते हे त्याला माहित असतं, आणिपटकन तिच्या पाय पडायचं आणि म्हणायचं "अक्का पैसे ?" मगत्याची माय त्याला पटकन मागे ओढून एक जोरदार रपाट| त्याचापाठीत घालायची .

"अय मावशे कशाला मारती तेला?,लहान लेकरू हाय ते " असं म्हणून संगी त्याला जवळ घेऊन ५० पैशे द्यायची ,आणि सगळ्या पोरांना ह्याच भातकुल घेऊन खायला सांगायची .

समोरच्या घराच्या अंगणात एका कोपऱ्यात उघडाबंब रानुदादा कुणाच्या तरी चपलीला खिळे मारत बसलेला असायचा.त्याची बायको दाराची येऊन उभी राहायची . तिची बाहेर येऊन संगीला निरोप द्यायची हिम्मत नाही, कारण आठ दिवसांपूर्वीच संगीच्या बापाचं आणि ह्याच कुठल्या तरी कारणावरून कडाक्याचं भांडण झालेलं असायचं.दोन्ही घरांचा अबोला असायचा . पण संगी ह्याच्या समोरच लहानाची मोठी झालेली ,अंगा खांद्यावर खेळलेली. मग तो हातातलं काम बाजूला टाकून जवळ पडलेली बंडी अंगात अडकवायचा आणि जमलेल्या बायकांच्या घोळक्या पाशी निमूटपणे येऊन उभा राहायचा आणि मग पटकन त्याची बायको त्याच्या मागे मागे यायची . "येते वैनी " असं म्हणत संगी मग दोघांच्या पाय पडायची .

संगी अक्का गावाला जाती म्हणजे काय होत हे अनेक आक्कांनी दिलेल्या पैश्याचं भातकुल खाऊन मोठं झालेल्या रंग्याला माहित झालेलं असायचं . तो बिचारा पडलेला चेहऱ्याने अक्काच्या दोन्ही पिशव्या घेऊन निघायचा. आता संगी निघायची आणि तिच्या सोबत निरोप द्यायला जमलेल्या सात आठ जणी निघायच्या. ह्या सगळ्याचा मागे संगीचा बाप आणि त्याच्या मागे थोडं अंतर राखून रानुदादा हि असायचा . गल्लीतल्या रस्त्यावरून चालताना होणारा ह्या घोळक्यांच्या वाहनांचा(चपलांचा) खर्रर्र खर्रर्र होणारा आवाज आणि संगीच्या सासू सासऱ्याचा चाललेला उद्धार सगळ्या गल्लीला ऐकू यायचा आणि मग दाराची येऊन कुणीतरी मराठा बामणांची बाई घोळक्याला विचारी "चालली वाटते लेक सासरी?" . घोळक्यातली कुणीतरी परस्पर " हा चाल्ली व माय ती " असं उत्तर देई .

हा सगळा घोळका नदीकाठी असलेल्या बाभळीच्या झाडाखाली आला कि मग मागून आरोळी यायची "संगे आव संगे ". हे कौसा म्हातारी असायची . सकाळी कुणाच्या तरी शेतात गेलेली वस्तीतली हि म्हातारी दुपारी घरी आल्यावर संगी आताच गेली असं तिला कुणी तरी सांगायचं . डोक्यावरच टोपलं खाली टेकवून एक हात झुकलेल्या कमरेवर आणि एका हातात काठी घेऊन लगबगीनं हि मग संगीला गाठायला निघायची .

"कुठे गेलती व आज्जे सकाळची ?" असं विचारत संगी म्हातारीच्या पायावर डोकं टेकवायची .

" गेलते माय पाटलाच्या वावरात सर्वा वेचायले" असं म्हणत म्हातारी संगीचा मुका घ्यायची आणि संगीच्या चेहऱ्यावरून रापलेला हात फिरवत आपल्या दोन्ही कानशिलावर कडाकडं बोट मोडायची.

"आन तुह्या सासू सासऱ्याले निरोप सांग मव्हा ,म्हणा नुस्ती पंढरीची वारी करून पुण्य नसतं मिळत म्हणा ,दुसऱ्याच्या लेकीला बी आपली लेक म्हणून नांदवावं लागत म्हणा, पंढरीला जात्यात अन जनावरावानी मारत्यात फोकलीचे लेकराला".

असले निरोप सांगायचे नसतात हे संगीला माहित असतं. ती फक्त मान हलवून होकार देते .

"बरं मंग येते आता " असं म्हणून संगी निरोप घेते .

मग बाप रंग्याच्या हातातल्या पिशव्या घ्यायचा.

बाप पुढं निघायचा ..त्याच्या मागं मागं संगी निघायची . संगी नजरे आड होई पर्यंत घोळका थांबायचा आणि मागं पदरानं डोळे पुसत मागं फिरायचा.

आता वस्तीपासून ते नदीकाठच्या त्या बाभळीच्या झाडापर्यंत लेकीला निरोप देणं होत नाही. कधीतरी वर्षातून एक दोनदा येणारी लेक आता नवऱ्यासोबत मोटारसायकलवर बसून वरचेवर पटकन माहेरी येऊन जाते.ती येते कधी आणि जाते कधी हेच वस्तीला आता फारसं कळतं नाही. माहेरी येण्याचं तिला अप्रूप नाही तसं वस्तीलाही तिच्या जाण्याचं नाही,कारण ती निघताना वस्तीत कुणाला भेटायला जात नाही.निघताना जर कुणी समोर आलं तरच तेवढ्या पुरत बोलणं होत.ती निघताना भातकुलाच्या पैश्यासाठी पळत येणार पोरगं आता घरात टी.व्ही. समोर नाहीतर हातात मोबाईल घेऊन बसलेलं दिसतं.आपलं भांडण संगीच्या बापाशी आहे संगीशी  नाही असं मानून निरोप द्यायला येणाऱ्या रानुदादा सारखी माणसं आता दुर्मिळ झालीत. कौसा म्हातारीसारख्या म्हाताऱ्या केव्हाच स्मशानाच्या वाटेनं गेल्यात ,पण एखादी म्हातारी भेटते आणि आपल्या जुन्या सवयीला जागून विचारते ''चालली का व माय ?''

''हा चालले ना''

''मंग पुन्हा कधी येशींन आता ?''

"कधी बी ,आपल्याला काय मोटारसायकलवर बसले कि झालं"

"हा ते बी खरंच हाय म्हणा"

नवरा गाडीला किक मारतो ,लेक मग बसते आणि मग झटक्यात दोघे जण निघून जातात.आताच एक लेक नवऱ्याबरोबर  गाडीवर बसून सासरी गेली हे गावात कुणालाही कळतं नाही.

एक मात्र फार बरं झालंय संगीला जसा होता तसा टोकाचा सासुरवास आता लेकींना नाही त्यामुळे लेक सासरी जाताना माय बापाच्या चेहऱ्यावरच्या काळजीने आता समाधानाची जागा घेतली आहे.

मागच्या वर्षी आलेल्या नदीच्या पुरात ते बाभळीचं झाड वाहून गेलंय.

************

# ***कविता WhatsApp ची***

***- डॉ प्राची जावडेकर***

तुलाही यावी याद अनावर
डोळ्यांनीही व्हावे आतूर
शब्दांमध्ये उतरून यावी
'Miss u" बनुनी मोबाईलवर

नकोच फोटो उसना उष्टा
सुविचाराचा कागद खोटा
भले सेना सुबक देखणा
तुझ्या हातचा फोटो मोठा.

गुणगुताना जुनेच गाणे
थबकून हसशील कुण्या स्मृतीने
पाठव मग ते गाणे मजला
भिजेन सोबत तुझ्या सयीने...

धडधडणारा बदाम केव्हा
खट्याळ हसरे कधी स्मायली
बघता बघता रंग फुलावे
रुसलेल्या मग माझ्या गाली..

पाठवणार नाही म्हणुनच
आजपासुनी तुला मी काही
वाट पहाते, येते का रे
याद अनावर अशी तुलाही ...

************

# टी टी एम एम

- वैशाली मोहिते

गेले आठ दिवस जगदीश्वराच्या घरातून रंगाचा वास येत होता.
दसरा ना दिवाळी, यांच्या घरात कोणतं मंगलकार्य म्हणावं तर या दोघांचं लग्न होऊन जेमतेम दोन वर्षे झाली. या अशा विचारांचं ओझं घेऊन जगदीश्वराचे शेजारी अडबंगनाथांनी जगदीश्वराच्या घराच्या बेलचे बटण दाबले. दार उघडल्या बरोबर अडबंगनाथांनी प्रश्न केला, ' काय जग्गद्दीश्वर घराला रंग देताय ?'
'नाही काका रंग नाही , पाणी देतोय घराला.'
'अरे हे काय उत्तर झाले?' असं बोलून संतापाने लाल होत अडबंगनाथ पुढचं काहिही न बोलता दारातूनच मागे फिरले.
आपल्याच विनोदावर हसत जगदीश्वरने दार लावलं.
जगदीश्वरने दार लावून पाच मिनिटे ही होत नाही तोच परत बेल वाजली. जगदीश्वरने दार उघडलं तर दारात अडबंगनाथांच्या धर्मपत्नी, एक हात कमरेवर ठेवून ओरडल्या, ' ही काय पद्धत झाली?'
'कसली पद्धत काकू? '
'ही ही अशी लोकांना उत्तर द्यायचीअसतात का?'
'कोणाला काय उत्तर दिलं ते तर सांगा?'
'आमच्या ह्यांना काय म्हणालास?'
'काय काकू?' जगदीश्वरचा सूर काकुळतीचा
'हेच घराला रंग नाही पाणी देतोय.'
'काकू गम्मत केली हो.'
'हेच शिकवलं का आई वडलांनी.'
'येस्स काकू आमची आई येणार आहे माझ्याकडे राहायला, तिलाच विचारा ना . दोन वर्षांनी येतेय आई , म्हणूनच हा रंग देतोय घराला.'
'अग्गोबाई दुर्गाबाई इकडे येणार? त्यांच्या कोण तोंडी लागेल बाई'
'हो म्हणूनच भिंतींना आईचा आवडता डार्क गडद जांभळा रंग, आणि गुलाबी पडदे आ हा हा.'
'असला रंग देतात का घराला? काय मेली आवड तरी
आणि तुझ्या बायकोला चन्द्रिकेला आवडल का हे?'
'छे हो काकू .'
'मग?' या मग नंतर काकूंनी भला आ वासला पण तोंडात रंगाचा वास घुसल्या बरोबर त्यांनी तोंड मिटले.
'काकू तिची आई कविता करते , करते तर करते मला ऐकवते मी काही बोलतो का तेव्हा, ऐकतो ना गुपचूप
मग आता उस्को भी ये सैहना पडेंगा.'
'देवा काय हे हल्लीचे नवरा बायको.' अस म्हणून अडबंगनाथ काकू दारातून हलल्या.
कळलं का राजे हो जगदीश्वराकडे त्याच्या मातोश्री, दुर्गाबाई येणार आहेत बरं. ते ही तब्बल दोन वर्षांनी. म्हणून हे असलं कसंलतरी रंग काम.
आता या दुर्गाबाई लेकाकडे दोन वर्षांनी येणार पण
आता हे माय लेक किती लांब रहात असतील ओळखा बरं की येता येता दोन वर्ष लागली.
करा बरं अंदाज.
नाही ना लागत अंदाज

तर हे माय लेक राहतात एकाच गावात, तेही एकाच कॉलनीत पण तरीही दुर्गाबाई लेकाकडे, सुनेकडे ढुंकून बघत नाहीत. आता हे ढुंकून न बघण्याचं कारण ही आम्हीच सांगायचं का? तसं असेल तर
आपल्याला जरा फ्लॅश बॅक मध्ये जावं लागणार आहे.

तर या आपल्या दुर्गाबाई आहेत न त्या कमालीच्या सोशिक बर का. कित्ती? म्हणजे बघा हं. आता कसं सांगावं बरं . आपण जोपर्यंत त्यांच्या शेपटावर पाय देत नाही तोपर्यंत त्या सोशिक.

तुमचं अगदी बरोब्बर आजकाल शेपटी राहिली कुठं शेपटावर पाय द्यायला ती कधीच नामशेष झाली.
राजे हो, शेपूट नसली तर नसली पण म्हण तर अजून शिल्लक आहे ना म्हणून ही म्हण दुर्गाबाईंच्या रागाविषयी वापरली, दुसरा आमचा काही हेतू नाही.

दुर्गाबाईंच्या मंगळसूत्राने आता व्हीआरएस घेतली आहे त्यामुळे ते सारखं आपल दुर्गाबाईंच्या शेपटावर पाय देत असतं. त्यामुळे दुर्गाबाई पण सतत फुत्कारत असतात.
सतत आपलं 'मै तेरी दूश्मन, दूश्मन तू मेरा ' मूड मध्येच ना. त्यामुळे पंचक्रोशीतले सगळे विषाची परीक्षा नको म्हणून दूर असतात. खरंतर मंगळसूत्राने दुर्गाबाईंच्या शेपटावर पाय देणं आणि दुर्गाबाईंनी फुत्कारत राहणं ही प्रोसेस गेली पन्नास वर्ष अखंड चालू आहे.
आता कित्ती दिवस फुत्काराणं शेपटावर पाय पडल्यापासून किती दिवस चालू ठेवायचे , हे दुर्गाबाईंच्या मूड वर अवलंबून असतं बर.
पण हं, जर कधी कोणी प्रेमाचं माणूस आसपास असेल तर त्या फुत्कारतच नाहीत. कधी तरी हा अनुभव घ्याच तुम्ही.

तर परवा दुर्गाबाईंच्या मंगळसूत्राने विनाकारण त्यांच्या शेपटावर पाय दिला .
अरे देवा , अजून तुम्ही मंगळसूत्रावरच अडलेले आहात होय?
तर दुर्गाबाई त्यांच्या पतीराजांना मंगळसूत्र म्हणतात
'आमचे मंगळसूत्र आले नाही'
'आमच्या मंगलसूत्राने चहा घेतला.'
'आमचे मंगळसूत्र जेवायला बसले.'
हे असं बोलत असतात. समजलं.
तर दुर्गाबाईंच्या मंगळसूत्राने आठ दिवसांपूर्वी म्हणे हिरव्या मिरच्याच्या चटणीत हिरवी मिरची कमी पडली म्हणून त्यांचा अपमान केला, तो ही गुरुवारी. मग काय झाले फुत्कार सुरू आणि काय.

आता पुढे काय ? तर हाच तो क्षण होता ज्याक्षणी या शेपटावर पाय देण्याच्या त्रासाला कंटाळून दुर्गाबाईंनी ठरवलं की लेका कडे, जगदीश्वराकडे मुक्कामाला जायचं.
पण दोन वर्षानंतरच का? आधी का नाही?
तुमचे न प्रश्नच फार बुवा.
तर त्याचं झालं असं की दोन वर्षांपूर्वी या जगदीश्वराने लग्न केलं. तुम्हाला माहितीये.
अरे वा! अगदी बरोब्बर आठवतंय तुम्हाला.
याच , याच जगदीश्वराच्या लग्नाला दुर्गाबाईंनी कडाडून विरोध केला होता.
का तर म्हणे याने लव्ह मॅरेज केले, ते ही त्याच्याच ऑफिसातल्या मुलीबरोबर, तेही त्याच्यापेक्षा जास्त पगार असलेल्या मुली बरोबर, त्यात ती मुलगी साडीच काय पंजाबी ड्रेस पण घालत नाही ऑफिसला फूल पँट आणि घरी हाफ पँट घालते, लग्नात हुंडा नाही, मानपान नाही तर रुखवतही मिळणार नव्हता.
आता तुम्ही सांगा इतक्या परंपरेच्या बाहेरच्या लग्नाला विरोध होणारच न.
आता याच लेकाकडे जायचं त्यांनी निश्चित केलं.

मंगळसूत्राला सांगून सवरून दुर्गाबाई घराबाहेर पडल्या.
लिफ्ट मध्ये शिरल्यावर समोरच पिंट्या होता.
काकू दिसल्यावर तो काय गप्प बसतो होय.
'काय काकू मंगळसूत्र कुठं ठेवलं , का हारावलं.?'
काकूंनी हात उगारे पर्यंत पिंट्या लिफ्टमधून सटकला.

जगदीश्वराच्या दारात जाईपर्यंत आख्खी सोसायटी काकूंबरोबर होती.
दार उघडलं ते नेमकं चंद्रिकेने , ते ही ती होती नेमकी नेहमी प्रमाणे हाफ पँट मध्ये , आता काकूंना अचानक दारात पाहून तिला ही काही सुधारेना.
नेहमी प्रमाणे अडचणीच्या वेळी ती जगदीश्वरला हाका मारायला लागली.
'जगुडीsss, जगुsssडया ..'
या हाका ऐकून जगदीश्वर आतल्या खोलीतून दोन ढांगात बाहेर आला पण आईला पाहून परत आत पळाला.
आता का काय झालं?
सांगते.
आता दुर्गाबाई समोर त्याची बायको अशी हाफ पँटमध्ये उभी म्हंटल्यावर मग त्यानेच डोळे झाकून घेतले आणि पळत जाऊन 3X l टॉवेल घेऊन आला आणि तो चंद्रिकेला गुंडाळला.
तो पर्यंत दुर्गाबाई च्या नजरेत 'परमेश्वरा कशी राहू हिच्या बरुबर आणि चंद्रिकेच्या नजरेत 'ओ गॉड सेव्ह मी' असे भाव तरळत होते.
आत्ता पुढे काय हा भाव दुर्गाबाईंबरोबर आलेल्या कॉलनीच्या मुखावर होता.
आता पुढची सूत्र जगदीश्वराकडे गेली आणि तो दुर्गाबाईंबरोबर आलेल्या सर्वांना उद्देशून म्हणाला, 'आई सुखरूप माझ्याकडे पोचवलीत थँक्यू व्हेरी मच ,
आणि आता इतक्या जणांच्या चहासाठी घरात दूध नाही पुढच्या कोजागीरीला माझ्याकडून सगळ्यांना कटींग बासुंदी टी. '
जगदीश्वर यावर कोणाची रीऍक्शन काय येईल हे बघण्याच्या भानगडीतच पडला नाही. आणि दार लावलं
खरंतर त्याला आई आणि बायको यांना ऍट टाईम कसं हँडल करायचं यायचं टेन्शन आलं होतं.
पण त्याचं नशीब इतकं बलवत्तर की तो घरात आला तरी दोघी ही ढिम्म होत्या.
आई आवडत्या रंगात रंगवलेल्या भिंती आणि आवडत्या रंगाचे पडदे बघण्यात दंग आणि आणि बायको हाफ पँट वर गुंडाळलेला टॉवेल सांभाळण्यात.
'सो आई कशी आहेस तू?'
'जगदिश्वरा , माझी आवड लक्षात आहे की रे तुझ्या!'
दुर्गाबाईंच्या डोळ्यात काय कौतुक बाई लेक विषयी.
'आई दोनच वर्ष आपण लांब होतो ग'
"बाय द वे चांद आईसाठी चहा करतेस?'
बापरे , राजे हो ऐकताय ना , या दोन वर्षात पहिल्यांदाच या चांदच्या जगुडीने तिला चहा करायला सांगितला. पण ही चांदची जगुडी तिच्या आईसाठी चहाच काय पण स्वयंपाक पण करते हे तिला अंधुक्स आठवलं बर का! तशी चांगली आहे हो, हाफ पँट घालते म्हणून काय झालं.
'ब्लॅक टी, ग्रीन टी ऑर लेमन टी' इति चंद्रिका.
'नकोsss मीच करतो आईला बासुंदी टी लागतो.'
आणि इतकं कसनुस हसला की त्या हसण्याचा अर्थ चंद्रिकेला अज्बिबात लागला नाही.
आणि हा असं पूर्वी माझ्याकडे बघून का हसला नाही असं तिला वाटलं पण तिने ते विचारायच्या आत तिच्या जगडू ने तिचा हात घट्ट पकडला
आणि जाता जाता आईकडे वळून म्हणाला, 'आई तू मस्त पैकी तुझी आवडती सिरीयल बघ ती जी गेली दहा वर्ष चालूच आहे माझं ते माझं आणि तुझं ते पण माझं, आणि तुझी आठवण आली की मी हीच सिरीयल पाहतो गss.'
'तुझी आठवण आली की मी हीच सिरीयल पाहतो गsss' जगदीश्वराच्या या वाक्यानं दुर्गाबाईंचे डोळे अक्षरशः डबडबले आणि ते पुसायच्या आत , आई देखत इज्जतीचा फालुदा होण्याआधीच जगदीश्वराने चंद्रिकेला खेचतच, बेडरूम मध्ये नेले
आणि सलवार कुडता घालण्याची विनंती केली यावर जुगडुची चांद काय म्हणाली माहितीये अगदी लाडेलाडे
'जुगडू , तू रोज अशी रिक्वेस्ट केलीस ना तर मी रोज ऑफीसला पण हे असेच ड्रेस घालीन ,लब्यु'
'अग चंद्रिके (इथे जगदीश्वर जाम चिडलेला आहे बर, आणि लाडक्या चंद्रिकेला मनातल्या मनात चक्क येडचाप म्हणतोय ) तुझ्या ऑफिसचा ड्रेसकोड काय आहे ग राणी' अशा या संवादाला अधिक रंग चढण्या आधीच,

'जगडीsssशवरा ss'  ही दुर्गाबाईंची हाक घरात घुमली
आणि 'हो आई आणतो चहा'  म्हणत जगदीश्वर  स्वयंपाकघरात पळाला. आईने आपल्या हातचा चहा मिटक्या  मारत  पिते आहे, आणि खूप दिवसांनी त्याला कपातला चहा बशीत ओतून पिणारी व्यक्ती पाहून कैच्या कैच वेगळं वाटलं  याच आनंदात जगदीश्वराने तो क्षण क्षणात सेल्फीत कैद केला.  आता खरी मज्जा दुसऱ्या  दिवशीचा सूर्य उगवल्यापासून सुरू होणार आहे बरं का!

तर ठरल्या प्रमाणे दुसऱ्या दिवशीचा सूर्य उगवला. मग काय ? मग काहीच नाही. सुनेच्या हातचं  काहीबाही नव्या जमान्यातलं  खायला मिळेल. असं काहीतरी रात्रभर स्वप्न पाहून दुर्गाबाई कुठल्याशा इंग्लिश गाण्यानं जाग्या झाल्या.
त्यांनी  सहज म्हणून स्वयंपाक घरात डोकावलं
पण कसचं काय त्यांचा लेक एका शेगडीवर त्याचं काहीतरी करत होता  आणि सूनबाई चंद्रिका एका शेगडीवर तीच काहीतरी करत होती. जरा वेळाने ती फुलपँट शर्ट कोट , बूट घालून बाहेर पडली. त्यानंतर  त्यांना  जगदीश्वरानेच भानावर आणले.
जगदीश्वराने आईसाठी 4 दिवस रजा  घेतली होती.
'जगदीश्वरा तुझी बायको रोज अशीच  आस्ते कारे?  ती आज घरी नाही राहणार का रे मी आले म्हणून? दुर्गाबाईंचा कातर झालेला आवाज लक्षात येऊन सुद्धा त्याकडे जगदीश्वराने दुर्लक्ष केले.
'आग आई तिची आई आली की ती घरी असते  आता
माझी आई  घरी आली म्हणून मी घरी' असं म्हणून आईला घट्ट जवळ घेतलं.
'आणि  कारे  घरात दोघचजण आणि वेगवेगळं  अन्न शिजवता' न राहवून दुर्गाबाई बोलल्याच.
'आई माझी आई ,  जमाना बदल गया है  मेरी अम्मी
आता  युग टी टी एम एम चे आहे.'
'ये काही  थापा नको मारुस हं, कालियुग  चालू आहे,  कलियुग संपायचे आहे अजून. थापा मारण्यात बाप वर गेलाय अगदी.'
'आई  बाप काढायचा नाही हं'
'काय करशील बाप काढला तर'
'बाबांना इकडे बोलावून घेईन...' यावर दोघ ही खळखळून हसले , खूप वर्षांनी माय लेक असे हसले.
'ये सोन्या  मला चार  दिवस सुनेच्या हातचं  खाऊ दे ना रे. मग बोलावं बाबांना काय' आणि एकमेकांनी टाळी दिली.
'आई आमचा संसार हा टी टी एम एम आहे सांगितलं ना तुला.'
'बरं, हा कसला संसाराचा प्रकार ?'
'टी टी एम  एम म्हणजे तुझं तू माझं मी. ती तीच कमावते ,खर्च करते. मी माझं कमावतो खर्च करतो. '
दुर्गाबाईंना हे काहीच कळेना की
'अरे संसार संसार , पण असा  नस्तो रे.'
'आई आता असाच  अस्तो संसार.'
का कुणास  ठाऊक  पण दुर्गाबाईंचा चेहरा अचानक चमकला. आणि म्हणल्या ,'जगड्या टाळी दे.'
'आई अग काय झालं.'
'काही नाही टाळी दे.'
'अग पण झालं काय अशी काय बोलतेस.'
'आता मी पण असाच संसार करते बघ.'
'कसा?'
' तू तेरा देख मेरा मै मेरा देखती.'
'अग, पण तुला झेपेल का हे सगळं.'
'आगे आगे देख होता है क्या ..!'
असं म्हणत दार उघडून  त्यांच्या संसाराकडे निघाल्या.

************

# उजाड झाली राने

- शाम लाटकर

उजाड झाली राने
उजाड झाली शेती
कधी मिळेल आमुच्या
जीवनाशी या गती ।


होत्याचे नव्हते झाले
आयुष्य कामी आले
महापूराने आमुचे
जीवन उध्वस्त झाले ।

दोष कुणाला द्यावा
करुनी देवाचाही धावा
नवी उभारी घेवून
ठाव गगनाचाही घ्यावा ।

************

# कलादालन

- मधुरा कुलकर्णी



************

# हसुया जरा

- योगेश गवस




***




***




***

# नशा आणि कुजबुज

- पल्लवी कुलकर्णी सुकळीकर

लालसर जड डोळे, अर्धवट मिटलेल्या पापण्या, विस्कटलेले केस आणि झुलणारी चाल असा अदितीचा एकंदरीत अवतार पाहून ऑफिसमधल्या लोकांमध्ये कुजबुज सुरु झाली.

"आज किती उशिरा आली ही? एरवी वक्तशीरपणावरून ज्याला त्याला ऐकवत असते."
"आणि टापटीप राहण्यावरूनही ऐकवलं मला. आजचा अवतार पाहिलास का तिचा?"
"काहीतरी झालं असेल गं. तुला काय वाटतं? तिची अशी अवस्था कशामुळे झालीये?"
"ड्रग्स?"
"अदिती तशी मुलगी नाही."
"दारू?"
"काहीतरीच काय. अदिती दारूला स्पर्शही करत नाही."
"मग घरी प्रॉब्लेम झाला असेल का?"
"असू शकेल. नुकतंच लग्न झालेलं असूनही तिच्या व्यक्तिगत आयुष्याबद्दल ती आपल्याला काहीच सांगत नाही." "घरगुती हिसाचार तर नसेल? बघ, आज ती पूर्ण बाह्यांचा ड्रेस घालून आलीये. केस कसेबसे वरवर विंचरून बांधलेत. दुःखी असेल बिचारी."
"तिलाच विचारूया का?"
*****
"अगं असं कसं थेट विचारणार तुला मारलं का सासरी म्हणून? थोडा वेळ वाट पाहू, मग आपल्यापैकी एकीने जाऊन हळूच विषय काढायचा."
"पण ही बया कॉफी मशीनच्या इथे गेली."
"अरेच्चा, तिला कॉल आलाय."

"हॅलो साहिल. अरे डोकं जाम चढलंय. तुलापण असंच होतंय का?
हम्म. चुकलंच आपलं. पुढच्या वेळेस असं नाही करायचं. काहीही झालं तरी सकाळी सकाळी साग्रसंगीत पुरणपोळीचं जेवण जेवायचं नाही. मग कोणाचंही कितीही आग्रहाचं आमंत्रण असू देत. किती जायफळ घालतात मावशी पुरणात काय माहिती? "

अदितीचं हे बोलणं ऐकून कुजबुज ग्रुप काही झालेच नाही असे दाखवत चुपचाप आपापल्या कामाकडे वळला.

# आभार प्रदर्शन

**स्पंदन २०१९** आमचा पहिलाच दिवाळी अंक तुमच्या हाताना देताना खुप आनंद होत आहे. साहित्याच्या विविध पुष्पांनी भरलेली ओंजळ भरून आम्ही घेऊन आलो आहोत तुमच्याकरता तुमची दिवाळी सुगंधित करण्यासाठी!

निवडक लेखकांचे सर्वोत्तम लिखाण यामध्ये समाविष्ट केले आहेत. या अंकासाठी दर्जेदार साहित्य मिळवून देण्याकरता 'भाग्यश्री कुलकर्णी' आणि 'वैशाली मोहिते' यांचे मन:पुर्वक आभार! दर्जेदार साहित्याचा आमचा हट्ट पुरवण्याकरता सर्व लेखकांचे मन:पुर्वक आभार! लेखणी हातात धरून भावविश्व कागदावर उतरवण्याकरता तुम्ही दिलेला अमूल्य वेळ आणि कल्पनांचा, शब्दांचा खजिना निर्विवादपणे अमूल्य आहे.

संपादनास आपला अमुल्य वेळ देउन आम्हास मदत केल्याबद्दल ‘अभिषेक चौधरी’ आणि विनायक चव्हाण यांचे विषेश आभार. या दिवाळी अंकाची शोभा वाढवली आहे त्या खजिन्याच्या लखलखाटाने! थोडक्यात काय, की तुमच्या मदती शिवाय हा अंक कधीच पुर्णत्वास येऊ शकला नसता! त्यामुळे थँक यु, धन्यवाद हे शब्द तुमच्या योगदानासमोर खूप छोटे आहेत.

तरीही, सर्वांचे पुनश्च धन्यवाद!

दिवाळीच्या फराळाप्रमाणे अगदी खुसखुशीत आणि खमंग असा हा अंक खास आपल्यासाठी!

ही दिवाळी तुम्हाला आरोग्यदायी, सौख्यकारी आणि आनंद देणारी ठरणार, ही सदिच्छा! अंक करताना अनेक जणाचा हातभार लागला आहे आणि त्यांच्या ऋणात रहाणेच योग्य आहे. बाकी वर्षभर आपण वेगवेगळ्या कार्यक्रमानच्या निमित्ताने भेटत राहूच. अंक वाचून आपल्या तिखट, गोड, खुसखुशीत प्रतिक्रिया नक्की द्या आमच्या ईमेल आयडीवर!

**मसअप प्रकाशन**

स्पंदन दिवाळी अंक २०१९

facebookalwayson@gmail.com

" लावण्याचे उटणे हाती, लालित्याचे चंदन
प्रकाश पसरे मनामनांतून तोडून ते तमबंधन!
चहू दिशांनी शब्द-अक्षरे करती मधुर गुंजन
ऐकू येते साहित्याचे नादबद्ध ते हृदय-स्पंदन "
मधुरा कुलकर्णी
https://www.facebook.com/Madhukull
*****

" स्पंदनाने गुंफियले शब्द जणू
असंख्य हृदयाची गुंफने !
गद्य, पद्य आणि लेखमाला
लेऊनीया आलो आवडीने !
झगमगते लक्ष लक्ष दिवे इथे
अन सुग्रास जाहली पक्वाने !
चुक-भुल द्यावी घ्यावी
अन स्विकारावी आमंत्रणे !! "
*सिद्धि चव्हाण*
siddhic.blogspot.com
*****

" जमल्या चौघी झाली मैत्री चढू लागला रंग
दिवाळीच्या खुसखुशीत साहित्यफराळामध्ये
जाहलो आम्ही दंग
अवचित आली सर पावसाची नसता ध्यानी मनी
मातीही नटली सुवास उधळत ओले ओले अंग !! "
*पल्लवी कुलकर्णी सुकळीकर*
Killicorner.in
*****

" कवितांचे दिप अन, पाककलेची रांगोळी
कथांची आरास अन उटण्याच्या अंघोळी
स्पंदनाचे सोहळे अनावर, त्यात हरपण्याचा ध्यास
फुलांनी सजे इथे दिपोत्सवाची आरास ! "
*अर्चना चौधरी*
https://www.facebook.com/rangmantale
*****